जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, ■ गुरुवार २९ ऑक्टोबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०

विधान परिषद निवडणुकीत महाविकास आघाडीची सरशी!

पाचपैकी तीन जागांवर महाविकास आघाडीचा विजय; महायुतीला दोन जागांवर समाधान

मुंबई/प्रतिनिधी- विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांच्या निवडणुकीत महाविकास आघाडीने महायुतीवर मात करत पाचपैकी तीन जागांवर विजय मिळविला, तर महायुतीला दोन जागांवर समाधान मानावे लागले. या निकालामुळे राज्यातील राजकीय समीकरणांची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून, भाजपचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या नागपूरमध्ये झालेला पराभव महायुतीसाठी विशेष धक्कादायक ठरला आहे. दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या मोजणीत काँग्रेसने घेतलेली मुसंडी या निवडणुकीतील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरली.राज्यातील पाच विधान परिषद जागांसाठी २३ तारखेला मतदान पार पडले. यामध्ये पुणे पदवीधर व शिक्षक मतदारसंघ, संभाजीनगर पदवीधर, अमरावती शिक्षक आणि नागपूर पदवीधर मतदारसंघांचा समावेश होता. या निवडणुकीत महाविकास आघाडीच्या उमेदवारांनी सूक्ष्म नियोजन,

भाजपचा बालेकिल्ला असलेल्या नागपुरात काँग्रेसची रणनीती यशस्वी

मतदारांशी थेट संपर्क आणि शेवटच्या टप्प्यापर्यंत केलेल्या प्रचाराच्या जोरावर महायुतीसमोर कडवे आव्हान उभे केले.

संभाजीनगरमध्ये प्रतापसिंह पाटील यांचा मोठा विजय- संभाजीनगर पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरदचंद्र पवार गटाचे प्रतापसिंह पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या अजित पवार गटाचे विद्यमान आमदार सतीश चव्हाण यांना पराभूत करत मोठा विजय मिळविला. या निकालामुळे या मतदारसंघातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.विद्यमान आमदाराला पराभूत करण्यात प्रतापसिंह पाटील यांना यश आल्याने शरदचंद्र पवार गटाच्या ➩(पान २ वर)

माझा विजय सर्वांच्या प्रयत्नांचे यश-सरनाईक

अमरावती/प्रतिनिधी- अमरावती विभाग शिक्षक मतदार संघात सलग दुसऱ्यांदा जो विजय मिळवला तो महायुतीमध्ये असणाऱ्या सर्वांच्या प्रयत्नांचं यश असल्याची प्रतिक्रिया किरण सरनाईक यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना दिली.



शिक्षकांसाठी मी गत सहा वर्षात जी कामं केली, ती शिक्षकांसमोर मांडली. कोरोनाचा काळ असताना देखील मी शिक्षकांचे प्रश्न रेटून धरले. शिक्षकांना न्याय मिळावा असंच माझं धोरण होतं. शिक्षकांचे हक्क शिक्षकांना मिळावे यासाठी सत्तेत असणं गरजेचं आहे. त्यामुळे मी सत्ता पक्षात सहभागी झालो. आमचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी केलेल्या प्रयत्नांमुळे हे यश मिळालं. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यातील महायुतीच्या सर्वच पक्षाच्या नेत्यांनी माझ्यासाठी केलेल्या प्रयत्नांमुळे आज आम्ही यशस्वी झालो असं शिक्षक आमदार किरण सरनाईक म्हणाले.

दुसऱ्यांदा शिक्षक आमदार- अमरावती. विधान परिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदार संघातून शिवसेना शिंदे गटाचे उमेदवार किरण सरनाईक यांनी सलग दुसऱ्यांदा विजय प्राप्त केला असून त्यांनी प्रथम आणि द्वितीय पसंतीच्या मतांच्या आधारे विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा पूर्ण केला. सरनाईक यांना १६ हजार ६६३ मते मिळाली. त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना पराभव पत्करावा लागला. त्यांना ८ हजार ६३६ मते प्राप्त झाली. शिवसेना शिंदे गटाचे बंडखोर उमेदवार श्रीकांत देशपांडे यांना ७ हजार १७ हजार मते मिळाली. ते तिसऱ्या स्थानी आले. तपोवन मार्गावरील लोकशाही भवनात मंगळवारी सकाळी ८ वाजेपासून सुरू झालेली मतमोजणी आज बुधवार २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी चार वाजेपर्यंत म्हणजे तब्बल ३३ तास चालली. विजयासाठी १६, १३४ इतक्या मतांचा कोटा निश्चित करण्यात आला होता. प्रथम पसंतीच्या मतांच्या मोजणीत कोणीही उमेदवार ही मतसंख्या गाठू न शकल्याने दुसऱ्या पसंतीची मतमोजणी हाती घेण्यात आली. २४ व्या बाद फेरीअखेर किरण सरनाईक यांनी विजयाची पताका फडकवली. किरण सरनाईक यांचा विजय दृष्टीपथात येताच त्यांच्या समर्थकांनी एकच जल्लोष केला.

पुणे शिक्षक मतदारसंघात भाजपच्या कौस्तुभ गावडेंचा विजय

पुणे/प्रतिनिधी- पुणे शिक्षक मतदारसंघातून भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे यांच्या विजयाची फक्त औपचारिकता बाकी आहे. कौस्तुभ गावडे हे पहिल्या क्रमांकावर असून एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने पाठिंबा दिलेले सचिन सानप हे दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तिसऱ्या क्रमांकावर असलेले दत्तात्रय सावंत हे बाद झाले आहेत. कौस्तुभ गावडे आणि सचिन सानप यांच्या मतांमध्ये ६,२०० मतांचा फरक आहे. सानप यांच्या मतांची मोजणी सुरू आहे.तर या निकालांची स्पष्टता समोर येताच ➩(पान २ वर)

अमरावती शिक्षक मतदारसंघातून महायुती-शिवसेनेचे उमेदवार किरण सरनाईक यांच्या दणदणीत विजयाबद्दल समाजसेवक लप्पीभैय्या उर्फ चंद्रकुमार जाजोदीया यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

अर्णवमुळे आंध्राच्या किनारपट्टीवर हाहाकार

अमरावती : अर्णब चक्रीवादळ आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर हाहाकार माजवत आहे. बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या अर्णव या अत्यंत तीव्र चक्रीवादळाने आज पहाटे आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीला ताशी १३५ किमी वेगाने जोरदार तडाखा दिला.



या चक्रीवादळामुळे राज्यात प्रचंड हाहाकार उडाला असून वेगवेगळया दुर्घटनांमध्ये ५ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ७० हजार हेक्टरहून अधिक शेतीचे नुकसान झाले आहे.खबरदारीचा उपाय म्हणून विशाखापट्टणम आणि विजयवाडा येथील विमान उड्डाणे तसेच ५० हून अधिक रेल्वे गाड्या रद्द करण्यात आल्या असून, प्रशासनाने १.८० लाख लोकांना सुरक्षित स्थानी हलवले आहे. २७ ऑक्टोबर रोजी बंगालच्या उपसागरात दोन प्रणाली सक्रिय होत्या.एक अर्णब आणि ➩(पान २ वर)

टाटा समूहाचा गुन्हेगारी पद्धतीने विनाश केला जातोय

नवी दिल्ली : लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी टाटा समूहाबाबत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी असा दावा केला आहे की, टाटा समूहाचा गुन्हेगारी पद्धतीने विनाश केला जात आहे. याव्यतिरिक्त, त्यांनी देशातील प्रमुख उद्योगपतींच्या

मौनावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, ते या विषयावर उघडपणे का बोलत नाहीत, असा सवालही त्यांनी केला आहे.सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवरील पोस्टमध्ये राहुल गांधी यांनी म्हटले आहे की, टाटा समूहाचा गुन्हेगारी पद्धतीने विनाश केला जात आहे. या घडामोडी सुरू असताना कोणताही उद्योगपती यावर एक शब्दही बोलण्याचे धाडस करत नाही. तुम्ही किती काळ गप्प राहणार आहात? जोपर्यंत ते तुम्हाला पूर्णपणे आपल्या➩(पान २ वर)

सुदानमध्ये भीषण ड्रोन हल्ल्यात १२० ठार

खारटौम : सुदानमध्ये सुरू असलेल्या गृहयुद्धादरम्यान लष्कराने केलेल्या भीषण ड्रोन हल्ल्यात १२० हून अधिक नागरिकांचा मृत्यू झाला असून ११३ जण जखमी झाले आहेत. दक्षिण दारफूरची राजधानी असलेल्या न्याला शहरातील एका गजबजलेल्या बाजारावर

सोमवारी संध्याकाळी हा प्राणघातक हल्ला करण्यात आला. इमर्जन्सी लॉयर्स या स्थानिक मानवाधिकार संघटनेने मंगळवारी या घटनेची माहिती दिली. मानवाधिकार संघटनेने दिलेल्या माहितीनुसार, बाजारात नागरिकांची मोठी गर्दी असताना अचानक ड्रोनद्वारे बॉम्बवर्षाव करण्यात आला. यामुळे संपूर्ण बाजारपेठेत रक्ताचा सडा पडला होता. या हल्ल्यात बळी पडलेल्यांमध्ये महिला आणि लहान मुलांची संख्या सर्वाधिक आहे. या संघटनेने या भीषण हल्ल्याचा तीव्र निषेध करत सुदानी लष्कराला जबाबदार धरले असून, आंतरराष्ट्रीय स्तरावर या घटनेची स्वतंत्र चौकशी करण्याची मागणी केली आहे. आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संस्था डॉक्टर्स विदाऊट बॉर्डर्स ने सांगितले की, न्याला येथील त्यांच्या➩(पान २ वर)

केंद्राने महागाई भत्ता ३% वाढवून ६३% केला

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- दिवाळीपूर्वी केंद्र सरकारने कर्मचारी आणि पेन्शनधारकांसाठी महागाई भत्ता ३% ने वाढवला आहे. मंगळवार, २८ ऑक्टोबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत



DA वाढीचा निर्णय घेण्यात आला. या वाढीनंतर महागाई भत्ता ६०% वरून ६३% होईल. याचा लाभ सुमारे ४८ लाख कर्मचारी आणि ६८ लाख पेन्शनधारकांना मिळणार आहे. नवीन दर १ जुलैपासून लागू मानले जातील. सरकार यासाठी १० हजार कोटी रुपये खर्च करणार आहे. यापूर्वी सरकारने एप्रिलमध्ये कर्मचाऱ्यांच्या DA मध्ये आणि पेन्शनधारकांच्या DR मध्ये २ टक्क्यांनी वाढ केली होती. त्या वाढीनंतर DA चा दर ६०% वर पोहोचला होता. आता ३ टक्क्यांच्या ताज्या वाढीनंतर हा आकडा ६३% झाला आहे.

१ व १० वरिल उर्वरित

विधान परिषद निवडणुकीत महाविकास

कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. स्थानिक पातळीवरील संपर्क, मतदारांशी साधलेला संवाद आणि नियोजनबद्ध प्रचार यांचा या विजयात महत्त्वाचा वाटा असल्याचे राजकीय विश्लेषकांचे मत आहे.

पुणे पदवीधरमध्ये हर्षदा जाधव देशमुख यांची बाजी- पुणे पदवीधर मतदारसंघात नवख्या असलेल्या हर्षदा जाधव-देशमुख यांनी भाजपच्या उमेदवार स्मिता जाधव यांच्यावर मात करत विजय संपादन केला. तळागाळातील मतदारांपर्यंत पोहोचण्यावर भर देत त्यांनी प्रचारात सातत्य राखले. प्रत्यक्ष मतदारांशी संपर्क साधण्याची रणनीती आणि सूक्ष्म नियोजन यामुळे त्यांना यश मिळाल्याचे चित्र दिसून आले.

या निकालाने केवळ प्रस्थापित राजकीय ताकदीवर निवडणूक जिंकता येत नाही, तर मतदारांशी थेट संपर्क आणि संघटनात्मक बांधणीही तितकीच महत्त्वाची असते, हे पुन्हा अधोरेखित केले.

अमरावतीत शिंदे सेनेची सरशी- अमरावती शिक्षक मतदारसंघात शिंदे गटाचे किरण सरनाईक यांनी भाजपच्या उमेदवारासह स्वपक्षातील बंडखोर उमेदवारांवर मात करत विजय मिळविला. काँग्रेसमधील अंतर्गत मतभेद आणि संघटनात्मक समन्वयाचा अभाव याचा फटका काँग्रेसच्या उमेदवार आदिती पवार यांना बसल्याचे चित्र समोर आले. या निकालामुळे महायुतीला आणखी एका जागेवर यश मिळाले. मात्र, राज्यातील इतर महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये झालेल्या पराभवामुळे या विजयाचा राजकीय फायदा मर्यादित राहिल्याचे मानले जात आहे.

नागपूरमध्ये भाजपला मोठा धक्का!- भाजपचा पारंपरिक बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या नागपूर पदवीधर मतदारसंघातील निकालाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. भाजपचे उमेदवार सुधाकर कोहळे यांना पहिल्या पसंतीच्या मतमोजणीत आघाडी मिळाली असली, तरी अवैध मतांची संख्या अधिक असल्याने त्यांना अपेक्षित मतांचा कोटा पूर्ण करता आला नाही. परिणामी, दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी निर्णायक ठरली. दुसऱ्या पसंतीच्या मतांच्या मोजणीत काँग्रेसचे विद्यमान आमदार अभिजीत वंजारी यांनी आघाडी घेतली. नितेश कराडे यांच्या दुसऱ्या पसंतीच्या मतांचा त्यांना फायदा झाल्याने विजयाचे पारडे काँग्रेसच्या बाजूने झुकले. नागपूरसारख्या भाजपच्या मजबूत राजकीय आधारक्षेत्रात मिळालेला हा धक्का पक्षासाठी आत्मपरीक्षणाची वेळ आणणारा ठरला आहे. पहिल्या पसंतीच्या मतांतील आघाडी विजयाची हमी देत नाही, हे या निकालाने पुन्हा स्पष्ट केले.

पुणे शिक्षक मतदारसंघात

शिवसेनेचे उमेदवार सचिन सानप यांनी आपली प्रतिक्रिया माध्यमांसमोर व्यक्त केली आहे. तर विजयी उमेदवार होणाऱ्या कौस्तुभ गावडे यांचं सचिन सानप यांनी अभिनंदन केलं आहे. मुख्य लढत ही भाजपचे उमेदवार कौस्तुभ गावडे आणि माझ्यात होती, त्यामुळे मतांच्या विभागणीचा प्रश्नच येत नाही अशी प्रतिक्रिया सचिन सानप यांनी दिली आहे.पैसे वाटपांच्या आरोपावर बोलताना सचिन सानप म्हणाले, शिक्षकांना बदनाम करण्याचा प्रयत्न कोणीही करू नये, एक खंत मनात आहे की शिक्षकांनी शिक्षक आमदार निवडला नाही. कौस्तुभ गावडे यांच्या विजयाची घोषणा काही वेळात होईल. पण आम्ही शिक्षकांच्या प्रश्नांसाठी काम करतच राहू. पुढे बोलताना सानप म्हणाले, प्रत्यक्ष आकडे बाहेर यायचे आहेत, पण १७ हजारांपेक्षा जास्त मतदान या निवडणुकीमध्ये मला माझ्या शिक्षक बंधुभगिनींनी मला दिलं, मोठा मतदारसंघ होता. पाच जिल्हे होते, ५८ तालुके होते, आणि सर्व शिक्षकांनी विश्वास दाखवला, कालावधी कमी मिळाला पण तरीदेखील त्यांनी विश्वास दाखवला, सर्व प्रयत्न केले, दरम्यानच्या काळात एकनाथ शिंदे, उदय सामंत, शंभुराजे देसाई, प्रकाश आबिटकर, शिवसेना पक्ष आणि आमदार, खासदार, शिवसेनेचे पदाधिकारी यांनी मोठी ताकद माझ्यामागे उभी केली, या सर्वांमुळे मोठी मजल मारू शकलो, त्यांचे मी आभार व्यक्त करतो,
कौस्तुभ गावडे निवडून येत आहेत असं निकालावरून दिसून येतंय, थोड्या वेळात निकाल जाहीर केला जाईल. त्यांना मी शुभेच्छा देतो, खेळीमेळीमध्ये या निवडणुकीला आम्ही सामोरे गेलो, आम्ही नवखे होतो, पण पाहिला चांगला प्रयत्न केला, थोडं कमी पडलो, पण आमचं कार्य, शिक्षकांचे प्रश्न पुढेही मांडत राहू असंही पुढे सचिन सानप यांनी म्हटलं आहे.

अर्णवमुळे आंध्राच्या

दुसरी नैऋत्य बंगालच्या उपसागरातील कमी दाबाचे क्षेत्र. काही मॉडेल्सनी असे सूचित केले आहे की हे वादळ तीव्र होऊन अर्णबभोवती फिरू शकते आणि शक्यतो आंध्र-ओडिशा सीमेवर पोहोचू शकते.

टाटा समूहाचा गुन्हेगारी

ताब्यात घेत नाहीत तोपर्यंत? भारतीय उद्योग हे मोदी आणि शाह यांचे खेळणे नाही. तुमच्यात धैर्य नाही, पण आमच्यात आहे. आम्ही या गुन्ह्यांसाठी न्याय मिळवून देऊ असेही त्यांनी म्हटले आहे. एन. चंद्रशेखरन यांची १७ सप्टेंबर २०२६ रोजी आणखी पाच वर्षांसाठी टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून फेरनियुक्तीचा ठराव बोर्ड बैठकीत मंजूर झाला होता. टाटा ट्रस्टचे अध्यक्ष नोएल टाटा यांनी या फेरनियुक्ती करण्याच्या ठरावाला आव्हान दिले आहे. नोएल यांनी सोमवारी टाटा सन्सचे कंपनी सचिव सुप्रकाश मुखोपाध्याय यांना पत्र लिहून असा युक्तिवाद केला की, ही फेरनियुक्ती अवैध आहे, कारण ती बैठकीच्या अजेंड्यात समाविष्ट नव्हती.

सुदानमध्ये भीषण ड्रोन

रुग्णालयात ३६ मृतदेह आणण्यात आले होते, तर सुमारे ११३ जखमींवर आपत्कालीन कक्षात उपचार सुरू आहेत. न्याला शहरावर सध्या निमलष्करी दल रॅपिड सपोर्ट फोर्सेस चे नियंत्रण आहे. एप्रिल २०२३ पासून सुदानी लष्कर आणि आरएसएफ यांच्यात देशाच्या सत्तेवरून रक्तरंजित संघर्ष सुरू आहे. दोन्ही बाजूंनी स्फोटकांनी भरलेल्या ड्रोनचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढवला असून रुग्णालये, शाळा, बाजारपेठा, धरणे आणि निर्वासितांच्या छावण्यांना सातत्याने लक्ष्य केले जात आहे. संयुक्त राष्ट्रांनीही या वाढत्या ड्रोन हल्ल्यांमुळे नागरिकांच्या जीवावर ओढवलेल्या संकटाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली आहे.

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून

लागली. विजयाच्या अंतिम निकालासाठी दुसऱ्या पसंतीक्रमाच्या मतांची मोजणी तब्बल ३३ तास म्हणजे दुसऱ्या दिवशी बुधवार २८ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ५ वाजेपर्यंत चालली. त्यानंतरच अंतिम चित्र स्पष्ट झाले. अपेक्षित मतांचा कोटा पूर्ण न झाल्याने दुसऱ्या पसंतीक्रमाच्या मतांची मोजणी करून २६ पैकी २४ उमेदवारांना बाद फेरीत बाद करीत त्या-त्या उमेदवारांची मते वर्ग करण्यात आली. त्यामुळे निवडणूक निकाल अधिक शिगेला पोहोचला. शिवसेनेचे विजयी उमेदवार सरनाईक किरण रामराव यांना भारत निवडणूक आयोगाच्या वतीने निवडणूकीत विजयी झाल्याचे घोषित करून यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे आणि निवडणूक निरीक्षक अभय महाजन यांनी प्रमाणपत्र प्रदान केले. बाद फेरीअखेर दुसऱ्या पसंतीची इतरांची मते समाविष्ट झाल्यानंतर. त्या-त्या बाद फेरीअखेर सर्वाधिक मते मिळविण्या-या दोन उमेदवाराव्यतिरिक्त सर्व २४ उमेदवार क्रमाने बाद होत गेले आणि त्यांच्या मतपत्रिकेतील दुसऱ्या पसंतीक्रमाची मते त्या-त्या उमेदवाराकडे वर्ग होत गेली. त्यामुळे सर्वाधिक मते मिळवणा-या व अपेक्षित कोटा पूर्ण करणा-या उमेदवाराला शेवटी विजयी घोषित करण्यात आले. या निवडणूक निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. डॉ. श्रीकांत देशपांडे यांच्या ७०१७ मतांमधून २४ व्या बाद फेरीअखेर दुसऱ्या पसंतीची ३००२ मते घेवून सरनाईक यांनी विजयासाठी आवश्यक असलेला १६१३४ मतांचा कोटा पुर्ण करीत १६६६३ मते घेतली. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सहकार्य केलेल्या सर्व अधिकारी-कर्मचारी, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणा-या पोलीस यंत्रणेचे तसेच प्रसार माध्यम प्रतिनिधींचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे यांनी यावेळी आभार व्यक्त केले.

ॲड.मनीषा बडगे यांच्या

ही मुलगी अशी दोन अपत्ये आहेत. मनीषा बडगे या एलएलएम पदवीधर असून व्यवसायाने वकील होत्या. त्या अमरावतीतील आदर्शनगर, मालटेकडी येथील व्यंकटराव खोब्रागडे यांच्या कन्या होत्या. गत १७ ऑक्टोबर रोजी त्या आपल्या आईला भेटण्यासाठी अमरावतीत आल्या होत्या. त्यांच्या आईवर रुग्णालयात उपचार सुरू होते. याचदरम्यान कॅम्प रोडवरील लाहोटी रुग्णालयासमोर सिटी बसची धडक बसल्याने मनीषा बडगे गंभीर जखमी झाल्या.

अपघातानंतर मनीषा बडगे यांना जखमी अवस्थेत प्रथम जिल्हा सामान्य रुग्णालय, इर्विन येथे नेण्यात आले. तेथे त्यांच्या प्रकृतीची गंभीर स्थिती पाहून डॉक्टरांनी त्यांना दाखल करून घेण्यास कथितरीत्या नकार दिल्याचे सांगण्यात येते. त्यानंतर नातेवाईक आणि परिचितांनी त्यांना सुपर स्पेशालिटी रुग्णालयात नेले. मात्र, तेथेही खाट उपलब्ध नसल्याने त्यांना बडनेरा रोडवरील रिम्स रुग्णालयात दाखल करण्यात आले.डॉ. स्वरूप गांधी यांनी मनीषा यांना वाचविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. त्यांच्या मेंदूला गंभीर दुखापत झाल्याने शस्त्रक्रियाही करावी लागली. मात्र, त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. गेल्या दहा दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरू होते. मनीषा यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची शक्यता कमी असल्याचे रिम्स रुग्णालयाचे डॉ. श्याम राठी आणि त्यांच्या पथकाच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी कुटुंबीय, त्यांचे पती प्रा. सागर बडगे आणि भाऊ नीलेश खोब्रागडे यांच्याशी संपर्क साधला. मनीषा यांना मेंदूमृत घोषित करण्याच्या स्थितीबाबत त्यांना माहिती देण्यात आली.आवश्यक तीन चाचण्या पूर्ण केल्यानंतर मंगळवारी सायंकाळी ५ वाजून ४१ मिनिटांनी मनीषा यांना मेंदूमृत घोषित करण्यात आले. या कठीण प्रसंगी कुटुंबीयांनी दुःखावर मात करत अवयवदानासाठी संमती दिली. त्यांच्या या निर्णयामुळे पाच जणांना नवजीवन मिळण्याची संधी निर्माण झाली.

डॉक्टरांनी रात्रभर केले अथक प्रयत्न- बडगे आणि खोब्रागडे कुटुंबीयांकडून अवयवदानाची संमती मिळाल्यानंतर रिम्स रुग्णालयातील डॉक्टरांवर महत्त्वाची जबाबदारी आली. अवयवदानाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मनीषा यांची शारीरिक स्थिती योग्य राखणे आवश्यक होते. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागातील डॉ. सोहम घोरमाडे, डॉ. दिनेश पहलाजानी, डॉ. हितेश गुल्हाने, डॉ. विशाल बाहेकर, डॉ. राहुल पोटोडे, डॉ. विक्रम देशमुख, डॉ. प्रतीक घिरडे, डॉ. राहुल घुले, डॉ. रोहित हातगांवकर यांच्यासह संपूर्ण वैद्यकीय पथकाने अथक परिश्रम घेतले. मंगळवारी सायंकाळी ६ वाजल्यापासून बुधवारी दुपारी २ वाजेपर्यंत डॉक्टरांनी आवश्यक उपचार आणि उपाययोजना सातत्याने सुरू ठेवल्या. त्यामुळे अवयवदानाची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करता आली, अशी माहिती डॉ. श्याम राठी यांनी दिली.अवयवदानाच्या या महान कार्यासाठी जीवनज्योतचे अध्यक्ष चंद्रकांतभाई पोपट, अवयवदान प्रमुख डॉ. सिकंदर अडवाणी, नेत्रदान प्रमुख सुरेश वसानी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया प्रमुख राजूभाऊ मूंधडा, देहदान समितीचे प्रमुख डॉ. पंकज लांडे, डॉ. नंदकिशोर लोहाणा, पूरणसेठ हबलानी, ॲड. स्पॉटचे रवि इंगळे आदी उपस्थित होते. हरिना नेत्रदान समितीचे प्रा. मुकेश लोहिया, मनोज राठी, रामप्रकाश गिल्डा, राजेंद्र वर्मा, शरणपाल सिंह अरोरा, शरद कासट, रश्मी नावंदर, मोनिका उमक यांच्यासह इतर पदाधिकारीही उपस्थित होते. मनीषा यांचे नेत्रदानही करण्यात आले.या दोन्ही संस्थांच्या सहकार्यामुळे पाच जणांच्या जीवनात नव्या आशेचा किरण निर्माण झाला. अवयवदानाच्या माध्यमातून मनीषा बडगे यांनी मृत्यूनंतरही इतरांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण केला. पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी रिम्स रुग्णालयाला भेट दिली. त्यांच्या अध्यक्षतेखाली उपस्थित मान्यवरांनी अवयवदात्या ॲड. मनीषा बडगे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

ऑटो पलटल्याने वृद्ध महिलेचा

पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला असून पुढील तपास सुरू केला आहे. या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. चांगापूर परिसर हा शेत शिवारालगत असल्याने रात्रीच्या वेळी रोहीसारख्या जंगली प्राण्यांचा वावर वाढला आहे. त्यामुळे वाहनचालकांनी रात्रीच्या वेळी सावधगिरी बाळगण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

अंजनगाव सुर्जी नप कंत्राटी

नगर परिषद अंजनगाव सुर्जी यांना दिनांक २८ ऑक्टोबर २०२६ रोजी निवेदन देण्यात आले. मागण्यांचा गांभीर्याने विचार न झाल्यास सर्व सफाई कामगार दि.३ नोव्हेंबर रोजी नगर परिषद कार्यालय अंजनगाव सुर्जी समोर आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी अमरावती, तहसीलदार अंजनगाव सुर्जी, नगराध्यक्ष नगर परिषद अंजनगाव सुर्जी आणि ठाणेदार पोलीस स्टेशन अंजनगाव सुर्जी यांना पाठविण्यात आल्या आहेत.

दुचाकी चोरटा ताब्यात

रुपये आहे. माहिती नुसार श्रीकृष्ण दादाराव मकेसर (वय ३५, चपरासी पुरा) यांनी शुक्रवार बाजारातून आपली बाईक चोरीला गेल्याची तक्रार दिली होती. त्यांच्या तक्रारी वरून पोलिसांनी तपास सुरू केला होता. त्याच बरोबर ग्रे रंगाची ॲक्टिवा एमएच-२७/डीके-३०७८ चोरी झाल्याची तक्रार फ्रेजरपुरा ठाण्यात अपराध क्रमांक ९५३ अंतर्गत नोंदविण्यात आली होती. पथकाने आरोपी रोहन इंगळे याला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली असता त्याने दोन वाहन चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली. त्याच्याकडून होंडा बाईक एमएच-२७/वाय-९१७४ आणि ॲक्टिवा अशा दोन्ही गाड्या जप्त करण्यात आल्या आहेत.

कालव्यात शेतकरी गेला वाहून

सायंकाळपर्यंत बचाव पथकाने कालव्यात शोध मोहीम राबविली.मात्र ते मिळून आले नाही.यावेळी घटनास्थळी तहसीलदार डॉ. मयूर कळसे, नायब तहसीलदार नरेंद्र कुरळकर, मंडळ अधिकारी चंद्रशेखर आगरकर, तलाठी प्रकाश वाट,वैभव देशमुख, कोतवाल बाळासाहेब घुरडे, अजय खाकसे,आपदामित्र संदीप दहाट उपस्थित होते. वृत्तलिहोस्तर बचाव व शोध पथकाची शोध मोहीम सुरु होती.

दिवाकर माहोरे यांच्याकडे चार एकर शेती असून याच शेतीतून येणाऱ्या उत्पन्नातुन ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. घरातील कर्ता पुरुष कालव्यात वाहून गेल्याची माहिती समजताच कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या पच्छात पत्नी व दोन मुली असा परिवार आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची

कलम ७३ (क) (क) नुसार हा निर्णय घेण्यात आला आहे. दुष्काळ आणि बचाव कार्यासाठी महसूल, कृषी, पशुसंवर्धन, सहकारिता, ग्रामविकास, जलापूर्ती आणि जलसंधारण सह विविध विभागांच्या अधिकारी-कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त जबाबदारी टाकण्यात आली आहे. अशा परिस्थितीत सहकारी संस्थांच्या निवडणुकीत सरकारी अधिकारी-कर्मचारी गुंतल्यास दुष्काळी कामावर परिणाम होईल, तसेच शेतकऱ्यांनाही निवडणूक प्रक्रियेत सहभागी होण्यास अडचण येईल, या कारणामुळे निवडणुका स्थगित करण्यात आल्या आहेत.

९ किलो गांजासह दोघे जेरबंद

हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गाडगेनगर पोलिस ठाण्यात एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. दुसऱ्या एका गोपनीय माहितीच्या आधारे ऑक्सिजन पार्क परिसरात गांजा विक्रीसाठी आणणाऱ्या मुकेश ज्ञानेश्वर पळसकर (वय ४४, रा. महादेव खोरी) याला गुन्हे शाखेने रंगेहात पकडले. त्याच्या ताब्यातून २.५० लाख रुपये किमतीचा ५.००५ किलो गांजा जप्त करण्यात आला. याप्रकरणी फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, श्याम घुगे व प्रांजली सोनवणे व सहायक आयुक्त नीलेश ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिनेश दहातोंडे व अतुल वर यांच्या नेतृत्वात सहायक पोलिस निरीक्षक मनीष वाकोडे व दशरथ आडे, पोलिस उपनिरीक्षक फिरोज खान व त्यांच्या पथकाने केली.

किर्तनकार समाजाचा पट

तत्वज्ञानाच्या जीवनातला सर्वांकश विचारावर भाष्य करणारा ग्रंथ असेल तर राष्ट्रसंतांचा लहर की बरखा हा ओवीबद्ध अनुभव आहे. राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज हातात खंजिरी घेवून मेलेल्या समाजाला जागृत करतांना म्हणायचे 'अरे उठा उठा श्रीमंतांनो, अधिकाऱ्यांनो, पंडितांनो, सुशिक्षीतांनो साधुजनांनो हाक आली क्रांतीची।' आणि क्रांतीची हाक जनसामान्यापर्यंत पोहचविणारा कोणता दुवा असेल तर ते कीर्तनकार आहे. कीर्तनकार नुसतं कारमध्ये फिरणारा नसावा. तर समाजाला आकार देणारा असावा असे ठाकरे म्हणाले.

PUBLIC NOTICE
IN THE COURT OF CIVIL JUDGE (S.D.)
BELAPUR AT BELAPUR

MISC. CIVIL APPLICATION No. 1703/2026 — Exh.7, N.D-05/12/26

SMT.ANJALI VINOD JIRAPURE
W/o LATE MR. VINOD GUNWANTRAO JIRAPURE
Age 34 years, Occupation - Housewife ... Applicant
V/s.
MR.RUCHEYU VINOD JIRAPURE
S/O LATE MR.VINOD GUNWANTRAO JIRAPURE
Age 34 years, Occupation - Service
MS. ANUSHKA VINOD JIRAPURE
D/O LATE MR.VINOD GUNWANTRAO JIRAPURE
Age 32 years, Occupation - Service
SMT. SUSHILA GUNWANTRAO JIRAPURE
M/O LATE MR.VINOD GUNWANTRAO JIRAPURE
Age 91 years, Occupation - Housewife ...Opponents

Whereas the applicant above named have filed a Misc. Application 1703/2026 for granting Heirship Certificate pertaining the immovable intestate owned by LATE MR. VINOD GUNWANTRAO JIRAPURE died intestate on 10/09/2026 at UMC Hospital, Sector-4, Nerul, Navi Mumbai-400706. He is lawful owner following properties:
1) Apartment No.E-2/0:2, Ground Floor, Flat No.2, Annapurna Co-operative Housing Society Ltd., Sector-48, Nerul, Navi Mumbai-400706, Tal. & Dist. Thane, admeasuring 50.070 Sq.mtrs. Built Up, valued at Rs.6,62,666/- (Rupees Six Lakhs Sixty Two Thousand Six Hundred Sixty Six Only) which is purchased vide Conveyance Deed Registered Document No.TNN-03-2353/1999 dated 30/03/1999.
2) At Rajura, Pragane- Manjarkhed, Tal.& Dist. Amravati, Agriculture Land Survey No.31/1/B (Registered 7/12 Survey No.31/1/B/1, Girolkar Vihar, Plot No.13, area 99.20 Sq.mtrs. Rs.2,35,000/- (Rupees Two Lakhs Thirty Five Thousand Only) which is purchased vide Sale Deed Registered Document No.AMT-2909/2025 dated 07/05/2025.
and Whereas if any person have any objection for the same hereby invited to submit his/her objection in the Court of Civil Judge S.D. Belapur within the period of 30 days from the date of publication of this Public Notice. And such noting received within period of 30 from the date of publication of this notice Misc Application No. 1703 of 2026 shall be allowed. Given under my hand & seal at this Court dated 27/10/2026.

Sd/- Jr. Clerk — Court seal — By order Sd/- Asst. Superintendent, Civil Court, S.D. Belapur

---

जाहीर नोटीस
विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती

आर.एम.जे.सी.क्र.४९९/२०२६ — ने.ता.०४.१२.२०२६

अर्जदार ः
१. **शालीकराम व्यंकटराव गवई,** वय ८५ वर्षे, व्यवसाय - निरंक
२. **सुखदेव शालीकराम गवई,** वय ६२ वर्षे, व्यवसाय- मजुरी
अर्जदार क्र.१ व २ रा.आसेगांव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
३. **वासुदेव शालीकराम गवई,** वय ५६ वर्षे, व्यवसाय- मजुरी
रा.प्लॉट नं.८, खाडगांव रोड, निर्मल नगर, नागपुर, ता.जि.नागपूर
४. **ज्योती राजु उमक,** वय ५१ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.घर क्र.४/२१७४, छत्री कम्पाउंड, तिस-या पेट्रोल पंप जवळ, डहानु रोड, इस्ट ठाणे
५. **प्रतिभा रामराव इंगोले,** वय ५४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.वार्ड क्र.३, सरकारी आश्रम शाळा, टेंबली, ता.धारणी, जि.अमरावती
६. **रेखा रामदास भटकर,** वय ६४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.समशेरपुर, पो.अंजनगाव सुर्जी, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती
७. **विनोद शालीकराव गवई, (मय्यत) तर्फे वारस**
७अ) **तेजस विनोद गवई,** वय २५ वर्षे, व्यवसाय- मजूरी
रा.जवळा शहापूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
८. **कलावंती बाबाराव सदांशिव (मय्यत) तर्फे वारस**
८अ) **मनिष बाबाराव सदांशिव,** वय ४० वर्षे, व्यवसाय- मजूरी
८ब) **दिनेश बाबाराव सदांशिव,** वय ४५ वर्षे, व्यवसाय- मजूरी
८क) **माया उमेश खंडारे,** वय ३५ वर्षे, व्यवसाय- घरकाम
अर्जदार क्र. ८अ) ते ८क) रा.धामणगांव गढी, ता.अचलपूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार वरील ठिकाणी राहतात. **मृतक ताईबाई शालिकराव गवई** यांचा **मृत्यू दि.२६/१२/२०१५** रोजी रा.आसेगाव पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक कलावंती बाबाराव सदांशिव** हिचा **मृत्यू दि.०१/०१/१९८९** रोजी रा.धामणगाव गढी, ता.अचलपूर, जि.अमरावती येथे झालेला आहे. त्यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४९९/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााणपत्र देण्यात येईल.

आज दि. .२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२१५३/२०२६
लाजवंती व चार वि.निरंक
पुढील ता.१६.११.२०२६

अर्जदार ः-
1. **Lajwanti Mahesh Jhamnani (wife)**
Aged 64 yrs. Occ.- Housewife
R/o. Lane No.1, Madhav Nagar, Rampuri Camp,
Shivaji Nagar, Amravati
2. **Kavita Gopal Waswani (Married Daugher)**
(Prior marriage -kavita @ Varsha Mahesh Jhamnani
Age 40 yrs. Occ.- Housewife
R/o. Plot No. 39, Mitrakunj Housing Society,
Near VWS College Sakhari Road, Dhule, Tq. & Dist. Dhule
3. **Roshan Maheshalal Jhamnani (Son)**
Age 38 yrs. Occ.- Private Work
4. **Puja Maheshalal Jhamnani (Daughter)**
Age 39 yrs. Occ.- Education
5. **Vijay Maheshalal Jhamnani (Son)**
Age 35 yrs. Occ.- Private Work
All R/o. Lane No.1, Madhav Nagar, Shivaji Nagar, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Maheshalal Motiram Jhamnani** हे दिनांक **१२.०७.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाल्या. अर्जदार **Lajwanti Mahesh Jhamnani (wife) + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Lajwanti Mahesh Jhamnani (wife) + 4** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१६.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२१०३/२०२६
शांता व चार वि.निरंक
पुढील ता.३१.१०.२०२६

अर्जदार ः-
1. **Shanta Ramrao Baraskar,** Aged about 84 yrs. Occ.-Household
R/o. Qtr.No. C.D. 602, Sector 02,
H.E.C. Colony, Dhurwa, Rachi Jharkhand
2. **Usha Chandrashekhar Magarde**
Aged about 63 yrs. Occ.- Household
R/o. 609/9B, Saket Nagar, Bhopal, H.E. Hospital, Bhopal (M.P.)
3. **Vandana Ramrao Baraskar,** Aged about 54 yrs. Occ.- Household
R/o. Quarters no. C.D. 602, Sector 02, HEC Colony,
Dhurwa, Rachi Jharkhand
4. **Asha Surendra Deshmukh,** Aged about 64 yrs. Occ.- Household
R/o. Plot No.4, Shanti Niketan Society, Middle Ring road (Paralla)
b/h. Canara Bank Ranapratap Nagar, Nagpur
5. **Nisha Shashank Sonare,** Aged about 61 yrs. Occ.- Household
R/o. 18 A, Shiv Apartment, Near DIG Bangala, Camp, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Ramrao Krishaji Baraskar** या दिनांक **२८.११.२०२३** रोजी **झारखंड** येथे मयत झाले. अर्जदार **Shanta Ramrao Baraskar + 4** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Shanta Ramrao Baraskar + 4** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१५.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर
अमरावती यांचे न्यायालयात

जाहीरनामा/सायटेशन

किरकोळ अर्ज क्र.२२२२/२०२६
पुष्पलता व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

अर्जदार ः-
1. **Pushpalata Prakashchand Sarvaiya,**
Age 74 yrs. Occ.-Household
R/o. Galli No.1, Old Cotton Market Road, Chitra Chowk, Amravati
2. **Ajeta Gurudayal Sahu ,** Age 57 yrs. Occ.- Household
R/o. Near Chhatrapati Balaji Mandir, Sakkarsath, Amravati
3. **Vijeta Surendra Jaiswal,** Age 59 yrs. Occ.- Household
R/o. W/o. Surendra Jaiswal 3 Ward No. 22, Pandharkawada Road
Itwara Chowk, Yavatmal
4. **Anish Prakashchand Sarvaiyya,** Age 55 yrs. Occ.- Business
R/o. C/o. Prakashchandra Sarvaiyya Mangal Murti Colony
Sai Nagar, Amravati
5. **Manish Prakashchand Sarvaiyya,** Age 54 yrs. Occ.- Business
R/o. Old Cotton Market Road, Chitra Chouk, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार ः- NIL

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत प्रकाशचंद्र मोतीलाल सरवैया** हे दिनांक **२०.०४.२०२६** रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **पुष्पलता व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **पुष्पलता व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२२.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहायक अधीक्षक**, दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या
प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.६३/२०२६, — ने.ता.०१/१२/२०२६

अर्जदार- **सना फिरदोस मोहम्मद शफी,** वय १८ वर्ष, व्यवसाय - शिक्षण
रा.नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- **ग्रामपंचायत नांदसावंगी मार्फत सचिव (ग्रामसेवक)**
ग्रामपंचायत कार्यालय नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म ०१/०९/२००८ रोजी नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. त्यांचे जन्म नोद ही अनावधानाने नोंदणी करण्याची राहिली आहे. अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आलेले नसल्या कारणाने त्यांची जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये जन्माची नोंद आदेश होण्याकरिता वि. दिवाणी न्यायालयात दिनांक ०५/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक ०१/१२/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक /१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**, सही/-, **(सहाय्यक अधिक्षक)**, दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय (क.स्तर) नांदगाव खंडेश्वर जिल्हा अमरावती
जन्म/मृत्यू नोंदणीचा आदेश होण्याकरिता दाखल केलेल्या
प्रकरणाचा जाहिरनामा

किरकोळ फौजदारी अर्ज क्र.६४/२०२६, — ने.ता.२९/१०/२०२६

अर्जदार- **अनिसाबेगम आबिद खान,** वय ६५ वर्ष, व्यवसाय - गृहिणी
रा.अल हिलाल कॉलनी, अमरावती, ता.अमरावती, जि.अमरावती

... विरुध्द...

गैरअर्जदार- **ग्रामपंचायत नांदसावंगी मार्फत सचिव (ग्रामसेवक)**
ग्रामपंचायत कार्यालय नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म ०८/०६/१९६१ रोजी नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे झाला. त्यांचे जन्म नोंद ही अनावधानाने नोंदणी करण्याची राहिली आहे. अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत नांदसावंगी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती यांचे जन्म व मृत्यू रजिस्टर मध्ये करण्यात आलेले नसल्या कारणाने त्यांची जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अ अन्वये जन्माची नोंद आदेश होण्याकरिता वि. दिवाणी न्यायालयात दिनांक ०५/१०/२०२६ रोजी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी उपरोक्त अर्जावर ज्या कोणास काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २९/१०/२०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय क.स्तर व प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ता.नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर, निर्दिष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उपरोक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज दिनांक /१०/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

शिक्का — **आदेशानुसार**, सही/-, **(सहाय्यक अधिक्षक)**, दिवाणी व फौजदारी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर

जाहीर नोटीस

प्रो.नं.२६२९/२०२६
दिवाणी न्यायालय व.स्तर, दर्यापूर
दि.२१.१०.२०२६

वि.दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर, जि.अमरावती येथील
ए.एम.जोशी, २ रे सह दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

किरकोळ अर्ज क्र.४१४/२०२६ — ने.ता.०१.१२.२०२६

अर्जदार -
१. कविता सुभाष वानखडे, **वय ५५ वर्षे, धंदा - मजुरी**
२. मनिषा सुभाष वानखडे, **वय ३० वर्षे, धंदा - शिक्षण**
दोन्ही रा.व्दारा सुभाष वानखडे, विटा-भटटी जवळ, आशियाना क्लब,
बिच्छु टेकडी, अमरावती, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वांना कळविण्यात येते की, सुभाष महादेव वानखडे **हे दिनांक २३.११.२०२१ रोजी मरण पावले आहेत.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII १८२७ चे कलम २ प्रमाणे **वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यास येउन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.**

आज दि.२१.१०.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, **सहाय्यक अधीक्षक (प्रशा.)**, दिवाणी न्यायालय, व.स्तर, दर्यापूर

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय
अकोला । वाशिम । बुलडाणा
■ गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

'स्मार्ट मॉडेल व्हिलेज' उपक्रम देशव्यापी चळवळ व्हावा!

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचा ५८ वा स्थापना दिवस उत्साहात

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भारताच्या सक्षमीकरणासाठी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाने सुरू केलेला 'पीडीकेव्ही स्मार्ट मॉडेल व्हिलेज' उपक्रम देशपातळीवरील ऐतिहासिक चळवळ ठरावा, अशी अपेक्षा भारतीय कृषी अनुसंधान परिषदेंतर्गत भारतीय कृषी वैज्ञानिक भरती मंडळाचे अध्यक्ष डॉ. संजय कुमार यांनी व्यक्त केली. या उपक्रमाची राष्ट्रीय स्तरावर दखल घेतली जाईल आणि त्यातून आत्मनिर्भर भारताच्या निर्मितीला बळ मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ५८ व्या स्थापना दिनानिमित्त कृषी महाविद्यालयातील स्व. डॉ. के. आर. ठाकरे सभागृहात आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख अध्यक्षस्थानी होते. विदर्भाच्या भूमीत कृषी विद्यापीठ स्थापन करण्यामागे भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांची दूरदृष्टी होती. गेल्या ५७ वर्षांत विद्यापीठाने काळानुरूप कृषी शिक्षण, नाविन्यपूर्ण संशोधन, प्रभावी विस्तार कार्य आणि बियाणे उत्पादनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या कार्यामुळे वैदर्भीय शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्याचे भाऊसाहेबांचे स्वप्न साकार होत असल्याचे डॉ. कुमार यांनी नमूद केले. मर्यादित मनुष्यबळातही विद्यापीठाने कार्यक्षमतेचा आदर्श निर्माण केल्याचे सांगत त्यांनी विद्यापीठाच्या कामगिरीचे कौतुक केले.

शाश्वत कृषी विकासात विद्यापीठाची मध्यवर्ती भूमिका

कृषी क्षेत्रातूनच आत्मनिर्भरतेचा मार्ग

स्थापना दिन हा विद्यापीठाच्या प्रगतीचा, परंपरेचा आणि भविष्यदृष्टीचा उत्सव असल्याचे महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. दिलीप स्वामी यांनी सांगितले. शिक्षण, संशोधन आणि कृषी विस्ताराच्या माध्यमातून विद्यापीठाने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. देशाची वाढती लोकसंख्या आणि कृषिप्रधान ग्रामीण संस्कृती लक्षात घेता विकसित व आत्मनिर्भर भारताच्या उभारणीत कृषी क्षेत्राची भूमिका निर्णायक राहणार असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाला संचालक शिक्षण तथा संशोधन डॉ. देवानंद पंचभाई, संचालक विस्तार शिक्षण डॉ. धनराज उंदीरवाडे, अधिष्ठाता कृषी अभियांत्रिकी डॉ. सुरेंद्र काळबांडे, अधिष्ठाता उद्यानविद्या डॉ. अरविंद सोनकांबळे, राहुरी कृषी विद्यापीठाच्या उद्यानविद्या शाखेचे माजी विभागप्रमुख डॉ. उल्हास देसाई, कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे यांच्यासह विविध महाविद्यालयांचे सहयोगी अधिष्ठाता उपस्थित होते.

शाश्वत कृषी विकासात विद्यापीठाची महत्त्वाची भूमिका

शाश्वत कृषी विकासात अकोला कृषी विद्यापीठाची मध्यवर्ती भूमिका असल्याचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांनी अध्यक्षीय भाषणात सांगितले. कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार कार्याच्या माध्यमातून विद्यापीठाने शेतकरी व विद्यार्थ्यांच्या हिताला प्राधान्य देत आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. केंद्र व राज्य शासन तसेच भारतीय कृषी अनुसंधान परिषदेकडून वेळोवेळी मिळालेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

'पीडीकेव्ही स्मार्ट मॉडेल व्हिलेज' ही संकल्पना शाश्वत ग्रामविकासासाठी महत्त्वपूर्ण ठरत असून विविध शासकीय, निमशासकीय, सहकारी आणि सेवाभावी संस्थांच्या एकात्मिक प्रयत्नांतून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविणे शक्य असल्याचे विद्यापीठाने कृतीतून दाखवून दिले आहे. कृषी पदवीधरांना रोजगाराभिमुख कौशल्ये मिळावीत, यासाठी शेतकरी-शास्त्रज्ञ मंच, स्पर्धा परीक्षा मंच, उद्योजकता विकास मंच आणि हायटेक ॲग्रीकल्चर मंच सुरू करण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली. विद्यापीठाच्या प्रक्षेत्रावर बियाणे उत्पादन वाढविण्यास मोठा वाव असून, त्यातून विद्यापीठाला आर्थिकदृष्ट्या आत्मनिर्भर होण्याची संधी असल्याचे डॉ. गडाख यांनी स्पष्ट केले.

गुणवंतांचा पुरस्कार देऊन गौरव

स्थापना दिनानिमित्त विद्यापीठाच्या विविध विभागांना आणि गुणवंतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. अकोला येथील कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाला उत्कृष्ट महाविद्यालयाचा, तर बुलढाणा येथील कृषी तंत्र विद्यालयाला उत्कृष्ट कृषी तंत्र विद्यालयाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभागाला उत्कृष्ट कृषी संशोधन केंद्राचा पुरस्कार मिळाला. मृदाशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. श्याम जाधव यांना उत्कृष्ट संशोधक, तर मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्राच्या रंभापूर ब्लॉकचे प्रभारी नरेंद्र हेंडजकर यांना उत्कृष्ट प्रक्षेत्र व्यवस्थापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. उत्कृष्ट कृषी विज्ञान केंद्राचा पुरस्कार भंडारा जिल्ह्यातील साकोली कृषी विज्ञान केंद्राला देण्यात आला.

महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांमधून प्रथमच भारतीय कृषी अनुसंधान परिषदेत 'एमेरिटस प्रोफेसर' म्हणून निवड झाल्याबद्दल कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ. अशोक म्हस्के यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी कुलसचिव डॉ. सतीश ठाकरे यांनी प्रास्ताविकातून विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा घेतला. डॉ. देवानंद पंचभाई यांनी शैक्षणिक व संशोधनात्मक कामगिरीचे, तर डॉ. धनराज उंदीरवाडे यांनी विस्तार शिक्षणातील उपलब्धींचे सादरीकरण केले. यावेळी स्मार्ट मॉडेल व्हिलेज उपक्रमाची चित्रफीतही दाखविण्यात आली. वंदे मातरम्, महाराष्ट्र गीत आणि विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतींना अभिवादन केल्यानंतर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली. विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. किशोर बिडवे यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर अंतरखेड व कामरगाव येथे अपर जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील संभाव्य दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आणि जलस्त्रोतांमधून होणारा अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी प्रशासन सज्ज झाले आहे. याचाच एक भाग म्हणून कारंजा तालुक्यातील अंतरखेड व कामरगाव येथे आज २७ ऑक्टोबर रोजी अपर जिल्हाधिकारी ब्रिजेश पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत विशेष आढावा बैठक पार पडली.

या बैठकीमध्ये उपलब्ध जलसाठ्यांचे व्यवस्थापन, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि टंचाई निवारणासाठी करावयाच्या उपाययोजनांवर सखोल चर्चा करण्यात आली. दुष्काळी छायेत असलेल्या या भागात उपलब्ध पाण्याचा वापर अत्यंत काटकसरीने करण्याच्या सूचना श्री.पाटील यांनी दिल्या. तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये म्हणून पिण्याच्या पाण्याचे संवर्धनाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

अवैध पाणी उपसा करणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाई करण्याचे आणि तो रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबवण्याचे आदेश अपर जिल्हाधिकारी पाटील यांनी संबंधित यंत्रणेला दिले. पाणीटंचाईच्या या कठीण काळात प्रशासनासोबतच ग्रामस्थांनीही समन्वयाने आणि पुढाकाराने काम करण्याचे आवाहन त्यावेळी पाटील यांनी केले. यावेळी कारंजा पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पुनम राणे, नायब तहसीलदार विनोद हरणे यांच्यासह संबंधित गावांचे सरपंच, पोलीस पाटील, ग्रामविकास अधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

मातोश्री वृद्धाश्रमात चहा-बिस्किट वितरण

अकोला : सामजिक सेवेत सक्रिय अकोला जिल्हा माहेश्वरी महिला संघटनच्या वतीने मातोश्री वृद्धाश्रमात चहा-बिस्किट वितरण उपक्रम सम्पन्न झाला. विजयादशमीच्या पावन पर्वावर समाजसेवी स्व. रामनाथ मुंदड़ा यांच्या स्मृतीत व संघटनच्या अध्यक्ष शारदा लखोटिया व सचिव आरती पनपालिया यांच्या नेतृत्वात संपन्न या सेवा कार्यात वृद्धाश्रम मधील वृद्धजनाना चाय-बिस्किट प्रदान करण्यात आले. या उपक्रमात प्रेमा मुंदड़ा, पूनम मुंदड़ा, स्नेहा राठी, आकांक्षा मुंदड़ा, अशोक मुंदड़ा, सागर मुंदड़ा व विजय राठी यांचे सहकार्य लाभले असल्याचे माहिती प्रचार मंत्री पूनम मुंदड़ा यांनी दिली.

श्री शिवाजी विद्यालयात सुरक्षित बचपन अभियानांतर्गत जनजागृती कार्यक्रम

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड तालुका विधी सेवा समिती, रिसोड यांच्या वतीने सुरक्षित बचपन अभियानांतर्गत बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी तसेच बालकांच्या हक्कांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने सोमवार, दि. २६ ऑक्टोबर रोजी श्री शिवाजी विद्यालय, रिसोड येथे जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रिसोड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर पी. व्ही. सपकाळ होते. त्यांनी विद्यार्थ्यांना पोक्सो कायद्याविषयी (इ्रध्णएर्ईंमू) मार्गदर्शन करून बालकांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायदेशीर तरतुदींची माहिती दिली. रिसोडचे सहायक पोलीस निरीक्षक संतोष अघाव यांनी सायबर गुन्ह्यांविषयी मार्गदर्शन केले.

इंटरनेट आणि डिजिटल माध्यमांचा वापर करताना विद्यार्थ्यांनी सतर्क राहावे, तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक काळजी घ्यावी, याबाबत त्यांनी माहिती दिली. ॲड. श्रीमती एन. बी. भराड यांनी बालकांचे अधिकार व त्यांच्या संरक्षणासंदर्भात मार्गदर्शन केले. तर ॲड. श्रीमती एस. व्ही. इप्पर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक जानराव देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षक डिंगाबर पाचरणे यांनी केले. कार्यक्रमाला न्यायालयातील वरिष्ठ लिपिक नारायण भोयर, कमल झाटे, शाळेतील शिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अपघातग्रस्तांचे प्राण वाचविणाऱ्या श्याम सवाई यांना 'राहवीर' पुरस्कार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

रस्ते अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना वेळेवर मदत मिळावी आणि अनेकांचे अमूल्य प्राण वाचावेत, या उदात्त हेतूने गेल्या अनेक वर्षांपासून निःस्वार्थपणे कार्य करणारे कारंजा येथील श्याम रामदास सवाई यांच्या सामाजिक कार्याची केंद्र शासनाने दखल घेतली आहे. रस्ते परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या 'राहवीर पुरस्कार' योजनेअंतर्गत त्यांची पारितोषिकासाठी निवड झाली असून, त्यांना २५ हजार रुपयांचे पारितोषिक मंजूर करण्यात आले आहे. त्यांच्या या कार्यामुळे कारंजा शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

स्वतःच्या अनुभवातून उभी राहिली मदतीची चळवळ

श्याम सवाई यांनी २००७ पासून रस्ते अपघातातील जखमींना तातडीने मदत करण्याचा वसा घेतला आहे. स्वतः गंभीर अपघाताचा अनुभव घेतल्यानंतर अपघातग्रस्तांना वेळेत वैद्यकीय उपचार मिळणे किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव त्यांना झाली. याच अनुभवातून त्यांनी अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी स्वयंसेवकांच्या माध्यमातून आपत्कालीन मदतकार्य सुरू केले.

'वन कॉल, वन सेकंड, न्यू लाइफ' या संकल्पनेतून त्यांनी मदतीची ही मोहीम अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला. अपघात घडल्यानंतर जखमी व्यक्तीला तातडीने मदत मिळावी, उपचारांसाठी विलंब होऊ नये आणि केवळ वेळेवर मदत मिळाल्यामुळे एखाद्याचा जीव वाचावा, हा त्यांच्या कार्यामागील प्रमुख उद्देश आहे. त्यांच्या या सेवाकार्यातून ५ हजारांहून अधिक व्यक्तींना मदत मिळाल्याची माहिती आहे.

'राहवीर' पुरस्कारातून सेवाभावाचा गौरव

रस्ते अपघातातील जखमींना मदत करणाऱ्या नागरिकांना प्रोत्साहन देणे, नागरिकांमध्ये सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण करणे आणि अपघाती मृत्यूंचे प्रमाण कमी करण्यासाठी जनसहभाग वाढविणे, हा केंद्र शासनाच्या 'राहवीर' पुरस्कार योजनेचा मुख्य हेतू आहे. या योजनेंतर्गत पात्र मदतकर्त्यांना प्रति घटनेसाठी २५ हजार रुपयांपर्यंत पारितोषिक आणि प्रशस्तीपत्र देण्याची तरतूद आहे. श्याम सवाई यांच्या कार्याची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड ही त्यांच्या अनेक वर्षांच्या सेवाभावाचा सन्मान करणारी आहे. संकटाच्या क्षणी जखमी व्यक्तीला मदतीचा हात देणे, हेच खरे माणुसकीचे दर्शन असल्याचा संदेश त्यांच्या कार्यातून मिळतो.

अपघातग्रस्तांसाठी धावून जाण्याचा प्रेरणादायी संदेश

रस्ते अपघातानंतर सुरुवातीच्या काही मिनिटांत मिळणारी मदत जखमी व्यक्तीचा जीव वाचविण्यासाठी महत्त्वाची ठरू शकते. त्यामुळे अपघातग्रस्तांना मदत करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन परिवहन विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

श्याम सवाई यांचा हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा गौरव नसून, समाजातील प्रत्येक नागरिकाने माणुसकीच्या भावनेतून संकटग्रस्तांच्या मदतीला धावून जावे, याची प्रेरणा देणारा आहे.

इनरव्हील क्लब ऑफ अकोला नॉर्थतर्फे ध्यान शिबीर संपन्न

अकोला : इनरव्हील क्लब ऑफ अकोला नॉर्थ, डिस्ट्रिक्ट ३०३ च्या वतीने बी.एड. कॉलेज मध्ये प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी ध्यान व मेडिटेशन शिबिर घेण्यात आले. या सत्राचे संचालन क्लबच्या सदस्य व मेडीटेशन तज्ञ संजना बिलाला यांनी केले. या सत्रात संजना बिलाला यांनी विद्यार्थ्यांना ध्यानाच्या तांत्रिक व व्यावहारिक पैलूंविषयी सविस्तर माहिती दिली. दैनंदिन जीवनात मेडिटेशनचे महत्त्व, त्याचे फायदे तसेच मानसिक शांती, एकाग्रता आणि सकारात्मकता वाढवण्यात ध्यानाची भूमिका यांचे सोप्या शब्दांत स्पष्टीकरण त्यांनी दिले. तसेच विद्यार्थ्यांना ध्यानासंबंधी माहितीपूर्ण नोट्सही वाटप करण्यात आले. यानंतर तज्ज्ञांनी ध्यानाच्या प्रामाणिक पद्धतीनुसार गहन मेडिटेशनचा सराव करून दिला. विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्साहाने व आवडीने सहभाग घेतला. हे सत्र विद्यार्थ्यांनी तसेच महाविद्यालयाच्या स्टाफने खूप प्रशंसनीय मानले.

स्व. पुष्पादेवी पाटील महाविद्यालयात महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरा



■ प्रतिनिधी | रिसोड ■

स्थानिक स्व.पुष्पादेवी पाटील कला व विज्ञान महाविद्यालयात प्राचार्य डॉ. एम.एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी बोलताना प्राचार्य डॉ.एम.एन. गायकवाड यांनी अश्विन पौर्णिमेला ऋषी वाल्मिकी यांचा जन्म झाला. जळगाव जिल्ह्यातील चाळीसगाव तालुक्यात असलेले वालझरी हे गाव महर्षी वाल्मीकी ऋषींचे जन्मस्थान मानले जाते. वाल्मिकी रामायणाचे रचनाकार म्हणून प्रख्यात असलेले ऋषी होते. रामायण एक महाकाव्य आहे जे श्रीराम यांच्या जीवनातून आपणास जीवनातील सत्य, कर्तव्य, साहस यांचा परिचय देते आणि आदर्श जीवन जगण्यास मार्गदर्शन करते. त्यांनी संस्कृत भाषेत रामायणाची रचना केली. त्यांनी लिहिलेले रामायण हे संस्कृत भाषेतील सर्वप्रथम महाकाव्य मानले जाते. म्हणून वाल्मिकी यांना आद्यकवी असे सुद्धा संबोधले जाते. असे मत व्यक्त केले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा.डॉ.प्रकाश हनवते यांनी केले. आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख प्रा.डॉ. केशव कोकाटे यांनी केले.

अनुसया पंढरी अंभोरे यांचे मृत्युनंतर नेत्रदान डोळयांतुन जिवंत राहणार यांची माणुसकी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

मृत्यु हा जिवनाचा शेवट असला, तरी माणुसकीचा अंत होऊ नये, याचा आदर्श घालुन देणारे कार्य वाशिम मधिल सिव्हील लाईन येथील रहिवासी अनुसया पंढरी अंभोरे वय ८८ वर्ष यांच्या कुटुंबीयांनी केले आहे. अनुसयां पंढरी अंभोरे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी दुःखाच्या प्रसंगी धैर्याने निर्णय घेत मरनोत्तर नेत्रदान केले. त्यांच्या या निर्णयामुळे त्यांच्या डोळयामधुन गरजु व्यक्तींच्या आयुष्यात पुन्हा प्रकाश येण्याची आशा निर्माण झाली आहे.

आपल्या जिवलग व्यक्तीच्या निधनानंतर कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळलेला असतांना नेत्रदानाचा निर्णय घेणे निश्चीतच सोपे नसते. मात्र अनुसया पंढरी अंभोरे यांच्या कुटुंबीयांनी भावनिक दुःखावर मात करत सामाजीक बांधीलकी जपली. त्यांच्या या निर्णयाने सर्व स्तरातुन कौतुक होत असुन समाजात नेत्रदानाबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी हि घटना महत्वपुर्ण ठरणार आहे.

अनुसया पंढरी अंभोरे यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबीयांनी आपल्या व्यक्तीचे डोळे एखाच्या गरजु व्यक्तीच्या आयुष्यात प्रकाश आणु शकतील तर त्यापेक्षा मोठी श्रध्दांजली कोणती? या भावनेतुन नेत्रदानाचा निर्णय घेतला. या घटनेने अनुसया पंढरी अंभोरे यांच्या स्मृती कायमस्वारुपी जिवंत राहण्याबरोबरच इतरांच्या जिवनात आशेचा किरण निर्माण होणार आहे. नेत्रदानातुन मिळतो नव्या आयुष्याचा प्रकाश नेत्रदान हे दान नसुन एका गरजु व्यक्तीला दृष्टी मिळवुन देण्याची मानवतेची सेवा आहे. अनेक व्यक्तींना कॉर्नियाशी संबधीत अंधत्वामुळे दृष्टीची समस्या असते. अशा वेळी मरनोत्तर नेत्रदानातुन मिळालेल्या कॉर्नियांचा उपयोग दृष्टी पुनर्स्थापनेसाठी केला जाऊ शकतो. अनुसया पंढरी अंभोरे यांच्या मरनोत्तर नेत्रदानामुळे माणुस जातो पन त्याची माणुसकी मागे राहते, हा संदेश अधोरखीत झाला आहे. त्यांच्या कुटुंबीयांना घेतलेला हा निर्णय समाजातील इतर नागरीकांसाठीही प्रेरणादायी ठरावा, अशी अपेक्षा व्यक्ती होत आहे. मृत्युनंतर शरीर नश्वर नसले तरी एखादयाच्या आयुष्यात प्रकाश देण्याची संधी कायमची अमर ठरु शकते, याचे सुंदर उदाहरण अनुसया पंढरी अंभोरे यांच्या मरनोत्तर नेत्रदानातुन समोर आले आहे.

मनावर नियंत्रण ठेवल्यास जीवनात मोठे परिवर्तन शक्य!

कारंजा : मन चंचल असल्याने अनेक इच्छा, आकांक्षा आणि विचार मनात निर्माण होत असतात. अपेक्षेप्रमाणे गोष्टी घडल्या नाहीत की तणाव, राग आणि चिंता वाढते. अशा वेळी मनावर संयम ठेवून विचार व भावनांचे योग्य व्यवस्थापन केल्यास जीवनात मोठे परिवर्तन घडू शकते, असे प्रतिपादन नागपूर येथील डॉ. स्वाती सारडा यांनी केले.

कारंजा येथील कै. नानासाहेब दहीहांडेकर प्रांगणात सुरू असलेल्या शरद व्याख्यानमालेत २७ ऑक्टोबर रोजी 'मनाचे व्यवस्थापन' या विषयावर त्या बोलत होत्या. मनात निर्माण होणारे विचार आणि भावनांचे व्यवस्थापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन करताना डॉ. सारडा म्हणाल्या की, मनात येणारे विचार जबरदस्तीने रोखण्याऐवजी त्यांना समजून घ्यावे. त्यापैकी हितकारक विचार स्वीकारून निर्णय घेताना घाई करण्यापेक्षा चिंतनाला महत्त्व द्यावे. दैनंदिन जीवनात तणाव आणि राग निर्माण होणे स्वाभाविक असले, तरी त्यावर संयम ठेवला तर पुढील पश्चात्ताप टाळता येतो. तणाव, क्रोध आणि चिंता यांचा आरोग्यावरही विपरीत परिणाम होऊ शकतो, असे त्यांनी स्पष्ट केले.

दैनंदिन व्यवहारात मतभेद आणि वाद निर्माण होत असतात. अशा वेळी एखादी व्यक्ती रागाच्या भरात अपशब्द बोलत असेल, तर ते मनाला लावून घेण्याऐवजी त्या व्यक्तीची परिस्थिती समजून घेण्याचा प्रयत्न करावा. रागावलेल्या व्यक्तीविषयी संवेदनशीलता आणि सहानुभूती बाळगल्यास अनेक समस्या सुटू शकतात, असेही त्यांनी सांगितले. मनातील चिंता, नकारात्मक विचार आणि अस्वस्थता दूर करण्यासाठी सकारात्मक दृष्टिकोन आवश्यक आहे. प्रत्येक परिस्थितीतून चांगले घडविण्याचा प्रयत्न करावा आणि आपण जे काम करू, ते चांगल्या प्रकारे करू, असा आत्मविश्वास मनात निर्माण करावा. नकारात्मक विचारांवर मात करून सकारात्मकतेचा स्वीकार केल्यास जीवनात आनंद आणि मनःशांती निर्माण होऊ शकते, असा विश्वास डॉ. सारडा यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ. दीपिका काटोले आणि श्रीमती पियुषा भोयर यांनी वक्त्यांचे स्वागत केले. प्रमुख अतिथी डॉ. दिनेश सारडा यांचे स्वागत डॉ. शार्दुल डोनगावकर यांनी केले. डॉ. कविता मिसाळ यांनी वक्त्यांचा परिचय करून दिला. कार्यक्रमाचे संचालन व आभारप्रदर्शन डॉ. रुची फाफट यांनी केले, तर डॉ. सुशील देशपांडे यांनी शारदा स्तवन सादर केले. व्याख्यानाला श्रोत्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३३१ ■ गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

कुटकीत डेंग्यूचा घातक डंख; पाच वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू

२८ दिवसांत जिल्ह्यात डेंग्यूचे सहा रुग्ण; आरोग्य विभागाचे सतर्कतेचे आवाहन

वडनेर जनमाध्यम : हसण्या-बागडण्याच्या वयात नियतीने घात केला. अवघ्या पाच वर्षांच्या कुमुद चंद्रशेखर शेंडे या चिमुकलीचा डेंग्यूमुळे मृत्यू झाल्याने हिंगणघाट तालुक्यातील कुटकी गावावर शोककळा पसरली आहे. सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू असताना मंगळवारी रात्री तिची प्राणज्योत मालवली. चिमुकलीच्या मृत्यूने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

कुमुद ही हिंगणघाट येथील भारत विद्यालयात शिक्षण घेत होती. डेंग्यूची लागण झाल्यानंतर तिच्यावर सेवाग्राम येथील रुग्णालयात उपचार सुरू होते. मात्र, उपचारादरम्यान तिची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अपयशी ठरली. ज्या वयात तिने शिक्षण घेत आनंदाने बागडायचे, त्या वयातच तिचा दुर्दैवी अंत झाल्याने परिसरातील नागरिकही हळहळ व्यक्त करीत आहेत.

कुमुदच्या कुटुंबाची परिस्थिती अत्यंत कठीण आहे. कुटुंबात आई, आजी आणि लहान भाऊ असून, वडिलांचे छत्रही तिच्या डोक्यावर नव्हते. अशा परिस्थितीत कुटुंबातील चिमुकलीचा मृत्यू झाल्याने आई आणि आजीवर दुःखाचा मोठा आघात झाला आहे. या कुटुंबासमोर आता भावनिक

दुःखासोबतच आर्थिक संकटाचेही आव्हान उभे राहिले आहे. शासनाने या कुटुंबाची परिस्थिती लक्षात घेऊन आर्थिक मदत करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

जिल्ह्यात २८ दिवसांत डेंग्यूचे सहा रुग्ण

दरम्यान, वर्धा जिल्ह्यात डेंग्यूचा धोका वाढत असल्याचे चित्र आहे. मागील २८ दिवसांत जिल्ह्यात डेंग्यूचे सहा रुग्ण आढळले आहेत. यामध्ये वर्धा तालुक्यातील तीन, तर सेलू, आर्वी आणि हिंगणघाट तालुक्यांतील प्रत्येकी एका रुग्णाचा समावेश आहे. कुटकीतील चिमुकलीच्या मृत्यूमुळे डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजनांची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे.

डेंग्यूचा प्रसार प्रामुख्याने एडिस डासाच्या चाव्यामुळे होतो. घरातील तसेच परिसरातील साचलेल्या स्वच्छ पाण्यात या डासांची उत्पत्ती होते. त्यामुळे पाण्याच्या टाक्या झाकून ठेवणे, वापरात नसलेल्या भांड्यांतील पाणी रिकामे करणे, कुलरमधील पाणी नियमित बदलणे आणि परिसरात पाणी साचू न देणे आवश्यक आहे.

कोरडा दिवस पाळण्याचे आवाहन

डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी नागरिकांनी आठवड्यातून एक दिवस कोरडा दिवस पाळावा. ताप, डोकेदुखी किंवा अंगदुखी जाणवल्यास स्वतःहून औषधे न घेता तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आवाहन प्रभारी जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नलिनी विखे यांनी केले आहे.

वाहतूक पोलिसांचे रक्षकच बनले वादाचे केंद्र

तिवारींच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह

वरिष्ठांच्या आदेशांना केराची टोपली

वाहतूक विभागातून हटविण्याची मागणी; पोलीस अधीक्षकांनी लक्ष घालण्याची अपेक्षा

वर्धा जनमाध्यम : शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्याची जबाबदारी असलेल्या वाहतूक कर्मचाऱ्यांच्याच कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होऊ लागले तर नागरिकांनी दाद मागायची कुणाकडे? वाहतूक नियंत्रण शाखेतील तिवारी नामक कर्मचाऱ्याशी संबंधित वादाच्या घटनांमुळे हा प्रश्न चर्चेत आला आहे. वाहनचालकांशी वारंवार वाद होत असल्याचे आरोप होत असताना, संबंधित कर्मचाऱ्याच्या कार्यपद्धतीची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करावी, अशी मागणी पुढे येत आहे.

२७ ऑक्टोबर रोजी यशवंत महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारासमोर मालवाहू वाहनचालक सूरज बावळे आणि वाहतूक नियंत्रण शाखेतील कर्मचारी अनिल तिवारी यांच्यात वाद झाल्याची नोंद पोलिसांत आहे. यापूर्वीच्या ई-चलान कारवाईचा राग मनात धरून चालकाने शिवीगाळ केली आणि शासकीय कर्तव्यात अडथळा निर्माण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या प्रकरणी वर्धा शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, संबंधित कर्मचारी यापूर्वीही वाहनचालकांशी झालेल्या वादांमुळे चर्चेत आल्याचा दावा केला जात आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक विजयकुमार घुले यांनी मार्शलना शहराबाहेर जाऊन कारवाई करण्यास मज्जाव केल्याचेही सांगितले जाते. असे असताना संबंधित कर्मचारी शहराबाहेर कारवाई करत असल्याचा आरोप होत आहे. या दाव्यांची अधिकृत पडताळणी होणे आवश्यक आहे.

वाहतूक नियमांची अंमलबजावणी करताना कर्मचाऱ्यांनी कायद्याच्या चौकटीत राहून नागरिकांशी संयमाने वागणे अपेक्षित आहे. नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे; मात्र कारवाईच्या प्रक्रियेत वाद निर्माण होत असतील, तर त्याची कारणेही तपासली पाहिजेत. वरिष्ठांच्या आदेशांचे पालन झाले का, याची चौकशी होणे गरजेचे आहे. पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी या प्रकरणाची दखल घेऊन संबंधित कर्मचाऱ्याच्या कार्यपद्धतीची निष्पक्ष चौकशी करावी आणि दोष आढळल्यास नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. वाहतूक शिस्तीचा बडगा उगारताना शिस्तीचे पालन कर्मचाऱ्यांकडूनही झाले पाहिजे, हीच नागरिकांची अपेक्षा आहे.

कपाशीची बोंडे सुकली, शेतकऱ्यांची आशा संपली

पावसाच्या खंडाचा फटका, उत्पादन खर्चही निघणे कठीण, शेतकरी आर्थिक संकटात

मोई, थार, बोरखेडीसह अनेक गावांतील कपाशीची दयनीय अवस्था

आष्टी (शहीद) जनमाध्यम : आष्टी तालुक्यात पावसाने दडी मारल्याने कोरडवाहू शेतीचे भीषण वास्तव समोर आले आहे. मोठ्या कष्टाने वाढविलेल्या कपाशीच्या पिकाला फुलोऱ्यात आणि पात्या लागण्याच्या अवस्थेतच पावसाने दगा दिला. परिणामी, कडक उन्हामुळे झाडे कोमेजली असून, बोंडांची वाढ खुंटल्याने पहिल्याच वेच्यात कपाशीची उलंगवाडी होण्याची वेळ शेतकऱ्यांवर आली आहे. वर्षभराच्या उत्पन्नाची आशा मावळल्याने कुटुंबाचा उदरनिर्वाह करायचा कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा ठाकला आहे.

कपाशीच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांनी महागडे बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आणि मशागतीवर मोठा खर्च केला. मात्र, पावसाअभावी जमिनीतील ओलावा संपल्याने पिकांची वाढ खुंटली. अपेक्षित उत्पादन मिळण्याची शक्यता कमी झाल्याने केलेला खर्चही वसूल होणे कठीण झाले आहे.

मोई, थार, बोरखेडी, चामला, बंबरडा, किन्ही, पांधुर्णा, पोरगव्हाण आणि पंचाळा परिसरात कपाशीची अवस्था बिकट आहे. अनेक ठिकाणी नदी-नाले कोरडे पडल्याने सिंचनासाठी पाणी उपलब्ध नाही.

कपाशीच्या उत्पन्नातून मुलांचे शिक्षण, घरखर्च आणि शेतीचे कर्ज फेडण्याचे नियोजन शेतकरी करतात. मात्र, उत्पादन घटल्याने आर्थिक गणित कोलमडले आहे. कृषी विभागाने तातडीने शेतशिवाराची पाहणी करून नुकसानीचे वस्तुनिष्ठ सर्वेक्षण करावे आणि बाधित शेतकऱ्यांना नियमानुसार मदत मिळवून द्यावी, अशी मागणी होत आहे.

दारू-मटण न देता २४ हजार मते; कराळे मास्तरांचा भाजप-काँग्रेसला टोला

‘माझ्या नावापुढे एक लिहा सांगितलं, पोट्ट्यांनी २१ लिहिलं’

अवैध मतांवरून मिश्किल टिप्पणी

नागपूर जनमाध्यम: निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी कुणी काय केले, याची चर्चा रंगत असताना अपक्ष उमेदवार नितेश कराळे मास्तर यांनी आपल्या खास मिश्किल शैलीत राजकीय मैदान गाजवले आहे. ना दारूची पार्टी, ना मटणाची मेजवानी, ना पैशांचे आमिष, तरीही पहिल्या पसंतीची तब्बल २४ हजार २४९ मते कराळे मास्तरांच्या या मतांनी भाजप आणि काँग्रेसच्या विजयाच्या गणितात मात्र चांगलीच रंगत आणली आहे.

‘मी कुणाला दारू पाजली नाही, कुणाला मटण पार्टी दिली नाही. तरी लोकांनी माझ्यावर विश्वास टाकला,’ अशी प्रतिक्रिया कराळे यांनी समाजमाध्यमांवर प्रसारित केलेल्या ध्वनिचित्रफितीत व्यक्त केली. त्यांच्या या विधानातून मतदारांप्रती कृतज्ञता आणि प्रस्थापित राजकारणाला मिश्किल टोला, असे दोन्ही सूर उमटले.कराळे म्हणाले, मी लोकांसाठी आंदोलने केली. व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवला. त्यामुळे सभागृहातही आपण लोकांच्या प्रश्नांसाठी भांडू शकतो, असा विश्वास मतदारांना वाटला आणि त्यांनी मतदान केले. माझ्या पाठीशी उभे राहिलेले लोक निष्ठावंत आणि माझ्यावर प्रेम करणारे होते, असेही त्यांनी सांगितले.

‘पोट्ट्यांनी २१ लिहिलं’; अवैध मतांवरून विनोदी फटकारा

मतपत्रिकेवरील पसंतीक्रम नोंदविताना झालेल्या चुकांवर कराळे यांनी आपल्या खास ग्रामीण शैलीत भाष्य केले. ‘मी किती वेळा सांगितले, या पोट्ट्याले माझ्या नावापुढे एक

लिहायचे आहे; पण त्यांनी २१ लिहिले,’ असे म्हणत त्यांनी मतदारांच्या चुकीच्या पसंतीक्रमावर मिश्किल टिप्पणी केली. मतपत्रिका मोठी आणि नाव मध्यभागी असल्याने अनेक मतदारांचा गोंधळ उडाला. जवळपास आठ हजार मते अवैध ठरल्याचा दावा करीत ही मते वैध ठरली असती, तर आपल्याला सुमारे ३५ हजार मते मिळाली असती, असे कराळे यांनी म्हटले.

२४ हजार मतांचा कराळे फॅक्टर; कोहळे-बंजारींच्या निकालावर नजर

दरम्यान, नागपूर पदवीधर मतदारसंघाच्या मतमोजणीत भाजपचे सुधाकर कोहळे आणि काँग्रेसचे अभिजित वंजारी यांच्यातील लढत निर्णायक टप्प्यावर पोहोचली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, पहिल्या आणि दुसऱ्या पसंतीच्या मतांची एकत्रित स्थिती पाहता कोहळे यांना ६१ हजार १ मते, तर वंजारी यांना ५६ हजार ७३० मते मिळाली आहेत. दोघांमधील अंतर ४ हजार २७१ मतांचे आहे.

अपक्ष नितेश कराळे २४ हजार २४९ मतांसह तिसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यांच्यासह संजय थुल, सुमेध गडपायले, मंगेश वानखेडे आणि अतुल देशमुख यांच्या मतपत्रिकांच्या बाद फेऱ्या बाकी असल्याने पुढील मतमोजणी महत्त्वाची ठरणार आहे. कराळे यांच्या मतपत्रिकांवरील दुसऱ्या पसंतीची मते कोहळे किंवा वंजारी यांच्या खात्यात किती जमा होतात, यावर विजयाचे अंतर बदलू शकते. मात्र, प्रत्यक्ष मतवाटप स्पष्ट झाल्याशिवाय कोणाला किती फायदा होईल, हे सांगता येणार नाही. दारू-मटणाच्या राजकारणाला फाटा देत मिळालेली २४ हजार मते आणि अवैध मतांवरून कराळे मास्तरांनी केलेली मिश्किल टिप्पणी सध्या चर्चेचा विषय ठरली आहे. आता कराळे फॅक्टर कुणाच्या विजयाला हातभार लावतो, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

वर्ध्याच्या शैक्षणिक क्षेत्रासाठी अभिमानास्पद; १५ प्राध्यापकांची जागतिक यादीत वर्णी

स्टॅनफोर्ड-एल्सेव्हियरच्या प्रतिष्ठित यादीत स्थान; संशोधनातील योगदानाची जागतिक स्तरावर दखल

वर्धा जनमाध्यम : संशोधनातील उत्कृष्टता आणि वैज्ञानिक क्षेत्रातील योगदानाच्या बळावर अदाणी इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चच्या १५ प्राध्यापकांनी जागतिक स्तरावर मानाचा ठसा उमटविला आहे. स्टॅनफोर्ड विद्यापीठ आणि एल्सेव्हियर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जगातील टॉप २ टक्के शास्त्रज्ञांच्या प्रतिष्ठित यादीत संस्थेच्या पाच प्राध्यापकांसह दहा सहयोगी प्राध्यापकांचा समावेश झाला आहे. या यशामुळे संस्थेच्या संशोधन कार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे.

वैज्ञानिक संशोधनाचा प्रभाव, संशोधनाला मिळालेले संदर्भ, संशोधनातील उत्पादकता आणि संबंधित विषयातील योगदान अशा विविध निकषांच्या आधारे ही यादी तयार केली जाते. त्यामुळे या यादीतील स्थान संस्थेच्या संशोधन क्षेत्रातील कामगिरीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानले जात आहे.

डॉ. सोनाली चौधरी यांचा प्रथमच समावेश

यंदाच्या यादीत जवाहरलाल नेहरू मेडिकल कॉलेजच्या अधिष्ठाता डॉ. सोनाली जी. चौधरी यांचा प्रथमच समावेश झाला आहे. वैद्यकीय शिक्षण, आरोग्यसेवा आणि संशोधन क्षेत्रातील त्यांच्या

प्रयत्नांना बळ मिळाले आहे. त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेच्या व्यवस्थापनाने योगदानाची या निमित्ताने जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली आहे.

दरम्यान, डॉ. महलकुआ नाझली खतीब, डॉ. अभय एम. गायधने, डॉ. सौरभ राम बिहारी लाल श्रीवास्तव आणि डॉ. जहिरुद्दीन सय्यद क्वाझी या चार प्राध्यापकांनी सलग चौथ्या वर्षी या प्रतिष्ठित यादीत स्थान मिळविले आहे. सातत्यपूर्ण संशोधन आणि वैज्ञानिक क्षेत्रातील योगदानाच्या दृष्टीने ही कामगिरी महत्त्वाची ठरली आहे.

संस्थेच्या दहा सहयोगी प्राध्यापकांचाही या यादीत समावेश झाला आहे. प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांच्या या यशामुळे संस्थेतील संशोधनाची गुणवत्ता, शैक्षणिक सहकार्य आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याच्या सर्व प्राध्यापक आणि सहयोगी प्राध्यापकांचे अभिनंदन केले. त्यांच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि संशोधनातील योगदानाचे कौतुक करण्यात आले. या यशामुळे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर संस्थेची शैक्षणिक व संशोधन क्षेत्रातील प्रतिष्ठा अधिक दृढ होण्यास मदत होणार आहे.

सीसीआयच्या कापूस खरेदीसाठी नावनोंदणीची ३१ ऑक्टोबर अंतिम मुदत

‘कपास किसान ॲप’द्वारेही करता येणार नोंदणी

सेलू जनमाध्यम : कापूस हंगाम २०२६-२७ मध्ये भारतीय कापूस महामंडळाच्या (सीसीआय) माध्यमातून कापूस विक्री करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांसाठी नावनोंदणीची अंतिम मुदत ३१ ऑक्टोबर निश्चित करण्यात आली आहे. सिंदी (रेल्वे) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कार्यक्षेत्रातील ज्या शेतकऱ्यांनी अद्याप नोंदणी केलेली नाही, त्यांनी मुदतीपूर्वी प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन बाजार समिती प्रशासनाने केले आहे.

सीसीआयच्या माध्यमातून कापूस खरेदीला १५ ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे. शासकीय खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी शेतकऱ्यांनी आवश्यक नावनोंदणी करणे गरजेचे आहे. त्यामुळे शेवटच्या दिवसापर्यंत प्रतीक्षा न करता शेतकऱ्यांनी वेळेत नोंदणी पूर्ण करावी, असे बाजार समितीने स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांना नावनोंदणी करणे सुलभ व्हावे, यासाठी ‘Kapas Kisan App’ उपलब्ध करून देण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून शेतकऱ्यांना घरबसल्या नोंदणी करता येणार आहे. याशिवाय सिंदी (रेल्वे) येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधूनही नोंदणीसंदर्भात माहिती घेता येईल.

कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीपूर्वी नावनोंदणी करून खरेदी प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी. शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन बाजार समितीचे सभापती, उपसभापती, संचालक मंडळ, सचिव आणि कर्मचारीवृंद यांनी केले आहे.

दुष्काळात बांधकामांना लगाम घाला, शेतकऱ्यांना विहिरी खोलीकरणाची परवानगी द्या

खा.अमर काळे यांचे जिल्हाधिकाऱ्यांना पत्र

वर्धा जनमाध्यम : अल्प पर्जन्यमानामुळे जिल्ह्यात पाणीटंचाईचे संकट गडद झाले असून, शेती वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना विहिरी आणि विंधन विहिरींचे खोलीकरण करण्यास विशेष बाब म्हणून परवानगी द्यावी. दुसरीकडे, पाण्याचा वापर कमी करण्यासाठी सिमेंट रस्ते, नाल्या, शासकीय इमारती तसेच गृहनिर्माण सोसायट्या आणि मोठ्या घरांच्या बांधकामांवर निर्बंध घालावेत, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

कारंजा तालुक्यातील शेतकऱ्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने काळे यांनी प्रशासनाला पत्र दिले आहे. पाणीपातळी खोल गेल्याने पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचाही प्रश्न गंभीर बनला आहे.

कापूस आणि अन्य पिके जगविण्यासाठी शेतकऱ्यांना पाण्याची गरज असून, सध्याच्या परिस्थितीत जुन्या विहिरींचे खोलीकरण करण्यास परवानगी मिळणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कारंजा तालुक्यातील दुष्काळसदृश परिस्थिती लक्षात घेऊन प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करावी आणि पिके व फळबागांचे नुकसान टाळण्यासाठी सहानुभूतीपूर्वक निर्णय घ्यावा, असेही काळे यांनी म्हटले आहे.

खडगेंच्या वक्तव्याचे वर्ध्यात पडसाद ; भाजपचे काँग्रेसविरोधात आंदोलन

छत्रपती शिवाजी महाराज चौकात काँग्रेस अध्यक्षांचा निषेध,माफी मागण्याची मागणी

वर्धा जनमाध्यम : काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खडगे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दिवंगत वडिलांविषयी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्याच्या निषेधार्थ भारतीय जनता पक्षाच्या वतीने बुधवारी स्थानिक छत्रपती शिवाजी महाराज चौकात आंदोलन करण्यात आले. यावेळी काँग्रेसविरोधात घोषणाबाजी करीत खडगे यांचा जाहीर निषेध करण्यात आला. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशाची माफी मागावी, अशी मागणी भाजप पदाधिकाऱ्यांनी केली.

भाजपचे जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या नेतृत्वात झालेल्या या आंदोलनात काँग्रेसच्या राजकीय भूमिकेवर टीका करण्यात आली. वैचारिक विरोध करणे हा लोकशाहीचा भाग आहे. मात्र, राजकीय विरोध करताना वैयक्तिक पातळीवर जाऊन वक्तव्ये करणे योग्य नाही, अशी भूमिका गाते यांनी मांडली. खडगे यांनी केलेल्या वक्तव्याबद्दल जाहीर माफी मागावी, अशी मागणीही त्यांनी केली.

काँग्रेसला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची वाढती लोकप्रियता सहन होत नसल्याचा आरोप गाते यांनी केला. निवडणुकांमधील पराभवामुळे काँग्रेस नेत्यांकडून मोदी यांच्यावर सातत्याने टीका केली जात असल्याचे ते म्हणाले. राहुल गांधी यांच्या आंदोलनाच्या भूमिकेवरही त्यांनी प्रश्न उपस्थित केले. गांधी कुटुंबापुरता मर्यादित राहिल्याने काँग्रेससमोर राजकीय आव्हाने निर्माण झाली असल्याची टीकाही त्यांनी केली.

यापूर्वी पंतप्रधान मोदी यांच्या आईविषयीही काँग्रेसकडून आक्षेपार्ह वक्तव्ये करण्यात आल्याचा उल्लेख करीत, मोदी यांच्याविरोधात बोलणे हाच काँग्रेसचा छंद झाला असल्याचा आरोप संजय गाते यांनी केला. या आंदोलनाला भाजपचे जिल्हा मुख्यालय प्रभारी श्रीधर देशमुख, शहराध्यक्ष नीलेश किटे, जयंत कावळे, प्रशांत बुर्ले, अर्चना वानखेडे, विरू पांडे, गटनेते विलास आगे, सतीश मिसाळ, प्रदीप तलमले, कमल गिरी, अपर्णा उंबरकर, कुणाल खंगार, कन्हैयालाल चैनानी यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

चार दिवस शोध सुरू, अखेर बोर नदीत आढळला विक्रमचा मृतदेह

हत्या की आत्महत्या, सेलू पोलिसांकडून तपास सुरू

सेलू जनमाध्यम : शहरातील जोशीनगर परिसरातून चार दिवसांपासून बेपत्ता असलेल्या विक्रम नारायण पारिसे (वय ३२) या तरुणाचा मृतदेह बुधवारी बोर नदीपात्रात आढळून आला. बेलगाव येथील जोशीनगरजवळील स्मशानभूमी परिसरात नदीच्या पाण्यावर मृतदेह तरंगताना दिसल्याने ही घटना उघडकीस आली. चार दिवसांपासून सुरू असलेल्या शोधाचा दुर्दैवी शेवट झाल्याने पारिसे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

विक्रम पारिसे हे मागील चार दिवसांपासून बेपत्ता होते. ते घरी परतले नसल्याने कुटुंबीय आणि नातेवाईक त्यांचा सर्वत्र शोध घेत होते. मात्र, बुधवारी बोर नदीपात्रात त्यांचा मृतदेह आढळून आल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा आघात झाला. विक्रम हे अविवाहित होते. त्यांच्या पश्चात वडील आणि मोठा भाऊ असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच सेलू पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी पंचनामा करून मृतदेह ताब्यात घेतला आणि पुढील वैद्यकीय प्रक्रियेसाठी रुग्णालयात पाठविला. विक्रम यांचा मृत्यू नेमका कोणत्या परिस्थितीत झाला, याबाबत अद्याप स्पष्टता आलेली नाही. विक्रम यांनी आत्महत्या केली की त्यांच्या मृत्यूमागे अन्य काही कारण आहे, याबाबत परिसरात चर्चा सुरू आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट झालेले नसून कोणत्याही शक्यतेवर अधिकृत शिक्कामोर्तब झालेले नाही. या प्रकरणाचा उलगडा करण्यासाठी सेलू पोलीस पुढील तपास करीत आहेत.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

४ राज्यांत एनडीए ची सरशी

नवी दिल्ली/ मुंबई : चार राज्यांतील २८ विधान परिषद (एमएलसी) जागांच्या निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) सरशी मिळवली आहे. उत्तर प्रदेश, कर्नाटक, बिहार आणि महाराष्ट्र या चार महत्त्वाच्या राज्यांमध्ये पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी झालेल्या या निवडणुकीच्या निकालांनी देशाच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडवून दिली आहे. कर्नाटकात भाजप-जेडीएस युतीने क्लीन स्वीप केला आहे, तर बिहारमध्ये प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाने इतिहास रचत आपले पहिले खाते उघडले आहे. उत्तर प्रदेशातील ११, बिहारमधील ८, महाराष्ट्रातील ५ आणि कर्नाटकातील ४ अशा एकूण २८ विधान परिषद जागांसाठी झालेल्या निवडणुकीचे अंतिम निकाल हाती आले असून २३ ऑक्टोबर रोजी पार पडलेल्या मतदानानंतर २४ तासांहून अधिक काळ चाललेल्या प्रदीर्घ मतमोजणी नंतर मतदारांचा स्पष्ट कल दिसून आला. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या या निवडणुकीत सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) बहुतांश जागांवर वर्चस्व राखले असून, प्रमुख विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसला २८ पैकी एकाही जागेवर विजय मिळवता आलेला नाही.

कर्नाटकात सर्व ४ जागांवर भाजप-जेडीएस- सर्वात धक्कादायक निकाल कर्नाटकातून समोर आला आहे, जिथे सत्ताधारी काँग्रेसला आपल्याच बालेकिल्ल्यात दारुण पराभवाचा सामना करावा लागला. राज्यातील सर्व्या सर्व ४ जागांवर भाजप-जेडीएस युतीने दणदणीत विजय मिळवला. जेडीएसचे एस. पी. रंगनाथ यांनी काँग्रेसच्या आमदाराचा पराभव करत बंगळूरु शिक्षक मतदारसंघ हिसकावून घेतला, तर उर्वरित ३ जागांवर भाजपने आपले वर्चस्व कायम राखले.

महाराष्ट्रात महायुती ३ तर मविआ २ जागांवर; चुरस कायम

महाराष्ट्रातील ५ जागांसाठी (३ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघ) झालेली मतमोजणी प्रचंड उत्कंठावर्धक ठरली. पहिल्या पसंतीचा कोटा पूर्ण न झाल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी करावी लागली. अमरावती शिक्षक मतदारसंघात सत्ताधारी महायुतीच्या (शिंदे गट) किरण सरनाईक यांनी काँग्रेसच्या उमेदवाराचा पराभव करत विजय मिळवला. अंतिम कलानुसार महायुती ३ जागांवर तर महाविकास आघाडी (विशेषतः शरद पवार गट) २ जागांवर मजबूत स्थितीत आहे.

बिहारमध्ये जन सुराजचा ऐतिहासिक उदय-बिहारमध्ये अत्यंत ऐतिहासिक निकालाची नोंद झाली. राजकीय विश्लेषक प्रशांत किशोर यांच्या जन सुराज पक्षाचे डॉ. सुरेश प्रसाद राय यांनी दरभंगा शिक्षक मतदारसंघात काँग्रेसच्या विद्यमान आमदाराचा पराभव करून विधान परिषदेत आपल्या पक्षाचे पहिले खाते उघडले. दुसऱ्या बाजूला, पटना शिक्षक मतदारसंघात मोठा उलटफेर करत राष्ट्रीय जनता दलाच्या डॉ. संजीव कुमार यांनी भाजपच्या ३० वर्षांपासून सत्तेत असलेल्या नवल किशोर यादव यांचा पराभव केला. तिरहुत मतदारसंघातून भाजपचे नरेंद्र प्रसाद सिंह विजयी झाले.

उत्तर प्रदेशात भाजप आणि समाजवादी पक्षाला यश

उत्तर प्रदेशातील ११ जागांसाठी झालेल्या लढतीत भाजपने आपले वर्चस्व सिद्ध केले असले, तरी अखिलेश यादव यांच्या समाजवादी पक्षाने त्यांना जोरदार टक्कर दिली. भाजपने मेरठ, बरेली आणि लखनौमध्ये विजय मिळवला, तर वाराणसी शिक्षक मतदारसंघ समाजवादी पक्षाच्या खात्यात गेला.

'राहुल गांधी तुम्ही प्रत्येक ठिकाणी भूत पाहणं बंद करा'

निर्मला सीतारमण यांचं सडेतोड उत्तर

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना टाटा समूहावरून त्यांनी जी टीका केली त्या प्रकरणी आता तिखट शब्दांत प्रत्युत्तर दिलं आहे. निर्मला सीतारमण यांनी राहुल गांधींच्या प्रत्येक मुद्द्यांचं खंडन केलं आहे. टाटा समूहाला उद्ध्वस्त केलं जातं आहे असं राहुल गांधींनी म्हटलं होतं आणि एक पोस्ट केली होती. त्यावर आता निर्मला सीतारमण यांनी उत्तर दिलं आहे.राहुलजी, मी तुम्हाला सल्ला देऊ इच्छिते की प्रत्येक मुद्द्याचं राजकारण करणं सोडून द्या. याशिवाय कायदेशीर प्रकरणांना गुन्हेगारी पद्धत म्हणं हे अजिबात मान्य नाही. राहुल गांधी हे वारंवार भारतीय उद्योगांचं यश नाकारत आले आहेत असंही निर्मला सीतारमण यांनी म्हटलं आहे. काँग्रेस पक्षाने लायसन्स कोटा राज आणून भारतीय उद्योजकांच्या भावना चिरडण्याचं काम केलं. असंख्य उद्योजकांवर हे लायसन्स कोटा राज थोपवण्यात आलं. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात काम करणारं सरकार हे प्रत्येक उद्योगाला सकारात्मक मानतं आणि रोजगाराची संधी मानतं. आमच्या सरकारची धोरणं ही उद्योग सक्षम करण्यासाठी आणि त्यांना गुंतवणुकीत प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने तयार केली गेली आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या, राहुल गांधी अशा काहीतरी पोस्ट करून उद्योजकांमध्ये आणि देशाते यांच्यात विष पसरवण्याचं काम करत आहेत, तसंच इतर उद्योजकांना यात सहभागी व्हा असं आवाहन करत आहेत. राजकीय पक्ष, नेते, सरकार आणि संस्था यांना पाठिंबा सम प्रमाणात देणं ही आमची सरकार म्हणून जबाबदारी आहे. तसंच शेतकऱ्यांना बळ देणं, युवकांचं भवितव्य सुरक्षित करणंही महत्त्वाचं आहे. मात्र राहुल गांधी अशा काळात निराधार आरोप करत आहेत.

चार राज्यांत बॅलेट पेपरवर निवडणुका झाल्या, काँग्रेसने किती जागा जिंकल्या? PM मोदींचा खोचक सवाल

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- देशातील मुख्य विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसकडून गेल्या काही दिवसांपासून निवडणूक आयोग, एसआयआर आणि इव्हीएमच्या विश्वासार्हतेवर शंका उपस्थित केली जात आहे. तसेच विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून देशातील एकूणच निवडणूक प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह लावलं जात आहे. सोबतच बॅलेट पेपरवर निवडणुका घेण्याची मागणीही केली जात आहे. त्या पार्श्वभूमीवर नुकत्याच चार राज्यातील विधान परिषदेच्या २८ जागांसाठी बॅलेट पेपरवर झालेल्या निवडणुकांचे कल समोर आले असून, त्यात काँग्रेसला एकाही जागेवर आघाडी घेता आलेली नाही. आता या निवडणुकीच्या निकालावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खोचक प्रश्न विचारला आहे.बॅलेट पेपरवर मतदान झालेल्या विधान परिषद निवडणुकीच्या निकालांवरून काँग्रेसला टोला लगावताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये मोदींनी लिहिले की, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार आणि कर्नाटकसारख्या चार मोठ्या राज्यांमध्ये विधान परिषदेच्या २८ जागांसाठी निवडणूक झाली. या निवडणुकांमध्ये बॅलेट पेपरवर मतदान झालं. आता काँग्रेसने किती जागा जिंकल्या? तुम्हा अंदाज सांगा, असा खोचक प्रश्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विचारला. विरोधी पक्षांकडून ईव्हीएमवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या पोस्टच्या माध्यमातून काँग्रेससह विरोधी पक्षांना टोला लगावला आहे.महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि बिहार या चार राज्यातील विधान परिषदेच्या २८ जागांसाठी झालेल्या निवडणूक काँग्रेसने एकही जागा जिंकता आलेली नाही. धक्कादायक बाब म्हणजे काँग्रेसची सत्ता असलेल्या कर्नाटकमध्येही काँग्रेसला विधान परिषद निवडणुकीत खातंही उघडता आलेलं नाही. कर्नाटकमध्ये भाजपा आणि जेडीएसच्या आघाडीने चारही जागा जिंकल्या. तर उत्तर प्रदेशमध्ये विधान परिषदेच्या ११ जागांसाठी झालेल्या निवडणुकीत भाजपाने चार जागांवर विजय मिळवला आहे. तर दोन जागा समाजवादी पक्षाने जिंकल्या. उर्वरित जागांवर मतमोजणी सुरू आहे.

नवलच घडले, नवलच पडले! अध्यक्षांच्या होमपीचवर भाजपला धक्का

पाटणा/वृत्तसंस्था- राज्यासह केंद्रात सत्ता, पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष बिहारचे, अशी अनुकूल स्थिती असूनही भाजपला जोरदार झटका बसला आहे. राज्याच्या राजकारणाचे केंद्रस्थान असलेल्या राजधानी पाटण्यात भाजपला हादरे बसू लागले आहेत. राजधानी पाटणा आणि आसपासच्या परिसरातील शहरी मतदार भाजपचा सर्वात मजबूत आधार मानला जातो. पण हाच मतदार हळूहळू भाजपपासून दूर जाऊ लागला आहे.पाटण्याच्या विधान परिषद शिक्षक मतदारसंघात गेल्या ३ दशकांपासून वर्चस्व गाजवणाऱ्या भाजपच्या नवल किशोर यादव यांचा पराभव झाला आहे. राजदचे उमेदवार डॉ. संजीव कुमार सिंह यांनी त्यांचा १,०५७ मतांनी पराभव केला. त्यामुळे पाटणा शिक्षक मतदारसंघातील नवल किशोर यादव यांचं वर्चस्व संपुष्ट आलं आहे.बांकीपूर विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीनंतर भाजपच्या उमेदवाराचा पराभव झाला. जन सुराज्य पक्षाचे अध्यक्ष आणि निवडणूक रणनीतीकार प्रशांत किशोर यांनी बांकीपूरमध्ये भाजपला दे धक्का दिला. इथे २०१० पासून नितिन नवीन निवडून येत होते. ते भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले. त्यामुळे त्यांनी विधानसभेच्या आमदारकीचा राजीनामा दिला. त्यामुळे मतदारसंघात पोटनिवडणूक लागली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षांच्या मतदारसंघात पक्षावर पराभवाची नामुष्की ओढवली. त्यानंतर आता पाटणा शिक्षक मतदारसंघात भाजपला झटका बसला आहे.भाजपनं पाटणा शिक्षक मतदारसंघात तब्बल ३० वर्ष राखलेले वर्चस्व मोडीत निघालं आहे.

स्पेनमध्ये हाय-स्पीड रेल्वे धडकल्या, ६४ ठार

◆ अनेक डब्यांचे ढिगाऱ्यात रूपांतर ◆

माद्रिद/वृत्तसंस्था- स्पेनमधील टोलेडो प्रांतात बुधवारी दोन अतिजलद रेल्वे एकमेकांना धडकल्या. डीडी न्यूजच्या वृत्तानुसार, या दुर्घटनेत ६४ जणांचा मृत्यू झाला असून १७९ जण जखमी झाले आहेत. मदत आणि बचावकार्यासाठी आपत्कालीन सेवा व वैद्यकीय पथके घटनास्थळी पोहोचली.स्पॅनिश माध्यमांच्या वृत्तानुसार, स्थानिक वेळेनुसार सकाळी ९ वाजता मोरा आणि ओर्गाझ शहरांदरम्यान ही दुर्घटना घडली. एका रेल्वेने दुसऱ्या रेल्वेला मागून धडक दिली. धडक इतकी भीषण होती की अनेक डबे मोठ्या प्रमाणात खराब झाले.दुर्घटनेनंतर राजधानी माद्रिदला दक्षिणेकडील आंदालुसिया प्रदेशाशी जोडणारी रेल्वे मार्गिका बंद करण्यात आली. दोन्ही गाड्या सरकारी कंपनी रेनफे आणि खासगी कंपनी इर्यो यांच्या होत्या. या गाड्यांचा वेग साधारणपणे ताशी २०० किमीपेक्षा अधिक असतो.

मदत आणि बचावकार्य सुरू- स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सांचेझ यांनी सांगितले की, या दुर्घटनेची बातमी ऐकून त्यांना धक्का बसला आहे. मदत आणि बचाव पथके घटनास्थळी उपस्थित असून दुर्घटनेत प्रभावित झालेल्या लोकांना मदत करत आहेत.टोलेडोजवळील उर्दा शहराचे महापौर मॅन्युएल गालान यांनी सांगितले की, बचाव पथकाने जखमींच्या उपचारासाठी आणि देखभालीसाठी एक स्पोर्ट्स हॉल तयार ठेवण्यास सांगितले आहे. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, हे स्पष्ट झालेले नाही. ट्रेन वेळेवर धावत होती की नाही, याची चौकशी केली जाईल. सिग्नल यंत्रणेत बिघाड होता की चालकाकडून ब्रेक लावण्यात चूक झाली, याचीही चौकशी केली जाईल.धडक होण्यापूर्वी या यंत्रणा कार्यरत होत्या की नाही, हेही तपासले जाईल. अहवालानुसार, रेनफे ट्रेनचा चालक अद्याप बेपत्ता आहे. ट्रेनचालकांच्या संघटनांनी या अपघाताला असामान्य म्हटले आहे. राजधानी माद्रिदला जोडणारी ट्रेन सेवा बंद असल्यामुळे प्रवाशांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागत आहे. माद्रिदच्या स्थानकांवर प्रवासी ट्रेन्सच्या प्रतीक्षेत उभे आहेत.

ऑपरेशन सिंदूरनंतर पहिल्यांदाच पाकिस्तानचे मंत्री भारतात येणार?

दिल्लीत पार पडणाऱ्या संमेलनासाठी निमंत्रण

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारतात होणाऱ्या शांघाई कोऑपरेशन संघटनेसाठी पाकिस्तानला निमंत्रण देण्यात आले आहे. ऑपरेशन सिंदूरनंतर पहिल्यांदाच पाकिस्तानचे सांस्कृतिक मंत्री औरंगजेब खान खीची यांना या परिषदेसाठी निमंत्रण देण्यात आले आहे. भारत आणि पाकिस्तानच्या युद्धानंतर आता पाकिस्तानचे मंत्री भारतात येणार असल्याने या कडे लक्ष लागलं आहे. शांघाई कोऑपरेशन संघटनेची बैठक दिल्लीत पार पडणार आहे. या बैठकीला शांघाई संघटनेच्या सदस्य देशांना निमंत्रण पाठवण्यात आल्याची माहिती आहे. 'द हिंदू' या वृत्तपत्राच्या सूत्रांनुसार पाकिस्तानचे सांस्कृतिक मंत्री औरंगजेब खान खीची यांना देखील निमंत्रण देण्यात आल्याची माहिती आहे. याआधी पाकिस्तानचे तत्कालीन परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो हे भारतात आले होते. २०२३ ला संघटनेची बैठक ही गोव्यात पार पडली होती. भारत आणि पाकिस्तान मधल्या युद्धानंतर पाकिस्तानचे मंत्री भारत दौऱ्यावर येतात का? हे पाहणं महत्वाचं आहे. पहलगाम हल्ला आणि ऑपरेशन सिंदूर नंतर दोन्ही देशांचे संबंध ताणले गेले आहेत. मात्र आता शांघाई कोऑपरेशन संघटनेच्या बैठकीसाठी पाकिस्तानची काय भूमिका असणार आहे हे पहावं लागेल.

१ नोव्हेंबरपासून टोल खर्च वाचणार!

१५०० रुपयांत वर्षभराचा पास

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं फास्टॅग पासच्या नियमांमध्ये सुधारणा करणारी अधिसूचना जारी केली आहे. नव्या नियमांनुसार आता अवघ्या १५०० आणि ३००० रुपयांत वर्षभराचा पास मिळू शकतो. पण ही सुविधा टोल नाक्याच्या परिघात २० किलोमीटर परिसरात राहणाऱ्या व्यक्तींनाच मिळेल.केंद्र सरकारनं एका नव्या टोल पासची घोषणा केली आहे. हा एक वार्षिक टोल पास असेल. राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या टोल नाक्यांच्या २० किलोमीटरच्या परिसरात राहणाऱ्यांना हा टोल पास घेता येईल. १ नोव्हेंबरपासून हा टोल पास जारी होईल. याचा लाभ टोल प्लाझाच्या २० किलोमीटरच्या हद्दीत राहणाऱ्यांना घेता येईल.या पाससाठी १५०० रुपयांपासून ३००० रुपयांपर्यंत रक्कम मोजावी लागेल. पास घेणारी व्यक्ती टोल नाक्यापासून किती दूर राहते यावर पासची रक्कम ठरेल. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं या बदलाची माहिती एका नोटिफिकेशनच्या माध्यमातून जारी केली

आहे. राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या टोल नाक्यांजवळ राहणाऱ्या लोकांना टोलमध्ये सवलत देण्याच्या उद्देशानं नियमात बदल करण्यात आले आहेत.रस्ते वाहतूक आणि राष्ट्रीय महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी याबद्दल एक्स पोस्ट केली आहे. 'जीवन सोपं करण्याच्या दिशेनं एक मोठं पाऊल! १ नोव्हेंबर २०२६ पासून राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या टोल नाक्यांच्या २० किलोमीटरच्या हद्दीत राहणाऱ्या पात्र-नॉन कमर्शियल वाहन मालक सवलतीच्या दरातील लोकल पासचा फायदा घेऊ शकतील,' असं गडकरींनी पोस्टमध्ये नमूद केलं आहे.कोणाकोणाला लाभ मिळणार?कोणत्याही राष्ट्रीय महामार्गावरील टोल नाक्याच्या २० किलोमीटर भागात राहणाऱ्या खासगी वाहन मालकांना लोकल पासचा लाभ घेता येईल. ही सुविधा वैध आणि कार्यान्वित असलेल्या फास्टॅग सोबतच मिळेल. यासोबतच वाहन मालकाला या पासासाठी सगळ्या नियमांची पूर्तताही करावी लागेल. हा पास निश्चित केलेल्या टोल नाक्यावरच वैध असेल. याचा वापर सरसकट कोणत्याही टोल नाक्यावर करता येणार नाही. सरकारनं यासाठी दोन पासची घोषणा केली आहे.

२१ वर्षीय वैष्णवी शर्माने घडवला इतिहास!

'हा' रेकॉर्ड करणारी ठरली दुसरीच भारतीय गोलंदाज

नवी दिल्ली/वृत्तसंस्था- भारतीय महिला संघातील युवा फिरकी गोलंदाज वैष्णवी शर्माने महिलांच्या वनडे क्रिकेटमध्ये इतिहासाला गवसणी घातली आहे. भारत आणि झिम्बाब्वे या दोन्ही संघांमध्ये पार पडलेल्या ३ वनडे सामन्यांच्या मालिकेतील तिसरा सामना बडोदा क्रिकेट असोसिएशनच्या मैदानावर पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने ८ गडी राखून एकतर्फी विजयाची नोंद केली. या सामन्यातील पहिल्या डावात गोलंदाजी करताना वैष्णवी शर्माने १० षटकांत ३९ धावा खर्च केल्या आणि सर्वाधिक ५ गडी बाद केले. या गोलंदाजीच्या बळावर झिम्बाब्वेचा डाव अवघ्या १३१ धावांवर आटोपला.या सामन्यात झिम्बाब्वेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. पण हा निर्णय पूर्णपणे फसला. कारण झिम्बाब्वेचे फलंदाज वैष्णवी शर्माच्या फिरकीच्या जाळ्यात अडकले. तिने १० षटकं टाकले आणि ३९ धावा खर्च करून ५ गडी बाद केले. यासह ती भारताच्या वनडे क्रिकेटच्या इतिहासात ५ गडी बाद करणारी दुसरी सर्वात कमी वयाची गोलंदाज ठरली आहे. या यादीत भारताची स्टार फिरकी गोलंदाज दीप्ती शर्मा अव्वल स्थानी आहे. दीप्ती शर्माने २०१६ मध्ये श्रीलंकेविरुद्ध गोलंदाजी करताना २० धावा खर्च करून ६ गडी बाद केले होते. त्यावेळी ती अवघ्या १८ वर्षांची होती. तर वैष्णवी शर्माने हा पराक्रम वयाच्या २१ व्या वर्षी करून दाखवला आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या झिम्बाब्वेचा डाव अवघ्या १३१ धावांवर आटोपला. झिम्बाब्वेकडून पहिल्या डावात फलंदाजी करताना मुपाचिकावाने सर्वाधिक ३७ धावांची खेळी केली. तर कर्णधार कोमोने ३५ धावांचे योगदान दिले. यासह धुरूरने २० आणि ग्वांजुराने १० धावा केल्या. भारतीय संघाला हा सामना जिंकण्यासाठी अवघ्या १३२ धावा करायच्या होत्या.

अगं आई, जिवंत आहे मी! जिचे अंत्यविधी केले, तिचा VIDEO कॉल

टॅटू, तीळ पाहून बॉडी ओळखणारं कुटुंब शॉक

लखनऊ/वृत्तसंस्था- लेकीचा मृत्यू झाल्याचं समजून कुटुंबियांनी तिचे अंत्यविधी उरकले. पण तीच मुलगी जिवंत असल्याचं आता कुटुंबाला समजलं. पोलिसांनी याबद्दलची माहिती दिली. पण तरीही कुटुंबाला विश्वास बसत नव्हता. त्यानंतर व्हिडीओ कॉल करण्यात आला. लेकीला जिवंत पाहून कुटुंबियांचे डोळे भरून आले. त्यांचा आनंद गगनात मावत नव्हता.उत्तर प्रदेशच्या प्रयागराजमधील उमरावगंज परिसरात राहणाऱ्या बनारसी लाल यांची लेक प्रीती ३० वर्षांची आहे. १३ मे २०२३ रोजी ती घरातून अचानक बेपत्ता झाली होती. आई कमलादेवी यांनी कुटुंबियांच्या साथीनं बरीच शोधाशोध केली. पण प्रीतीचा शोध लागला नाही. काही दिवसांनी एका नातेवाईकावर शंका व्यक्त करत १६ मे रोजी नवाबगंज पोलीस ठाण्यात लेक बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली. पण तरीही लेकीचा शोध लागला नाही. यानंतर जवळपास सव्वा तीन वर्षांनी म्हणजेच ३० सप्टेंबर २०२६ रोजी गोरखपूर पोलिसांनी यश आपच्या माध्यमातून कुटुंबाला चिलुआताल नदीच्या जवळ झुडुपांमध्ये एका अज्ञात व्यक्तीचं शव सापडल्याची माहिती दिली. कुटुंबातील

लोक गोरखपूरला पोहोचले आणि मृतदेहाचे कपडे, हातावरील टॅटू, नाकावरील तीळ आणि शरीरावरील भाजल्याच्या खुणा पाहून ओळख पटवली. मृतदेह प्रीतीचाच असल्याचं पोलिसांनी सांगितले. यानंतर पोलिसांनी शव पोस्टमॉर्टमला पाठवलं. मग ते कुटुंबाच्या ताब्यात दिलं. डीएनए अहवालाची प्रतीक्षा न करता कुटुंबानं ४ ऑक्टोबरला पार्थिवावर अंत्यसंस्कार केले. त्यानंतर तेरावंदेखील घातलं.सोराचे एससीपी श्याम जीत पर्मिला सिंह यांना शनिवारी संध्याकाळी गुजरातच्या वडोदरामधील महिला संरक्षण केंद्रातून कॉल आला. उमरावगंजची प्रीती सुरक्षित असल्याचं केंद्रातून सांगण्यात आलं. यानंतर पोलिसांनी ही माहिती प्रीतीची आई कमला देवी यांना दिली. तेव्हा तिचा विश्वास बसला नाही. यानंतर व्हिडीओ कॉलवर माय लेकीचा संवाद झाला. आपल्या लेकीला अनेक वर्षांनी पाहिल्यावर सुरुवातीला कुटुंबाला शंका आली. एआयच्या माध्यमातून खोटा व्हिडीओ कॉल करण्यात आला असावा, असा संशय त्यांना आला. त्यामुळे त्यांनी गावातील काही जणांना कॅमेऱ्यासमोर आणलं. प्रीतीनं सगळ्यांना ओळखलं. त्यांची नावं सांगितली. जुन्या आठवणींना उजाळा दिला. समोरची तरुणी प्रीती असल्याची कुटुंबाची खात्री पटली आणि सगळ्यांना अश्रू अनावर झाले. 'अगं आई, मी जिवंत आहे,' असं प्रीतीनं म्हटलं आणि सगळेच गहिवरून गेले. त्यांचा आनंद अगदी ओसंडून वाहू लागला.

राऊतांना १७ नोव्हेंबरला सर्वोच्च न्यायालयात हजर राहण्याचे आदेश

नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयाने शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे खासदार संजय राऊत यांना १७ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी २ वाजता न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहण्याचे आदेश दिले आहेत. भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्याबाबत सोशल मीडियावर त्यांनी आक्षेपार्ह विधान केले होते. आता त्यांच्याविरोधात न्यायालयाचा अवमान केल्याची कारवाई सुरू आहे. या प्रकरणात पत्रकार निखिल वागळे यांनाही न्यायालयाने उपस्थित राहण्यास सांगितले आहे. मात्र, वागळे यांना पुढील सुनावणीला ऑनलाइन उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली आहे. न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती विपुल एम. पंचोली यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. या प्रकरणात संबंध केवळ संबंधित व्यक्तीशी नसून संपूर्ण न्यायव्यवस्थेशी आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. भारतीय सर्वोच्च न्यायालयाबाबत सोशल मीडियावर करण्यात आलेल्या विधानांमुळे न्यायालयाची प्रतिष्ठा कमी होत असल्याचा आरोप याचिकेत करण्यात आला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या वकिलांच्या संघटनेने या प्रकरणी याचिका दाखल केली आहे. त्यासाठी भारताच्या अॅटर्नी जनरल यांनी लेखी संमती दिली होती.

निखिल वागळेंनी मागितली बिनशर्त माफी- सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी विरोधी पक्षांच्या नेत्यांना भेटण्यास नकार दिल्यानंतर निखिल वागळे यांनी सोशल मीडियावर आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. त्यानंतर त्यांनी बिनशर्त माफी मागितली आणि संबंधित पोस्ट हटवली. मात्र, पोस्ट हटवण्यासाठी पाच दिवसांचा विलंब झाल्याचे याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. वागळे यांच्यावतीने ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी बाजू मांडली. वागळे यांनी आपल्या कृतीचे समर्थन केलेले नाही आणि त्यांना आपल्या विधानाचा पश्चात्ताप आहे, असे त्यांनी सांगितले. वागळे मुंबईत राहत असल्याने त्यांना ऑनलाइन उपस्थित राहण्याची परवानगी देण्यात आली. गरज पडल्यास भविष्यात त्यांना प्रत्यक्ष हजर राहण्यास सांगितले जाऊ शकते. सुनावणीदरम्यान संजय राऊत यांच्या बाजूने कोणताही वकील उपस्थित नव्हता. त्यामुळे न्यायालयाने त्यांना पुढील सुनावणीला प्रत्यक्ष हजर राहण्याचे निर्देश दिले.

AI वाली दारू जीवावर बेतली; २० दिवसांत १३ गूढ मृत्यू

भोपाळ/वृत्तसंस्था- दोन गावांमध्ये २० दिवसांत १३ जणांचा गूढ मृत्यू झाला. त्यानंतर गावात घबराट पसरली. या प्रकरणात पोलिसांनी बनावट दारू तयार करणाऱ्या आणि तिचा पुरवठा करणाऱ्या नेटवर्कचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात मुख्य आरोपी अजय राठौरला अटक करण्यात आली आहे. त्याच्या चौकशीतून पोलिसांच्या हाती धक्कादायक माहिती लागली आहे. हा सगळा प्रकार मध्य प्रदेशच्या देवास जिल्ह्यात घडला. अजय राठौर एआयच्या मदतीने बनावट दारू तयार करायची प्रक्रिया शिकला. त्यानंतर त्याने इंदूरच्या औषध बाजारातून केमिकल मागवलं. मग जुन्या बाटल्यांमध्ये केमिकल आणि पाणी मिसळून बनावट दारू तयार केली. या प्रकरणात आतापर्यंत १० आरोपींना अटक केली आहे. त्यातील ८ आरोपींना न्यायालयाने ३ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तर दोन आरोपींची रवानगी तुरुंगात केली आहे. गावांमध्ये झालेल्या मृत्यूमागचं नेमकं कारण स्पष्ट झालेलं नाही. पोलिसांनी मृतांचे व्हिसेरा आणि दारूच्या बाटल्यांचे नमुने फॉरेन्सिककडे तपासणीसाठी पाठवले आहेत.पोलिसांच्या तपासानुसार, मुख्य आरोपी अजय राठौरने एआयच्या मदतीने बनावट दारू तयार करण्याची प्रक्रिया शोधून काढली.

संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

'ई-१००' भक्कम पाऊल

पश्चिम आशियातील संघर्षाने इतिहासात पहिल्यांदाच होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने इंधनाच्या उपलब्धतेचे संकट ओढावले. त्यातून धडा घेत केंद्र सरकारने तेलाच्या आयातीत वैविध्य आणण्यापासून कच्च्या तेलाचे साठे वाढवण्याबाबत प्रयत्न सुरू केले. दशकभरात कच्च्या तेलावरील आयात अवलंबित्व कमी करणे, इंधनासाठी परदेशी चलनाचा खर्च वाचवणे आणि पर्यायी ऊर्जा स्त्रोतांचा वापर वाढवणे, या उद्दिष्टांच्या दिशेने वाटचाल सुरूच होती. आता केंद्र सरकारने शंभर टक्के इथेनॉलवर म्हणजेच ई-१०० या इंधनावर चालणाऱ्या वाहनांसाठी मोटार वाहन नियमांत नुकतीच केलेली सुधारणा हे एक दूरगामी आणि धोरणात्मक पाऊल मानले पाहिजे. केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये सुधारणा करून ई-८५ आणि ई-१०० इंधनावर चालणाऱ्या वाहनांसाठीची नियामक चौकट अधिक स्पष्ट केली आहे. ही सुधारणा देशाच्या वाहतूक व्यवस्थेत जैवइंधनाचा वाटा वाढवण्याच्या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा भाग आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाने राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेनुसार, वाहननिर्मात्यांना विशेषतः फ्लेक्स फ्युएलसाठी तयार केलेल्या वाहनांमध्ये ई-८५ किंवा ई-१०० इंधनाचा वापर करता येईल. ई-८५ म्हणजे ८५ टक्के इथेनॉल आणि १५ टक्के पेट्रोल यांचे मिश्रण, तर ई-१०० हे जवळजवळ शुद्ध इथेनॉलवर आधारित इंधन. सध्या भारतात उपलब्ध असलेल्या या इंधनाच्या प्रकारात सुरक्षिततेच्या दृष्टीने काही प्रमाणात पाणी मिसळलेले असते, तरीही पेट्रोलमध्ये मर्यादित प्रमाणात इथेनॉल मिसळून तयार केल्या जाणाऱ्या इंधनाच्या तुलनेत त्यातील इथेनॉलचे प्रमाण लक्षणीयरीत्या अधिक असते.भारतात पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळण्याच्या कार्यक्रमाची सुरुवात दोन दशकांपूर्वी २००३ मध्ये झाली; परंतु राजकीय इच्छाशक्तीचा अभाव आणि धोरणातील अस्थिरतेमुळे २०१३-१४ पर्यंत या मिश्रणाचे प्रमाण अवघे १.५३ टक्के मर्यादित राहिले. नंतरच्या काळात केंद्राने उत्पादन क्षमता वाढवणे, इथेनॉल खरेदीसाठी आश्वासक दररचना तयार करणे आणि साखर कारखान्यांसह इतर घटकांना प्रोत्साहन देणे अशी त्रिसूत्री अमलात आणली. याचे सकारात्मक परिणाम दिसले. २०२१-२२ या वर्षात १० टक्के मिश्रणाचे उद्दिष्ट वेळेआधीच साध्य केले, तर २०२५-२६ पर्यंत हे प्रमाण थेट २० टक्क्यांपर्यंत पोहोचले. मूळ योजनेनुसार २०३० साठी निश्चित केलेले लक्ष्य तब्बल पाच वर्षे आधीच गाठणे, हे धोरणात्मक सातत्य आणि प्रभावी अंमलबजावणीचे यश होते. २०१४ मध्ये देशातील इथेनॉल उत्पादन क्षमता सुमारे ४२१ कोटी लिटर होती, ती २०२६ पर्यंत वाढून सुमारे २००० कोटी लिटर झाली. पेट्रोलियम मंत्रालयाच्या आकडेवारीनुसार, गेल्या ११ वर्षांत इथेनॉल खरेदीतून शेतकऱ्यांच्या पदरात सुमारे १.२१ लाख कोटी रुपयांचे उत्पन्न पडले, तर दुसरीकडे सुमारे १.४० लाख कोटी रुपयांचे परकीय चलन वाचले. ऊस, मका आणि इतर जैविक घटकांपासून इथेनॉलची निर्मिती केली जात असल्याने शेतमालाला एक हमखास पर्यायी बाजारपेठ उपलब्ध झाली. पानिपत आणि नुमालीगड येथील तेल शुद्धीकरण प्रकल्पांमध्ये पराली म्हणजेच शेतातील काडीकचरा, बांबू आणि अन्य जैविक अवशेषांपासून इथेनॉल निर्मितीचे प्रकल्प कार्यान्वित केले आहेत. ही दुसरी पिढीतील जैवइंधनाची वाटचाल अन्न सुरक्षा आणि ऊर्जा सुरक्षा या दोन्ही घटकांचा समतोल साधण्याच्या दृष्टीने महत्त्वाची ठरते. आता ई-१०० या संपूर्ण इथेनॉल इंधनाला दिलेली मान्यता ही याच प्रवासाचा पुढचा नैसर्गिक टप्पा आहे. तथापि, पेट्रोलमध्ये इथेनॉल मिसळणे आणि वाहन संपूर्ण इथेनॉलवर चालवणे या दोन भिन्न बाबी आहेत. सध्या बाजारातील वाहने किंवा ई-२० इंधनासाठी तयार केलेली वाहने थेट ई-१०० वर धावू शकत नाहीत. यासाठी वाहन उत्पादक कंपन्यांना विशेष तंत्रज्ञानावर आधारित फ्लेक्स-इंधन इंजिने विकसित करावी लागतील आणि त्यांचे स्वतंत्र प्रमाणीकरण करावे लागेल. भारतात फ्लेक्स इंधनावर चालणाऱ्या वाहनांचे काही नमुने आणि प्रायोगिक मॉडेल्स सादर केले आहेत. मारुती सुझुकी वॅगनआर आणि टोयोटा इनोव्हा हायक्रॉस या वाहनांच्या फ्लेक्स इंधनाशी संबंधित आवृत्त्यांची चर्चा झाली. दुचाकी क्षेत्रातही अशा वाहनांवर काम सुरू आहे. ग्राहकांच्या दृष्टीने इंधनाची किंमत आणि वाहनाची कार्यक्षमता हे दोन प्रमुख मुद्दे असतील.इथेनॉलचे ऊर्जा-घनत्व पेट्रोलपेक्षा कमी असल्यामुळे समान अंतर पार करण्यासाठी काही परिस्थितींमध्ये अधिक इंधन लागू शकते. त्यामुळे इथेनॉल इंधनाची विक्री किंमत, वाहनाची इंधन कार्यक्षमता आणि देखभालीचा खर्च यांचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. मध्यंतरी इथेनॉल वापरामुळे वाहनांमध्ये बिघाड झाल्याच्या तक्रारी देशभरातून आल्या. त्या पार्श्वभूमीवर सरकारने अधिकृतरीत्या ई-१०० इंधनाबाबतच्या शंकांचे निरसन करून हमी देणे आवश्यक आहे. भारताने यासाठी ब्राझीलचा आदर्श घ्यावयास हवा. १९७० च्या दशकात जागतिक तेल संकटानंतर ब्राझीलने अथांग ऊस शेतीचा आधार घेत 'प्रो-अल्कोहोल' मोहीम हाती घेतली. आज ब्राझीलमध्ये ई-१०० (हायड्रेटेड इथेनॉल) हे इंधन सर्वसामान्य पेट्रोल पंपांवर सर्रास उपलब्ध असून, देशातील बहुतांश प्रवासी वाहने 'फ्लेक्स इंधन' प्रणालीने सुसज्ज आहेत. तेथील वाहनचालक पंपावर हवे ते इंधन निवडू शकतात. ब्राझीलव्यतिरिक्त अमेरिका, स्वीडन, थायलंड आणि फ्रान्स या देशांनी प्रामुख्याने ई-८५ या उच्च मिश्रणाचा मार्ग चोखाळला. अमेरिकेत मुबलक मका उत्पादनामुळे ई-८५ इंधन वापरणाऱ्या वाहनांना मोठी बाजारपेठ मिळाली, तर युरोपात स्वीडनसारख्या देशाने सार्वजनिक वाहतुकीतील बसेस थेट उच्च इथेनॉलवर चालवण्याचा यशस्वी प्रयोग करून कार्बन उत्सर्जनात मोठी घट नोंदवली. भारतात ई-१०० चा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्यास आर्थिक तूट कमी होण्याबरोबरच शहरांमधील प्रदूषणही कमी होईल. ई-१०० इंधनाची स्वतंत्र वितरण व्यवस्था उभारणे, पेट्रोल पंपांवर या इंधनाचे स्वतंत्र पंप सुरू करणे आणि ग्राहकांना आकर्षित करेल अशा किफायतशीर दरात वाहने व इंधन उपलब्ध करणे हे यापुढील मोठे आव्हान असेल. याशिवाय, केवळ एका पर्यायावर संपूर्ण मदार ठेवून ऊर्जा आत्मनिर्भरता साधता येणार नाही. इथेनॉलसोबतच विजेवर चालणारी वाहने, सौर ऊर्जा, हरित हायड्रोजन आणि अन्य अपारंपरिक स्त्रोतांचा एकसंध व बहुआयामी आराखडा तयार करावा लागेल. कच्च्या तेलावरील परावलंबित्व कमी करून देशांतर्गत स्त्रोतांवर आधारित शाश्वत आणि पर्यावरणपूरक परिसंस्था निर्माण करणे हाच खरा ऊर्जा सुरक्षेचा गाभा आहे. ई-१०० ला मिळालेली मंजुरी हे त्या दीर्घकालीन उद्दिष्टाच्या दिशेने पडलेले एक भक्कम पाऊल नक्कीच आहे. आता या धोरणाची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याची गरज आहे.

'लालपरी'ला हवे सरकारी आर्थिक इंधन!

महाराष्ट्राच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात 'एसटी'चा वाटा मोठा आहे. जिथे खासगी वाहने जात नाहीत, तिथे 'लालपरी'धावते, हे 'एसटी'चे विशेष. पण आज या 'एसटी' ची चाके मोठया आर्थिक संकटात रुतत चालली आहेत. राज्य सरकारने तात्पुरती मलमपट्टी न करता धोरणात्मक निर्णय घेऊन 'एसटी'ला बिकट स्थितीतून बाहेर काढणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अर्थात 'एसटी' ही केवळ प्रवासी वाहतुकीची सेवा नाही, तर राज्याच्या ग्रामीण जीवनाचा अविभाज्य भाग आहे. आजपर्यंत राज्यातील लाखो विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, शेतकरी, कामगार आणि सर्वसामान्य प्रवाशांना परवडणाऱ्या दरात सुरक्षित प्रवासाची सुविधा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य एसटी अविरतपणे करीत आहे.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंत 'एसटी'ने ७७ वर्षांहून अधिक काळ महाराष्ट्राला जोडून ठेवले आहे. आज २५० हून अधिक आगार, १६ हजारांहून अधिक बसेस आणि दररोज ५५ लाखांहून अधिक प्रवासी असा या महामंडळाचा विस्तार आहे. तरीही या सेवाभावी संस्थेला नफा-तोट्याच्या चष्म्यातून पाहणे चुकीचे ठरेल. मात्र सामाजिक बांधिलकी जपत सेवा देणाऱ्या या महामंडळाला आज गंभीर आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत राज्य सरकारने केवळ प्रशासकीय नियंत्रण ठेवणारी यंत्रणा म्हणून नव्हे, तर पालकाच्या भूमिकेतून पुढाकार घेऊन 'एसटी'ला आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे आवश्यक आहे. महामंडळाच्या योगदानात प्रवाशांसोबत कर्मचाऱ्यांचे सुद्धा मोठे योगदान असून कर्मचाऱ्यांच्या भविष्याशी निगडित ५,७४० कोटी रुपयांची देणी थकीत आहेत. हा केवळ आकडा नाही, तर ८७ हजार कर्मचाऱ्यांच्या कुटुंबाच्या भविष्याचा प्रश्न आहे. यामध्ये भविष्य निर्वाह निधी, अंशदान निधी, उपदान निधी (ग्रॅच्युइटी), कर्मचारी ठेव विमा योजना, रजा रोखीकरण, वैद्यकीय व प्रवास भत्ते आणि वेतनवाढीतील थकीत रकमेचा समावेश आहे.

चिंताजनक बाब म्हणजे कर्मचाऱ्यांच्या पगारातून दर महिन्याला कपात करण्यात आलेली वर्गणी रक्कम संबंधित संस्थांकडे वेळेत जमा केली जात नाही. हा पैसा कर्मचाऱ्यांच्या कष्टाच्या मोबदल्यातील असून त्यांच्या उतारवयाची तरतूद आहे. पीएफ ट्रस्टकडे वर्गणी रक्कम वेळेवर न भरल्याने व्याज मिळत नसल्याने ट्रस्टसुद्धा अडचणीत सापडली आहे. कर्मचाऱ्यांना कर्ज, घरबांधणी किंवा मुलांच्या उच्च शिक्षणासाठी अडचणी येत आहेत. सणासुदीच्या काळात ही थकबाकी कर्मचाऱ्यांच्या मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करते, ज्याचा परिणाम प्रवासी सेवेच्या गुणवत्तेवरही होतो.

आर्थिक संकटामुळे परिणाम

या परिस्थितीकडे केवळ थकबाकी म्हणून पाहणे पुरेसे नाही. याची मुळे खोलवर आहेत. गेल्या पाच वर्षांत इंधनाच्या दरात ४० टक्क्यांहून अधिक वाढ झाली, सुटे भाग आणि टायरच्या किमती दुप्पट झाल्या, त्याच प्रमाणे वेतनावरील खर्चसुद्धा वाढला आहे. कोरोना काळात दोन वर्षे 'एसटी'चे उत्पन्न जवळपास शून्यावर आले होते, पण कर्मचाऱ्यांचे वेतन आणि देखभाल खर्च सुरूच होता. त्यातून झालेले नुकसान आजही भरून निघालेले नाही. या शिवाय सर्वांत मोठा फटका खासगी वाहतुकीमुळे बसत आहे. वडाप, शेअर रिक्षा, बेकायदेशीर खासगी बसेस, दुचाकींची वाढती संख्या या पर्यायी वाहतूक साधनांमुळे 'एसटी'च्या ग्रामीण मार्गांवरील उत्पन्नावर मोठा परिणाम झाला आहे. सरकारचे रस्ते वाहतुकीवरील नियंत्रणाचा अभावही याला कारणीभूत आहे. एकीकडे खर्च वाढतोय, दुसरीकडे उत्पन्न घटतेय. अशी विचित्र स्थिती निर्माण झाली आहे. त्यातच सरकारने जाहीर केलेल्या लोककल्याणकारी योजना-महिला सन्मान योजना, ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, अमृत ज्येष्ठ नागरिक योजना, विद्यार्थ्यांना मोफत प्रवास, या योजनांचे आम्ही स्वागतच करतो. या योजना सामाजिक न्यायासाठी आवश्यक आहेत. पण या सवलतीपोटीचा परतावा वेळेत मिळत नाही. तिकीट विक्रीतून मिळणारे उत्पन्न आणि प्रत्यक्ष खर्च यात मोठी तफावत निर्माण झाली आहे. दीर्घकालीन संपानंतर न्यायालयात कबूल करूनसुद्धा वेतनासाठी पुरेसा निधी सरकार उपलब्ध करून देत नाही. हे राज्यात सर्वांत मोठा रोजगार देणाऱ्या 'एसटी'च्यादृष्टीने योग्य नाही व कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेला छेद देणारी बाब आहे. गेल्या काही महिन्यांतील फक्त कर्मचाऱ्याच्या वेतनाला सरकार कडून मिळणाऱ्या निधीची अधिकृत आकडेवारी पाहिली तर हे संकट अधिक स्पष्ट होते. केवळ ११ महिन्यांतच १,१७८ कोटी १५ लाख रुपयांची तूट निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षांतील कर्मचाऱ्यांना पूर्ण वेतन मिळत नसल्याने त्याची थकीत रक्कम ५,७४० कोटींच्या घरात गेली आहे. ही तूट वाढत गेली तर भविष्यात 'एसटी'ला कर्मचाऱ्यांचे वेतन देणेही अशक्य होईल.

सरकारी मदत की अनुदान

'एसटी'ला सक्षम करण्यासाठी सरकारने तीन स्तरांवर निर्णय घ्यावा. पहिला, वैधानिक देणी आणि कर्मचाऱ्यांच्या थकबाकीचा कालबद्ध कार्यक्रम आखून निधी तातडीने द्यावा. यासाठी विशेष अनुदान पॅकेज जाहीर करावे. दुसरा, दैनंदिन गरजा आणि सवलत प्रतिपूर्तीसाठी वर्षाच्या सुरुवातीला आगाऊ अनुदानाची तरतूद करावी. कर्नाटक, तामिळनाडू, तेलंगण या राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातही 'एसटी'ला परिवहन खर्चाच्या ४० टक्के रक्कम अर्थसंकल्पातून थेट अनुदान म्हणून द्यावी. तिसरा, अर्धवट निधी देऊन एसटीवरील वैधानिक थकीत रक्कमेचा भार वाढवण्यापेक्षा अनुदान दिल्यास महामंडळाला स्थैर्य मिळेल. यासोबतच 'एसटी' प्रशासनानेही उत्पन्नवाढीसाठी नवीन मार्ग, म्हणजेच कुरिअर सेवा, जाहिरात उत्पन्न, आदीकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे. खर्चावर नियंत्रण, इंधन बचत आणि पारदर्शक व्यवस्थापनावर भर द्यावा. सरकारच्या निधीचा विनियोग योग्य होतो आहे का, याचे त्रयस्थ लेखापरीक्षणही करणे आवश्यक आहे. 'एसटी'चे संकट हे केवळ महामंडळाचे नसून राज्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसमोरील आव्हान आहे. 'लालपरी' वाचली तरच ग्रामीण महाराष्ट्र वाचेल. सरकारने वेळीच पावले उचलल्यास कर्मचाऱ्यांना आर्थिक दिलासा मिळेल आणि 'लालपरी'च्या रात्रंदिवस काम करणाऱ्या तिच्या सेवकालासुद्धा दिलासा मिळेल.

(लेखक महाराष्ट्र एसटी कर्मचारी कॉंग्रेसचे सरचिटणीस आहे.)

श्रीरंग बरगे

एल निनो, होर्मुझ आणि भाववाढ

महागाईने रिझर्व्ह बँकेची सहनशील दराची मर्यादा ओलांडल्याने बँक आता रेपो दरामध्ये वाढ करण्याच्या विचारात आहे. बँक दरवाढीद्वारे मागणीजन्य भाववाढीचे नियंत्रण करता येते, परंतु वर्तमान भाववाढ एल निनोच्या प्रभावामुळे उत्पादनात झालेली घट व युद्धामुळे तेलाच्या किमतीत झालेली वाढ व पुरवठ्यात झालेली घट यांच्या एकत्रित परिणामातून झाली आहे. त्यामुळे मागणी नियंत्रित करण्याचे उपाय याबाबतीत प्रभावी ठरू शकत नाहीत. पुरवठा वाढवणे, उत्पादन वाढीतील अडथळे दूर करणे हाच यावर उपाय ठरू शकतो.

गेल्या काही काळापासून महागाई दरात सातत्याने वाढ होतेय. जूनमध्ये ४.३८ टक्के असलेला दर जुलैमध्ये वाढून ४.४५ टक्क्यांवर व ऑगस्टमध्ये ४.८२ टक्क्यांवर गेलाय. नजीकच्या काळात तो ५.९ टक्क्यांवर जाण्याचा भारतीय स्टेट बँकेचा, तर ६.५ टक्क्यांवर जाईल असा रिझर्व्ह बँकेचा अंदाज आहे. महागाई दर रिझर्व्ह बँकेची सहनशील दराची मर्यादा ओलांडत असल्याने बँक येत्या मौद्रिक धोरण समितीच्या बैठकीत रेपो दरात वाढ करण्याच्या विचारात आहे. खाद्यान्न आणि इंधन दरवाढ ही वर्तमान महागाई दरवाढीची प्रमुख कारणे सांगितली जातात. जूनमध्ये खाद्यान्न वाढीचा दर ५.१ टक्के, तर ऑगस्टमध्ये ५.९५ टक्के होता. एल निनोच्या प्रभावामुळे येत्या काळात त्यात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली जातेय. खाद्य तेल, डाळी, भात, साखर, दूध, कांदा, भाजीपाला, अंडी, मांस अशा सर्वच खाद्य पदार्थांचे दर सध्या वाढताहेत.

डाळी, खाद्य तेल, भाजीपाला इत्यादी खाद्य पदार्थांसाठी ग्राहकांना अधिक पैसे मोजावे लागत असले तरी शेतक?याला मात्र त्याचा लाभ होताना दिसत नाही. हमीभावापेक्षा कमी भावावर त्याला समाधान मानावे लागते. एल निनोचा जूनमध्ये सुरू झालेला प्रभाव जानेवारीपर्यंत टिकणार असल्याने खरीपबरोबर रब्बी हंगामदेखील हातचा जाण्याची शक्यता आहे. तशी कबुलीच कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी दिली आहे. मूग, उडीद, तूर, सोयाबीन, कापूस इत्यादी खरीप पिकांच्या उत्पादनात मोठी घट संभवतेय. या संभाव्य उत्पादन घटीमुळे साखरेपासून भाजीपाल्यापर्यंत सर्वच खाद्यान्नाचे दर वाढत आहेत. येत्या काळात नागरिकांना खाद्यान्नाच्या तीव्र संकटाचा सामना करावा लागू शकतो. शिवाय त्यासाठी अधिक पैसे मोजण्याची तयारी ठेवावी लागेल.

इंधनाचे दर गेल्या काही मिळाली. इराणने होर्मुझ समुद्र मार्ग बंद केल्यामुळे तुटवडा निर्माण होऊन दर वाढले आहेत. ७२ डॉलर प्रति पिपापर्यंत खाली आलेल्या दराने आता शंभरी पार केलीय.

तेलाबरोबर खातांच्या वाढलेल्या किमती व तुटवड्याचा शेती उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. शिवाय उत्पादन खर्च रुपयात किमती वाढल्या आहेत. सध्याच्या वाढलेल्या महागाई दरात या आयात वस्तूंच्या वाढलेल्या किमतीचादेखील वाटा आहे. रशिया-युक्रेन तसेच इराण-अमेरिका युद्धामुळे अनेक वर्षांच्या प्रयत्नांनंतर प्रस्थापित झालेली पुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे. त्यातून निर्माण झालेल्या तुटवडा व उत्पादन खर्च वाढीने वाढतेय. १८.६ दशलक्ष एवढे श्रमिक बेरोजगार असल्याचे पियू या संशोधन पेंद्राचे म्हणणे आहे. कृत्रिम प्रज्ञेच्या वाढत्या वापरामुळे बेरोजगारीच्या समस्येची तीव्रता आणखी वाढण्याची शक्यता आहे. रोजगाराच्या ज्या काही संधी निर्माण होताहेत त्या असंघटित क्षेत्रात, जेथे अल्प वेतन तर आहेच, शिवाय ना रोजगाराची हमी आहे यांसारख्या आवश्यक बाबींवरील खर्चात कपात करावी लागतेय. खाद्यान्नाच्या किमती येत्या काळात आणखी वाढणार असल्याने समाजातील मोठ्या वर्गाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महागाईने रिझर्व्ह बँकेची सहनशील दराची मर्यादा

काळापासून वाढू लागल्याने वाहतूक व उत्पादन खर्च वाढीच्या माध्यमातून आधीच वाढणा?या महागाईला आणखी गती मिळाली आहे. सध्या होत असलेली इंधन दरवाढ आणि आजवरच्या दरवाढीत तफावत आहे. पूर्वी ओपेक या तेल उत्पादक राष्ट्रांच्या संघटनेने निर्णय घेतल्यानंतर दर वाढत, परंतु असा कुठलाही निर्णय झालेला नसताना दर वाढताहेत. याला जगातील कांही राष्ट्रांचा युद्धखोरपणा कारणीभूत असल्याचे म्हणावे लागते. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यानंतर दर वाढले. काही महिन्यांपूर्वी अमेरिका-इस्रायलने इराणशी युद्ध पुकारल्यानंतर या दरवाढीला आणखी चालना वाढल्याने खाद्यान्नाचे दरही वाढले आहेत. गेल्या कांही काळापासून रुपयाच्या डॉलर, युरो आदी चलनात होत असलेल्या घसरणीने महागाईच्या दरवाढीला हातभार लावला आहे. साधारण पाच वर्षांखाली एका डॉलरसाठी ७४ रुपये मोजावे लागत. आता त्यासाठी ९६ रुपये मोजावे लागताहेत. पुढे चालून १०० रुपये मोजावे लागतील असा तज्ज्ञांचा होरा आहे. रुपयाच्या अशा घसरणीमुळे आयात वस्तूंच्या किमती डॉलरमध्ये स्थिर असल्या तरी रुपयांमध्ये वाढताहेत. या घसरणीमुळे कच्च्या तेलापासून डाळी, खाद्य तेले, इलेक्ट्रॉनिक वस्तू अशा सर्वच आयात वस्तूंच्या महागाई दरवाढीला हातभारच लावला आहे. महागाई तशी भारतीयांसाठी नवीन नाही. रडतखडत का होईना, ते तिचा सामना करत आले आहेत. काळानुरूप तिची कारणं आणि परिणाम यात तफावत आढळते.

वेगवान अर्थव्यवस्था म्हणून भारताचा जगभर गवगवा होतोय खरा, परंतु रोजगार व उत्पन्न वाढीच्या रूपाने तिचा लाभ होत नसल्याने लोकांमध्ये प्रचंड नाराजी आहे. विकास दर ७.८ टक्के असला तरी दरडोई उत्पन्न वाढीचा दर २.८ टक्के आहे. उच्चशिक्षित, पदवीधर, अल्पशिक्षित, कुशल, अकुशल अशा सर्वच श्रमिकांमधील बेरोजगारीचे प्रमाण सातत्याने ना सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ आहे. 'गीग' आणि 'प्लॅटफॉर्म' वर्कर हे त्याचे उदाहरण. वाढती महागाई आणि मर्यादित व बेभरवशाचे उत्पन्न यामुळे कुटुंबाचा कोलमडलेला अर्थसंकल्प कुटुंबातील स्त्रिया छोटी मोठी नोकरी करून सावरण्याचा प्रयत्न करताहेत. बचतीची महती नव्याने सांगण्याची गरज नाही, परंतु महागाई व मर्यादित उत्पन्नाच्या द्वंद्वात अडकलेल्या कुटुंबांना बचत करणे तर दूर, भूतकालीन बचत, सोने मोडून प्रपंच चालवावा लागतोय. ऐच्छिक खर्च थांबवण्याबरोबर शिक्षण, आरोग्य ओलांडल्याने बँक दरामध्ये वाढ करण्याच्या विचारात आहे. बँक दरवाढीद्वारे मागणीजन्य भाववाढीचे नियंत्रण करता येते, परंतु वर्तमान भाववाढ एल निनोच्या प्रभावामुळे उत्पादनात झालेली घट व युद्धामुळे तेलाच्या किमतीत झालेली वाढ व पुरवठ्यात झालेली घट यांच्या एकत्रित परिणामातून झाली आहे. त्यामुळे मागणी नियंत्रित करण्याचे उपाय याबाबतीत प्रभावी ठरू शकत नाहीत. पुरवठा वाढवणे, उत्पादन वाढीतील अडथळे दूर करणे हाच यावर उपाय ठरू शकतो.

प्रा. सुभाष बागल

संवाद

विधान परिषदेचा वास्तववादी आरसा

कर्नाटक विधान परिषद निवडणुकांच्या संदर्भातील हा मुद्दा सध्या राजकीय वर्तुळात अत्यंत चर्चेचा विषय ठरला आहे. बॅलेट पेपरद्वारे (मतपत्रिकेद्वारे) पार पडलेल्या या निवडणुकीत भाजप-जेडीएस युतीने सर्वच्या सर्व जागांवर विजय मिळवला आहे.एकीकडे काँग्रेस पक्षाकडून सातत्याने ईव्हीएम प्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते, मात्र कर्नाटक विधान परिषदेच्या या निवडणुकांमध्ये मतपत्रिकांचा वापर होऊनही सत्ताधारी काँग्रेस पक्षाला एकही जागा मिळवता आलेली नाही. यावरून हे स्पष्ट होते की, निवडणुका ईव्हीएमवर असोत किंवा बॅलेट पेपरवर, कोणत्याही पक्षाच्या पराभवानंतर केवळ यंत्रणेवर खापर फोडण्यापेक्षा पक्षाची रणनीती, स्थानिक पातळीवरील जनसंपर्क आणि नेतृत्वाची पकड कुठे कमी पडत आहे, याचे गंभीर आत्मपरीक्षण करणे गरजेचे असते. आज जनतेचा कल नेमका कोणत्या दिशेने आहे, हे अशा निवडणुकांच्या निकालांवरून स्पष्ट होते. जर स्थानिक किंवा विशेष मतदारसंघांतून पक्षाच्या विरोधात कौल जात असेल, तर केवळ केंद्रीय यंत्रणांवर किंवा प्रक्रियेवर टीका करण्यापेक्षा पक्षाने आपल्या धोरणांमध्ये बदल करण्याची वेळ आली आहे, हाच यातून मिळणारा मुख्य संदेश आहे.

अविनाश देशपांडे

विविध विधानसभांमध्ये कायदे मंजुरीला वेळ कमी

अलीकडे देशातील विविध विधानसभांमध्ये कायदे लवकर मंजूर होत आहेत. चर्चा व संवाद याना पुरेसा वेळ मिळत नाही असे दिसते.पीआरएस लेजिस्लेटिव्ह च्या अहवालानुसार अनेक गोष्टी समोर आल्या आहेत त्या नुकत्याच वाचण्यात आल्या.२०२५ या वर्षात ३० टक्के विधेयके ज्या दिवशी सभागृहात मांडण्यात आली त्याच दिवशी ती पारित सुद्धा झाली .विधानसभांचे कामकाज सरासरी २४ दिवस चालले.आंध्र, बिहार,गुजरात आदी अनेक राज्यात सगळे बिल एक ते दोन दिवसात मंजूर झाले कर्नाटकमध्ये एकाच बैठकीत १७ बिल मंजूर झाली.सर्वात कमी कामकाज नागालँड विधानसभा मध्ये झाले जे केवळ सात दिवस चालले.पंजाब मध्ये बजेटवर केवळ दोन दिवस चर्चा झाली.अध्यादेश काढण्याचे प्रमाण २०२४ वर्षापेक्षा२७ टक्के जास्त आहे.बजेट चा विचार करता त्यावर सरासरी आठ दिवस चर्चा झाली तामिळनाडू मध्ये बजेटवर २७ दिवस चर्चा झाली.देशातील सर्व विधानसभांमध्ये ओडिसा राज्यात विधानसभेचे ४३ दिवसासह जास्त दिवस कामकाज झाले.

शांताराम वाघ

वन्यप्राण्यांच्या नुकसान भरपाईतही लाचेची मागणी!

शेतकरी दाम्पत्याकडून एक हजारांची मागणी हिवरीतील महिला वनरक्षक एसीबीच्या जाळ्यात

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २८ : वन्यप्राण्यांनी शेतातील पिकांचे नुकसान केल्यानंतर शासनाकडून मिळणारी भरपाई ही शेतकऱ्यांसाठी आर्थिक आधार ठरते. मात्र, याच नुकसान भरपाईसाठी शेतकरी दाम्पत्याकडून लाचेची मागणी झाल्याचा धक्कादायक प्रकार हिवरी येथील वनविभागाच्या कार्यालयात उघडकीस आला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) बुधवारी, २८ ऑक्टोबर रोजी कारवाई करत महिला वनरक्षक कल्पना राठोड यांना एक हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडले.

कल्पना राठोड या हिवरी येथील प्रादेशिक वनविभागाच्या कार्यालयात वनरक्षक वर्ग-३ पदावर कार्यरत आहेत. यवतमाळ तालुक्यातील ४६ वर्षीय शेतकऱ्याने स्वतःच्या तसेच पत्नीच्या नावावरील शेतातील पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान झाल्याने शासनाकडून भरपाई मिळावी, यासाठी दोन स्वतंत्र अर्ज दाखल केले होते. या भरपाईसाठी संबंधित महिला वनरक्षकाने दोन्ही अर्जां करिता प्रत्येकी ५०० रुपया प्रमाणे एकूण एक हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार एसीबी कडे करण्यात आली होती. तक्रारीच्या अनुषंगाने एसीबीने बुधवारी दुपारी पंचासमक्ष पडताळणी केली. त्यात लाचेची मागणी करून रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाल्याचे विभागाने म्हटले आहे. त्यानंतर दुपारी १.४२ ते १.५४ या वेळेत रचलेल्या सापळ्यात महिला वनरक्षकाने कार्यालयात तक्रारदारा कडून एक हजार रुपये स्वीकारले. पथकाने तत्काळ कारवाई करत लाचेची रक्कम जप्त केली. या प्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियमाच्या कलम ७ अन्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. आरोपीला ताब्यात घेण्यात आले असून, पुढील कारवाई सुरू असल्याची माहिती एसीबीने दिली. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवण्यासाठी ही लाचेचा अडसर निर्माण होत असेल, तर प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. या प्रकरणाच्या निष्पक्ष तपासातून संबंधितांची जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्थांच्या सक्षमीकरणावर भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २८ : समाजसेवेची तळमळ असूनही आर्थिक पाठबळ, शासकीय योजनांची माहिती आणि आवश्यक कागदपत्रांच्या अभावामुळे अनेक स्वयंसेवी संस्थांचे कार्य मर्यादित राहते. ही अडचण दूर करून संस्थांना सक्षम व आत्मनिर्भर बनविण्याच्या उद्देशाने दीनदयाल प्रबोधिनीत एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात पार पडली.

ग्रामायण प्रतिष्ठान, नागपूर आणि दीनदयाल सेवा प्रतिष्ठान, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यशाळेत सहा जिल्ह्यांतील २२ संस्थांचे ४० हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले. ग्रामायणचे विजय खटी यांनी एनजीओ नोंदणी, १२ए, ८०जी, सीएसआर-१, सीएसआर निधी

मिळविण्याची प्रक्रिया, प्रकल्प अहवाल, लेखापरीक्षण आणि आवश्यक कागदपत्रांबाबत मार्गदर्शन केले. ग्रामायणचे अध्यक्ष अनिल सांबरे यांनी ब्रँडिंग व सोशल मीडियाचे महत्त्व विशद केले. यावेळी विजय कद्रे, डॉ. चंद्रकांत रागीट, संजय सराफ, मंजुषा रागीट आणि गजानन परसोडकर उपस्थित होते. केवळ समाजसेवेची इच्छाशक्ती पुरेशी नसून, संस्थात्मक पारदर्शकता, आर्थिक नियोजन आणि प्रभावी व्यवस्थापनही आवश्यक असल्याचा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला.

हजारो ब्रास रेतीसाठा प्रकरणी उच्च न्यायालयाचे जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश!

बोरेले यांच्या तक्रारीवर आठ आठवड्यांत निर्णय घ्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २८ : आर्णी तालुक्यातील जलांद्री आणि झरी-जामणी तालुक्यातील सतपल्ली येथील कथित अवैध रेतीसाठ्याप्रकरणी दाखल याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने यवतमाळच्या जिल्हाधिकाऱ्यांना तक्रारीवर निर्णय घेण्याचे निर्देश दिले आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ते रजनीकांत बोरेले यांच्या याचिकेमुळे हजारो ब्रास रेतीसाठ्याचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे.

बोरेले यांनी जलांद्री येथील २० हजार ब्रास आणि सतपल्ली येथील १० हजार ब्रास रेतीसाठ्याबाबत शासनाकडे पुराव्यांसह तक्रारी केल्या होत्या. या प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फत चौकशी, रेतीसाठ्याचे मोजमाप, साठ्याचे संरक्षण तसेच दोषींवर कारवाई करून महसुली नुकसानभरपाई वसूल करण्याची मागणी त्यांनी केली होती. मात्र, अपेक्षित कार्यवाही न झाल्याने त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी न्यायमूर्ती अनिल एस. किलोर आणि न्यायमूर्ती रजनीश आर. व्यास यांच्या खंडपीठासमोर याचिकेवर सुनावणी झाली. बोरेले यांनी एका आठवड्यात जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन सादर करावे आणि संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकून जिल्हाधिकाऱ्यांनी आठ आठवड्यांत निर्णय घ्यावा, असे निर्देश न्यायालयाने दिले. निर्णयाची माहिती एका आठवड्यात याचिकाकर्त्याला देण्याचेही आदेशात नमूद आहे. दरम्यान, रेतीसाठ्याच्या दंडात्मक कारवाईतील रक्कम आणि चार कोटी रुपयांच्या प्रस्तावाबाबत बोरेले यांनी उपस्थित केलेले प्रश्न अद्याप चर्चेत आहेत. आता जिल्हा प्रशासन या प्रकरणात काय भूमिका घेते, याकडे लक्ष लागले आहे.

थोडक्यात

स्व.ऋतुजाच्या वडिलांनी बेघर मुलींसोबत वाढदिवस केला साजरा

सावित्रीच्या लेकींच्या चेहऱ्यावर शोधली आपल्या लेकीची छबी

यवतमाळ : लेकीचा वाढदिवस साजरा करण्यासाठी ती सोबत नसल्याची जाणीव पित्याच्या काळजाला किती वेदना देत असेल, याची कल्पनाही करवत नाही. मात्र, याच वेदनेला सामाजिक संवेदन शीलतेची जोड देत स्व. ऋतुजा धीरज बेदरकर हिचे वडील धीरज बेदरकर यांनी आपल्या लेकीचा वाढदिवस वाघाडी येथील 'सावित्रीच्या लेकी' या बेघर मुलींच्या आश्रमात साजरा केला. या भावस्पर्शी उपक्रमाने उपस्थितांचे डोळे पाणावले. १ फेब्रुवारी २०२६ रोजी ऋतुजाने जगाचा निरोप घेतला. तिच्या आठवणी आजही कुटुंबीयाच्या मनात खोलवर रुजलेल्या आहेत. २८ ऑक्टोबर रोजी ऋतुजाच्या वाढदिवसानिमित्त धीरज बेदरकर यांनी आश्रमातील मुलींसाठी भोजनाची व्यवस्था केली. मुलींच्या उपस्थितीत केक कापून ऋतुजाचा वाढदिवस साजरा करण्यात आला. सर्व मुलींना केक भरवून त्यांच्यासोबत भोजन ही करण्यात आले. आयुष्यात अनेक संकटांशी झुंज देणाऱ्या या मुलींच्या चेहऱ्यावर आनंद फुलवताना धीरज बेदरकर यांनी जणू त्यांच्यातच आपल्या ऋतुजाला शोधण्याचा प्रयत्न केला. लेकीच्या आठवणीने वडिलांचे अश्रू अनावर झाले; मात्र दुःख मनात साठवून त्यांनी मुलींसोबत आनंदाचे क्षण वाटले. लेकीच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणार नाही.पण तिच्या स्मृतीत दुसऱ्यांच्या आयुष्यात आनंद फुलविण्याचा हा प्रयत्न माणुसकीचा हृदयस्पर्शी संदेश देऊन गेला.

कापसाच्या भावात ३०० रुपयांची तफावत,शेतकऱ्यांची लूट थाबवा..!

पांढरकवडा बाजारपेठेतील दरांची चौकशी करा.

पांढरकवडा : कापूस उत्पादक शेतकरी उत्पादन खर्चाच्या ओझ्याखाली दबलेला असताना पांढरकवडा बाजारपेठेत इतर बाजाराच्या तुलनेत प्रतिक्विंटल ३०० रुपयांपर्यंत कमी दर मिळत असल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. समान दर्जाच्या कापसाच्या दरांत एवढी तफावत का, असा सवाल उपस्थित करत युवा टायगर फोर्सने प्रशासनाकडे चौकशीची मागणी केली आहे. संघटनेचे अध्यक्ष मदन जिद्देवार यांनी जिल्हाधिकारी, जिल्हा उपनिबंधक, पणन विभाग, वैधमापनशास्त्र विभाग आणि पोलीस अधीक्षकासह संबंधित यंत्रणांना निवेदन दिले आहे. पांढरकवडा, राळेगाव, वणी, घाटंजी व यवतमाळ येथील कापूस खरेदीदरांची तुलनात्मक तपासणी करून तफावतीमागील कारणे स्पष्ट करावीत. जिनिंग-प्रेसिंग कारखान्यांतील इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यांचे प्रमाणीकरण, अचूकता आणि व्यवहार नोंदींची अचानक तपासणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. बाजार समित्या, खासगी खरेदी केंद्रे आणि व्यापाऱ्यांच्या खरेदी नोंदी, प्रतवारी, पावत्या व देयकांचीही पडताळणी करण्यावर संघटनेने भर दिला आहे. वजनातील फेरफार किंवा अनधिकृत कपात आढळल्यास दोषींवर कारवाई करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, तसेच चौकशीचा अहवाल लेखी स्वरूपात द्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. शेतकऱ्यांच्या कष्टाच्या पैशांवर गदा येत असल्यास प्रशासनाने मौन न बाळगता वस्तुस्थिती स्पष्ट करावी. अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही मदन जिद्देवार यांनी दिला आहे.

आरोग्य केंद्राच्या नालीत मृतदेह, पाटणबोरीत खळबळ!

व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मृतकाची ओळख पटली मृत्यूचे कारण अद्याप गुलदस्त्यात

पाटणबोरी : येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या नालीत एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने सोमवारी (२७ ऑक्टोबर) परिसरात खळबळ उडाली. सकाळी सुमारे दहाच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. नालीत उलट्या अवस्थेत मृतदेह पडलेला असल्याने सुरुवातीला मृतकाची ओळख पटविणे पोलिसांसमोर आव्हान ठरले. अखेर व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून मृतकाची ओळख पटली असून, नारायण आनंदराव वड्डे (६२, रा. गावराई) असे त्यांचे नाव आहे. घटनेची माहिती मिळताच पांढरकवडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर पेंढारकर यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी नालीतून मृतदेह बाहेर काढून पंचनामा केला. त्यानंतर मृतकाची ओळख पटविण्यासाठी नागरिकांकडून माहिती मागविण्यात आली. व्हॉट्सअॅप समूहाच्या माध्यमातून केलेल्या प्रयत्नांना अखेर यश आले. मिळालेल्या माहितीनुसार, नारायण वड्डे हे सध्या घुबडी येथील त्यांची मुलगी सविता अशोक तोडसाम यांच्याकडे वास्तव्यास होते. शनिवारी ते निंबादेवी येथे जात असल्याचे सांगून घरातून निघाले होते. तेथेच गेले असावेत, असा कुटुंबीयांचा समज असल्याने त्यांना या घटनेची माहिती नव्हती. विशेष म्हणजे, वड्डे हे रुग्ण म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल झाले नसल्याने तेथील नोंदवहीत त्यांच्या नावाची नोंद नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. नालीत मृतदेह कसा आला? मृत्यू नेमका कशामुळे झाला? या प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. मृत्यूचे कारण स्पष्ट झाले नसून, या घटनेमागील परिस्थितीचा उलगडा करण्यासाठी पांढरकवडा पोलीस पुढील तपास करीत आहेत.

नैसर्गिक शेतीकडे वळा,अन्यथा उत्पादन खर्च ठरणार डोकेदुखी!

शेतकरी शाळा उत्साहात, जमिनीचे आरोग्य जपण्यावर तज्ज्ञांचा भर

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

बाभुळगाव, दि. २८ : रासायनिक खते आणि कीटकनाशकांचा वाढता वापर, उत्पादन खर्चातील वाढ आणि जमिनीच्या सुपीकतेवर होणारे दुष्परिणाम या पार्श्वभूमीवर नैसर्गिक व जैविक शेतीचा पर्याय स्वीकारणे ही काळाची गरज बनली आहे. शेतातील उपलब्ध नैसर्गिक संसाधनांचा वापर करून कमी खर्चात शेती करावी आणि जमिनीचे आरोग्य जपावे, असे आवाहन कृषी क्षेत्रातील तज्ज्ञांनी केले.

प्रकल्प संचालक, आत्मा यवतमाळ, तालुका कृषी अधिकारी, बाभुळगाव आणि सर्ग विकास समिती, अकोला यांच्या समन्वयातून परंपरागत कृषी विकास योजनेंतर्गत २८६ गट योजनेतील पाच शेतकरी गटांच्या प्रथम शेतकरी शाळेचे आयोजन २६ ऑक्टोबर रोजी बाभुळगाव येथील

सम्राट दाल मिल येथे करण्यात आले. नैसर्गिक व जैविक शेतीविषयक ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सम्राट गटाचे सचिव मधुकर निवल होते. सर्ग समितीचे विभागीय समन्वयक शिवाजी भारती, जिल्हा व्यवस्थापक सूरज थोरात, प्रशिक्षण तज्ज्ञ नागोराव भास्कर, तालुका आत्माचे तंत्र अधिकारी गजानन घाटे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शिवाजी भारती यांनी रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे मातीच्या नैसर्गिक गुणधर्मांवर होणाऱ्या परिणामांकडे लक्ष वेधले. शेतातील पालापाचोळा, कुटार, गांडूळखत आणि स्थानिक पातळीवर उपलब्ध नैसर्गिक घटकांपासून जैविक निविष्ठा तयार करून शेतीचा खर्च कमी करता येऊ शकतो, असे त्यांनी सांगितले. सूरज थोरात यांनी मातीचे आरोग्य, सेंद्रिय खत व्यवस्थापन, जैविक निविष्ठा आणि पीक पद्धती याविषयी मार्गदर्शन केले. केवळ रासायनिक निविष्ठांवर अवलंबून न राहता उपलब्ध संसाधनांचा प्रभावी वापर करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यशाळेला स्वयम, पशुधन, नांदुरा खुर्द आणि बाभुळगाव येथील शेतकरी गटांचे सदस्य उपस्थित होते. आशिष दिघाडे यांनी संचालन केले, तर नामदेव भास्कर यांनी आभार मानले.

राजविहार कॉलनीची संरक्षक भिंत कोसळली..!

खाजगी ठेकेदारांनी खोदकाम केल्यामुळे भिंत कमजोर झाल्याचा आरोप!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

पुसद, दि. २८ : शहरातील प्रभाग क्रमांक १५ मधील राजविहार कॉलनीची नाल्यालगत असलेली संरक्षक भिंत कोसळल्याने खाजगी बांधकाम ठेकेदार व संबंधित प्लॉटधारक यांचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर आला आहे.नगरपरिषद अंतर्गत नाल्याच्या बांधकामासाठी जेसीबीच्या साहाय्याने खोदकाम केले.

या खोदकामामुळे पाच वर्षांपूर्वी लेआउट मालकांनी बांधलेली संरक्षक भिंत कमजोर होऊन कोसळल्याचा आरोप कॉलनीतील नागरिकांनी केला आहे. राजविहार कॉलनीतील ही भिंत दरवर्षी नाल्याला येणाऱ्या पुरापासून नागरिकांच्या घरांचे आणि मालमत्तेचे संरक्षण करत होती. मात्र, नगरपरिषदेच्या नाल्याच्या खोदकामामुळे भिंतीचा पाया

कमजोर झाल्याने ती कोसळली. त्यामुळे परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, आगामी पावसाळ्यात नाल्याला पूर आल्यास कॉलनीला धोका निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. नाल्याचे बांधकाम करताना जुन्या संरक्षक भिंतीची सुरक्षितता तपासण्यात आली होती का? खोदकामामुळे भिंतीला धोका निर्माण होणार असल्याची शक्यता लक्षात घेऊन योग्य खबरदारी घेण्यात आली होती का? असे प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केले जात आहेत. विकासकामांच्या नावाखाली नागरिकांच्या मालमत्तेचे नुकसान होणे आणि जीविताला धोका निर्माण होणे ही गंभीर बाब असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या घटनेच्या पार्श्वभूमीवर राजविहार कॉलनीतील नागरिकांनी नगरपरिषद पुसदला निवेदन देऊन कोसळलेली संरक्षक भिंत पुन्हा मजबूत व दर्जेदार बांधून देण्याची मागणी केली आहे. तसेच संबंधित कामाची चौकशी करून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. नगरपरिषद प्रशासनाने या घटनेची गंभीर दखल घेऊन नागरिकांच्या मालमत्तेचे आणि जीविताचे संरक्षण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा राजविहार कॉलनीतील नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

मुकूटबनमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर!

भरधाव वाहनांमुळे अपघाताचा धोका,शाळेच्या वेळेत पोलीस तैनात करण्याची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

मुकूटबन, दि. २८ : शहरातील अनधिकृत ट्रक पार्किंग आणि भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे शाळकरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. संभाव्य अपघाताची वाट पाहण्याऐवजी पोलीस प्रशासनाने वेळीच उपाययोजना कराव्यात, अशी मागणी शहरातील विविध शाळांच्या मुख्याध्यापकांनी केली आहे. यासंदर्भात मुकूटबन पोलीस ठाण्याच्या पोलीस उपनिरीक्षकांना निवेदन सादर करण्यात आले.

मुकूटबन शहरातील रस्त्यांवर अनधिकृतपणे ट्रक उभे केले जात असल्याने वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. त्यातच काही वाहनचालक भरधाव वेगाने वाहने चालवत असल्याने पादचारी, दुचाकीस्वार आणि विशेषतः शाळेत ये-जा करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. शाळा भरण्याच्या आणि सुटण्याच्या

वेळेत विद्यार्थ्यांची रस्त्यांवर मोठी वर्दळ असते. अशा वेळी वाहतुकीवर नियंत्रण नसल्यास गंभीर अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपघातानंतर जागे होणार की आधीच उपाय करणार? अशी प्रतिक्रिया व्यक्त करत विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कारवाई आवश्यक आहे. रस्त्यांवरील अनधिकृत ट्रक पार्किंग हटवावे, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कठोर कारवाई करावी आणि शाळा भरण्याच्या व सुटण्याच्या वेळेत संबंधित ठिकाणी पोलीस कर्मचारी तैनात करावेत, अशा प्रमुख मागण्या निवेदनातून करण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी लक्षात घेता पोलीस प्रशासनाने या मागण्यांची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा दुर्घटना टाळण्यासाठी आधीच पावले उचलणे महत्त्वाचे आहे, अशी भूमिका मुख्याध्यापकांनी मांडली. निवेदन देताना निलेश चौधरी, विलास चिट्टलवार, बबन चांदेकर, चंद्रशेखर वैद्य, कोंगरे, परचाके, अर्जुन कोल्हे, सुधीर यमजलवार आणि सार्थक मुन यांच्यासह मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते.

मायक्रो फायनान्सच्या वसुलीविरोधात शेकडो महिला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या

जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या नेतृत्वात दुष्काळग्रस्त महिलांचा एल्गार.

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २८ : यवतमाळ जिल्ह्यात कोरड्या दुष्काळामुळे हाताला काम नाही, घरात उत्पन्न नाही, अशा संकटात सापडलेल्या महिलांवर मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून कर्जवसुलीसाठी दबाव टाकला जात असल्याच्या तक्रारींवरून जन आंदोलन आधार संघर्ष समितीच्या नेतृत्वात शेकडो महिला जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकल्या.

जनतेने कायदा हातात घेण्या अगोदर मायक्रो फायनान्स कर्ज वसुली स्थगित करावी जनतेचा संयम तुटण्याअगोदर जिल्हाधिकारी महोदयांनी तात्काळ कर्ज वसुली स्थगिती आदेश काढून न्याय द्यावा जगदीश नरवाडे संस्थापक अध्यक्ष जन आंदोलन आधार संघर्ष समिती

दुष्काळामुळे शेतकरी व शेतमजुरांची आर्थिक परिस्थिती बिकट झाली असताना कर्जाच्या हप्त्यासाठी महिलांना दमदाटी करणे, मानसिक त्रास देणे, रात्री-अपरात्री घरी जाणे तसेच व्हिडिओ कॉलद्वारे दबाव आणणे, अशा प्रकारा बाबत महिलांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. समितीचे संस्थापक अध्यक्ष जगदीश नरवाडे यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी प्रशासनाकडे दुष्काळग्रस्त कर्जदारांना दिलासा देण्याची मागणी केली. मायक्रो फायनान्स कर्जवसुली व हप्ते भरण्यास तात्पुरती स्थगिती देण्यासाठी शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, महिलांचा मानसिक छळ थांबवावा आणि नियमबाह्य वसुली करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. दुष्काळात रोजगार नाही, घरात पैसा नाही. मग कर्जाचे हप्ते भरायचे तरी कसे?असा सवाल उपस्थित करत संकटात सापडलेल्या महिलांना आर्थिक दिलासा देण्याची गरज नरवाडे यांनी अधोरेखित केली. महिलांना सन्मानाने जगता यावे, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची जबरदस्ती होऊ नये आणि प्रशासनाने या प्रश्नात तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी जन आंदोलन आधार संघर्ष समिती च्या वतीने जगदीश नरवाडे शारदा फोन करपे आरती गजानन मस्के गंगा भगवान काळे छायाबाई राऊत शशिकला सुनील आसोले परवीण फिरोज पठाण यांच्यासह शेकडो महिला उपस्थित होत्या .

हिवरा (सं) येथे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने विजयादशमी व शस्त्रपूजन !

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

महागाव, दि. २८ : महागाव राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे विचार हे केवळ बोलण्यासाठी नसून आचरणात आणण्यासाठी आहे.संघ स्वयंसेवक नेहमीच आपल्या आचरणातून समाजासमोर आदर्श ठेवतात.

समाजातील सर्व स्तरावर संघ स्वयंसेवक हिंदुत्वाचे विचार रुजवताना सर्वस्व पणाला लावतो.दुर्बल समाजाला बलवान करण्यासाठी,राष्ट्रभक्तीचे संस्कार रुजवण्यासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ दैनिक शाखेच्या माध्यमातून सतत प्रयत्नशील असतो असे विचार नेरपरसोपंत येथील अनिलजी गावंडे यांनी मांडले ते तालुक्यातील हिवरा संगम येथील विजयादशमी व शस्त्रपूजन उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. उत्सवाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते शस्त्रपूजन करण्यात

आले.शाखा कार्यवाह शुभम करनेवार यांनी पुष्पगुच्छ देऊन अध्यक्ष दिगंबर जगताप सर यांचे स्वागत केले. गौरव अलोने याने सुभाषित तर सारंग सावनकर यांनी अमृतवचन म्हटले श्रीराज गांधे यांनी सांघिक गीत गायले. अभय बोंपीलवार यांनी उत्सवाचे प्रास्ताविक, परिचय व आभारप्रदर्शन केले. अध्यक्षीय भाषणातून श्री.दिगंबर जगताप सर यांनी विचार व्यक्त करताना संघ कार्याचा गुणगौरव केला.संघ व्यापक विचार घेऊन समाजात व्यक्ती निर्माणाचे काम करतो असे म्हणाले. प्रार्थना श्री.दत्तात्रय क्षीरसागर यांनी म्हटली. उत्सवात गावातील नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

झरी-जामणीत 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानाचा शुभारंभ.

सतपल्ली गावातून शुभारंभ,प्रत्येक गावात पोहोचणार काँग्रेसचे अभियान

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

झरी-जामणी, दि. २८ : मतदानाचे महत्त्व आणि लोकशाही मूल्यांच्या जतनाचा संदेश देण्यासाठी झरी-जामणी तालुक्यात काँग्रेसच्या वतीने 'वोट बचाओ, देश बचाओ' अभियानाला सुरुवात करण्यात आली. तालुक्यातील प्रत्येक गावाला भेट देऊन नागरिकांमध्ये जनजागृती करण्याचा संकल्प करण्यात आला असून, सतपल्ली गावातून या अभियानाचा प्रारंभ झाला.

खासदार प्रतिभा धानोरकर, माजी आमदार वामनराव कासावार आणि काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हे अभियान राबविण्यात येत आहे. मतदानाचा अधिकार, लोकशाहीचे संरक्षण आणि नागरिकांची जागरूकता हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. केवळ मतदानापुरती नव्हे, तर लोकशाही प्रक्रियेतील नागरिकांचा सक्रिय सहभाग वाढविण्यावरही भर देण्यात येणार आहे. यावेळी काँग्रेसचे झरी तालुकाध्यक्ष संदीप बुर्रेवार, पाटण सर्कलचे उपाध्यक्ष हरिदास गुरजलवार, केशव लक्षट्टीवार, विठ्ठल केमेकर, विठ्ठल गिज्जेवार यांच्यासह वटोली गावातील नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी काळात तालुकाभर अभियान राबवून लोकशाहीविषयक जनजागृती करण्याचा निर्धार कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची दिवाळी गोड करणार!

शेतकरी संवेदना मंचाचा पुढाकार १ नोव्हेंबरला किराणा व फराळ वाटप

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

यवतमाळ, दि. २८ : शेतकरी आत्महत्येने उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांच्या आयुष्यात आशेचा दिवा पेटविण्यासाठी यवतमाळमधील सहा सामाजिक संस्था एकवटल्या आहेत. 'शेतकरी संवेदना मंचा'च्या वतीने १ नोव्हेंबर रोजी आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना किराणा साहित्य आणि दिवाळीचा फराळ वितरित करण्यात येणार आहे.

शेतकरी कुटुंबांच्या दुःखात सहभागी होत त्यांना जगण्याचे बळ देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सकाळी १० वाजता शिवाजी गार्डन रोडवरील केमिस्ट भवन येथे हा कार्यक्रम होईल. धैर्य वेल्फेअर फाउंडेशन, प्रतिभा फाउंडेशन, युनिटी फाउंडेशन, वेध सेवा ट्रस्ट, सखी समर्पण आणि भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ यांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. सत्कार-भाषणांना फाटा देत माणुसकीला प्राधान्य! मदत करणारे दानदाते आणि मदत स्वीकारणारी कुटुंबे हेच कार्यक्रमाचे प्रमुख असतील. समाजाने या कुटुंबांच्या पाठीशी उभे राहून त्यांना आधार द्यावा, असे आवाहन मंचाने केले आहे.

वैनगंगा - नळगंगा प्रकल्पात जमिनीला योग्य मोबदला न मिळाल्याने शेतकऱ्यांचे बेमुदत आंदोलन

शेतकऱ्यांनी दिले उपविभागीय अधिकाऱ्यांना निवेदन, रेडी रेकनर दर वाढविण्याची मागणी

चांदूर रेल्वे/वार्ताहर

वैनगंगा-नळगंगा नदी जोडो प्रकल्पांतर्गत जमीन संपादनात शेतकऱ्यांना कमी मोबदला मिळत असल्याचा आरोप करत परिसरातील शेतकऱ्यांनी शेतकरी कृती समिती स्थापन करून सरकारच्या या अन्यायकारक धोरणाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. यामुळे चांदूर रेल्वे, धामणगाव आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांना निवेदन देऊन बेमुदत धरणे आंदोलनाचा इशारा देत मंगळवार सकाळपासून

आंदोलन सुरू केले आहे.

शेतकऱ्यांनी उपविभागीय अधिकारी तेजश्री कोरे यांना निवेदन देताना सांगितले की, प्रकल्पासाठी जमीन संपादनाची प्रक्रिया सुरू झाली आहे. मात्र या प्रक्रियेत जमिनीचा मोबदला हा जुन्या बाजारभाव आणि जुन्या रेडी रेकनर दरानुसार दिला जात आहे. तर प्रत्यक्षात चालू बाजारभाव त्यापेक्षा कित्येक पटीने जास्त आहे. नियमानुसार चालू बाजारभाव पाहून जिल्हाधिकाऱ्यांनी सरकारी दर (रेडी रेकनर) अद्ययावत करणे गरजेचे आहे, परंतु ते करण्यात आलेले नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची मागणी आहे की, चालू बाजारभावानुसार रेडी रेकनरचा नवीन दर जाहीर करावा आणि त्यानंतरच शेतकऱ्यांच्या जमिनीचे संपादन करावे. निवेदनात शेतकऱ्यांनी म्हटले आहे की, जोपर्यंत त्यांची मागणी पूर्ण होत नाही, तोपर्यंत दिनांक २७ ऑक्टोबरपासून उपविभागीय कार्यालय, चांदूर रेल्वे समोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू राहील. यासाठी संबंधित विभागाला परवानगी मागणीची सूचना देण्यात आली असून, एक-एक दिवस करत सर्व बाधित गावातील शेतकरी यात सहभागी होणार आहेत.यामध्ये पहिल्या दिवशी शिरगाव येथील शेतकरी गणेश खाकरे, दिलीप भालकर, विलास कडू, आदेश कोरडे, धनराज बनसोड, उमेश गावंडे, श्रीरामजी कोरडे, हितेश ढोरे, नारायण ढेपे, संदीप भालकर, सुरज इंगोले, सोपानराव मोटघरे, दिलीप काळबांडे, संजय गावंडे, ज्ञानेश्वर खाकरे, महिलांमध्ये सीमा बनसोड, संगीता बद्रे, जयश्री खाकरे, राजश्री ठाकरे, शुभांगी भालकर, विजया काळबांडे, व वच्छला सोनवणे, सविता बनसोड, रेणुका गावंडे, रक्षा गावंडे, लता काळबांडे, पुष्पा काळबांडे, शेतकरी नेते नंदू खेरडे, नगरसेवक हर्षल वाघ, राहुल इंगोले, प्रा. प्रभाकर वाघ, तुषार इंगोले, भास्कर बनसोड, राजू बद्रे, अशोक जयस्वाल, नितीन देशमुख, दिलीप काळबांडे, संगीता बद्रे, ॲड. करमोरे आणि अन्य शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वंचित बहुजन आघाडीचे ठिय्या आंदोलन

बोर्डा गावात शिक्षक नियुक्तीसह स्वच्छ पाण्याची मागणी



तिवसा/वार्ताहर

तालुक्यातील बोर्डा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक नियुक्ती व स्वच्छ पाणी पुवठ्यासाठी तथा नादुरुस्त आर ओ वॉटर प्लांट दुरुस्ती करिता वंचित बहुजन आघाडीने आक्रमक पवित्रा घेत तिवसा पंचायत समिती गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर २७ ऑक्टोबर रोजी ठिय्या आंदोलन केले.

बोर्डा गावात जिल्हा परिषद शाळेत शिक्षक नियुक्त करण्यात यावा, नादुरुस्त वॉटर प्लांट नागरिकांच्या सुविधेसाठी सुरू करण्यात यावे, स्वच्छ पाणी पुरवठा करण्यात यावा, आरोग्य उपकेंद्र पूर्णवेळ सुरू करण्यात यावे यासह अनेक मागण्यासाठी वंचित बहुजन आघाडीचे वतीने तालुका प्रशासनाला वांरवार निवेदने देण्यात आल्यानंतरही समस्या कायम होत्या.त्यामुळे वंचित बहुजन आघाडी तालुका तिवसाचे वतीने आक्रमक पवित्रा घेऊन तिवसा गटविकास अधिकारी यांच्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात आले. त्यानंतर गटविकास अधिकारी,शिक्षण विस्तार अधिकारी,आरोग्य अधिकारी यांच्या सोबत झालेल्या बैठकीत तत्काळ शिक्षक देण्याचे लेखी पत्र देण्यात आले व सोबतच उर्वरित समस्या पाच दिवसात सोडविण्याचे आश्वासन देण्यात आले. यावेळी जिल्हा महासचिव सागर भवते, तालुका अध्यक्ष मनीष खरे, डॉ. धर्मेंद्र दवाळे,निलेश सोनोने, जीवन गवळी,सिद्धार्थ सोनोने,मुस्ताक शहा,प्रमोद मुंद्रे, नितीन थोरात,सागर गोपाळे, विकी तेलमोरे,गजानन आसोडे, उमेश हरणे,मुकेश तंतरपाळे, किशोर तायडे, आकाश वावरे,रोशन ढोणे,जया गवळी सह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

सात लाख हेक्टरला दुष्काळाचा फटका

अमरावतीत चार लाख ९२ हजार शेतकरी बाधित; नुकसानभरपाईची प्रतीक्षा

अमरावती/का.प्र.

जिल्ह्यातील सात लाख नऊ हजार ७७९ हेक्टरवरील खरीप पिकांचे दुष्काळामुळे नुकसान झाले असून, चार लाख ९२ हजार ५२८ शेतकरी बाधित झाले आहेत. संयुक्त पंचनाम्याचा अहवाल शासनाला सादर करण्यात आला असून, शेतकऱ्यांना आता नुकसानभरपाईची प्रतीक्षा आहे.

पावसाचा प्रदीर्घ खंड आणि कमी पर्जन्यमानाचा फटका यंदाच्या खरीप हंगामाला बसला आहे. सोयाबीन, कापूस आणि तूर या प्रमुख पिकांच्या उत्पादकतेवर परिणाम झाला असून, सिंचनासाठी पाण्याची कमतरता आणि जमिनीतील घटलेल्या ओलाव्यामुळे फळबागांचेही नुकसान झाले आहे. सोयाबीनची उत्पादकता पीककापणी प्रयोगांतून हेक्टरी सहा क्विंटलच्या आसपास येत आहे. पाण्याअभावी कापूस पिकाची वाढ खुंटली असून, तूर उत्पादनावरही प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. राज्य सरकारने जिल्ह्यातील चौदाही तालुक्यांना दुष्काळाचा पहिला ट्रिगर लागू केला. त्यानंतर दुसऱ्या व तिसऱ्या ट्रिगरची प्रतीक्षा न करता सरसकट पंचनामे करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार महसूल, कृषी आणि जिल्हा परिषद यंत्रणेमार्फत संयुक्त पंचनामे करण्यात आले. या पंचनाम्यांचा अहवाल आता सादर झाला आहे. संयुक्त पंचनाम्याचा अहवाल सादर झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या आशा शासनाकडून मिळणाऱ्या मदतीवर केंद्रित झाल्या आहेत. मात्र, राज्य सरकारने अद्याप नुकसानभरपाईची घोषणा केलेली नाही.

चार लाख ९२ हजार शेतकरी बाधित

दुष्काळाचा सर्वाधिक फटका जिरायती शेतीला बसला आहे. जिरायती क्षेत्रातील चार लाख १८ हजार ४१७, बागायती क्षेत्रातील चार हजार ३४ आणि फळपिकांचे उत्पादन घेणारे ७६ हजार ५२३ शेतकरी बाधित झाले आहेत. जिल्ह्यातील एकूण चार लाख ९२ हजार ५२८ शेतकऱ्यांना दुष्काळाचा फटका बसला आहे. सोयाबीन, कापूस व तुरीसह संत्रा, मोसंबी आणि केळी या प्रमुख पिकांचे नुकसान झाले आहे.

शेगाव अधिवेशनातील घोषणा हवेतच

रुपलाल महाराज स्मारकासाठी बारी समाजाचा जनआक्रोश

अंजनगाव सुर्जी/वार्ताहर

राष्ट्रसंत रुपलाल महाराज स्मारक व आर्थिक विकास महामंडळाच्या प्रलंबित मागण्यांसाठी अखिल भारतीय बारी महासंघ व समस्त बारी समाजाच्या वतीने येत्या २ नोव्हेंबर २०२६ रोजी अंजनगाव सुर्जी येथे एक दिवसीय जनआक्रोश आंदोलन व सामूहिक उपोषणाचे आयोजन करण्यात आले आहे. विठ्ठल मंदिर संस्थान, खोडगाव रोड येथून सकाळी मोर्चा काढून तहसील कार्यालयावर धडक देण्यात येणार आहे. १ ऑक्टोबर २०२३ रोजी संत नगरी शेगाव येथे अखिल भारतीय बारी महासंघ व समस्त बारी समाजाच्या

वतीने भव्य अधिवेशन पार पडले होते. या अधिवेशनाला लाखो समाज बांधवांसह शासनाचे प्रतिनिधी, आमदार, खासदार, विरोधी पक्षनेते उपस्थित होते.

यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ क्लिपद्वारे समाज बांधवांना संबोधित करत संत शिरोमणी रुपलाल महाराज यांच्या स्मारकाच्या कामासाठी निधीची तरतूद करून काम लवकरच सुरू करण्यात येईल, अशी घोषणा केली होती. तसेच समाजातील दुर्बल घटकांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून देण्यात येईल, असेही आश्वासन देण्यात आले होते.अधिवेशनात स्मारकाच्या जागेचा सविस्तर आराखडा सर्व बाबींसह सर्वांसमोर ठेवण्यात आला होता. सदर आराखडा शासनाकडे सादर करण्यात आला असून तो अद्यापही तसाच पडून आहे. या घटनेला आज तीन वर्षे पूर्ण झाली असून शासनाने अद्यापपर्यंत एकही मागणी पूर्ण केलेली नाही. याबाबत महासंघाच्या वतीने वेळोवेळी शासनाला निवेदने देऊन अवगत करण्यात आले, मात्र शासनाने त्याची कोणतीही दखल घेतली नाही.शासनाच्या या दुर्लक्षाविरोधात आता समाज बांधवांमध्ये तीव्र जनआक्रोश उफाळून आला आहे. त्याचाच भाग म्हणून २ नोव्हेंबर रोजी सकाळी विठ्ठल मंदिर संस्थान, खोडगाव रोड, अंजनगाव सुर्जी येथे सर्व समाज बांधवांनी एकत्र जमून तहसील कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा व सामूहिक उपोषण करण्यात येणार आहे. या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अखिल भारतीय बारी महासंघ व समस्त बारी समाजाच्या वतीने करण्यात आले आहे.

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांनी योजनांच्या शिबिराचा लाभ घ्यावा

तहसीलदार सुदर्शन शहारे यांचे आवाहन

अचलपूर/वार्ताहर

आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी येत्या २९ऑक्टोबर रोजी अचलपूर उपविभाग कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीत विशेष शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिराच्या माध्यमातून पात्र कुटुंबांना शिक्षण, शेती, घरकुल, महिला सक्षमीकरण, कौशल्य विकास आणि रोजगाराशी संबंधित योजनांचा लाभ मिळवून देण्यात येणार आहे. त्यामुळे संबंधित कुटुंबांनी आवश्यक कागदपत्रांसह शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार सुदर्शन शहारे यांनी केले आहे.सकाळी ११ वाजता सुरू होणाऱ्या या शिबिरात विविध शासकीय विभागांच्या समन्वयातून पात्र लाभार्थ्यांना योजनांची माहिती देऊन लाभ मिळवून देण्याची कार्यवाही केली जाणार आहे.कृषी विभागामार्फत शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ पात्र कुटुंबांना मिळवून देण्यात येणार आहे. यामध्ये सिंचन पाइप, ताडपत्री, फवारणी पंप, शेती अवजारे, ट्रॅक्टरचलित उपकरणे, सोलर झटका मशीन, विहिरीतील विद्युत मोटार पंप संच आदी साहित्य व अनुदान योजनांचा समावेश आहे.याशिवाय डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना आणि बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत नवीन विहीर, जुन्या विहिरीची दुरुस्ती, इनवेल बोअरिंग, वीज जोडणी आकार, शेततळे अथवा विहिरींचे प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्मसिंचन पाइप, ठिबक व तुषार सिंचन तसेच विद्युत मोटार पंप आणि पाइप यांसारख्या सुविधांसाठी पात्रतेनुसार लाभ मिळवून देण्याची कार्यवाही केली जाणार आहे.तसेच इतर विभागाच्या विविध योजनेचा लाभ ही दिल्या जाणार आहेत. लाभार्थ्यांनी आधारकार्ड सह आवश्यक कागदपत्र सोबत आणावे असेही कळवण्यात आले आहे.

तिरंग्याच्या माध्यमातून देशप्रेमाची अलख जागवणारे संतोष अरोरा

अमरावतीच्या राष्ट्रप्रेमी व्यक्तिमत्त्वाचा 'हर दिन तिरंगा' उपक्रम प्रेरणादायी

अमरावती/का.प्र

देशप्रेम केवळ शब्दांतून किंवा घोषणांतून व्यक्त होत नाही, तर ते आपल्या कृतीतूनही दिसून येते. अमरावती शहरातील श्री. संतोष अरोरा हे याचे एक प्रेरणादायी उदाहरण आहेत. संत कंवरराम स्कूलमध्ये शारीरिक शिक्षक म्हणून सेवा बजावून सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांच्या मनातील राष्ट्रप्रेमाची ज्योत तितक्याच उत्साहाने प्रज्वलित आहे. तिरंग्याच्या माध्यमातून समाजातील प्रत्येकाच्या मनात देशभक्तीची भावना जागृत करण्याचा त्यांचा सातत्यपूर्ण प्रयत्न कौतुकास्पद आहे.

शाळेत कार्यरत असताना

दरवर्षी २६ जानेवारी आणि १५ ऑगस्ट या राष्ट्रीय सणांच्या निमित्ताने ध्वजारोहण कार्यक्रमात ते विद्यार्थ्यांना छोटे-छोटे तिरंगे वाटत असत. सुरुवातीला काही निवडक वर्गांपासून सुरू झालेला हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे हळूहळू संपूर्ण शाळेत लोकप्रिय झाला. इतर विद्यार्थीही आवर्जून त्यांच्याकडे तिरंग्याची मागणी करू लागले. विद्यार्थ्यांचा वाढता उत्साह पाहून त्यांनी या उपक्रमाचा विस्तार केला. त्यानंतर जिल्हा स्टेडियमसह अमरावती शहरातील विविध राष्ट्रीय कार्यक्रमांमध्येही ते तिरंगे, बॅज आणि कागदी झेंडे वितरित करू लागले.

विशेष म्हणजे, ज्या भारतीय रेस्टॉरंटमध्ये त्यांनी भोजन केले, त्या रेस्टॉरंटचे मालक, व्यवस्थापक आणि कर्मचारी यांनाही त्यांनी तिरंगा प्रदान केला. परदेशात भेटलेल्या भारतीयांच्या छातीवर तिरंगा लावून त्यांनी मातृभूमीविषयीचे प्रेम आणि राष्ट्रध्वजाविषयीचा अभिमान व्यक्त केला. परदेशातही भारतीय संस्कृतीशी आणि देशाशी असलेले नाते जपण्याचा त्यांचा हा प्रयत्न निश्चितच उल्लेखनीय आहे.संतोष अरोरा यांच्या 'हर दिल तिरंगा' या उपक्रमाचे जितके कौतुक करावे, तितके कमीच आहे. शाळेतील विद्यार्थ्यांपासून ते परदेशात भेटणाऱ्या भारतीयांपर्यंत तिरंग्याच्या माध्यमातून देशप्रेमाची भावना पोहोचवण्याचे त्यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे.

युरोपमध्येही तिरंग्याच्या माध्यमातून देशप्रेमाचा जागर!

संतोष अरोरा यांच्या देशप्रेमाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा 'हर दिन तिरंगा' हा उपक्रम केवळ राष्ट्रीय सणांपुरता किंवा भारताच्या सीमांपुरता मर्यादित नाही. मागील महिन्यात ते आपल्या कुटुंबासह युरोप भ्रमंतीसाठी गेले होते. या प्रवासादरम्यान यूके, फ्रान्स, बेल्जियम, हॉलंड, स्पेन, हंगेरी, जर्मनी, इटली आणि लंडन आदी ठिकाणी त्यांनी भेटलेल्या भारतीयांना आपल्या देशाचा तिरंगा भेट दिला.

संक्षिप्त

संजय सरवटकर यांना लेखणी गौरव पुरस्कार

अमरावती- स्वाभिमानी श्रमिक पत्रकार संघ (महाराष्ट्र राज्य) व दैनिक चालू वार्ता ग्रुप, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने मराठा चेम्बर्स ऑफ कॉमर्स, स्वारगेट पुणे येथे राज्यस्तरीय स्वाभिमानी लेखणी गौरव पुरस्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले आहे. हा पुरस्कार, पत्रकार, लेखक, कवी, साहित्यिक, स्तंभलेखक, संपादक याच्यासाठी देण्यात येतो. या पुरस्कारासाठी भातकुली तालुक्यातील पूर्णानगर येथील सामाजिक कार्यकर्ते तसेच पत्रकार संजय सरवटकर यांची निवड करण्यात आली. हा पुरस्कार ओ. बी. सि. नेते प्रा. लक्ष्मण हाके तसेच लेखक, उद्योजक, प्रसिद्ध व्याख्याते माधवजी जाधव व इतर विशिष्ट मान्यवरांच्या हस्ते देण्यात येणार आहे. संजय सरवटकर यांच्या या पुरस्कार निवडीबद्दल त्यांच्या मित्र परिवारात अभिनंदन होत आहे.

राष्ट्रीय जंतनाशक मोहीम उत्साहात

अंजनगाव बारी - प्राथमिक आरोग्य केंद्र अंजनगाव बारी अंतर्गत अंजनगाव बारी व गोविंदपूर येथे दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रीय जंतनाशक मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत १ ते १९ वर्षे वयोगटातील बालकांना व किशोरवयीन मुला-मुलींना जंतनाशक गोळ्यांचे सेवन करविण्यात आले. बालकांच्या आरोग्याचे संरक्षण करणे, आतड्यांतील जंतांचा प्रादुर्भाव कमी करणे तसेच रक्तक्षयासारख्या समस्यांना प्रतिबंध करण्याच्या उद्देशाने ही मोहीम राबविण्यात आली. यावेळी बालकांचे आरोग्य, स्वच्छता आणि जंतसंसर्गापासून बचाव करण्याबाबत जनजागृती करण्यात आली.या मोहिमेला वैद्यकीय अधिकारी डॉ. जितेंद्रसिंह राजकुमार व डॉ. रसिका धर्मे यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी उपकेंद्र अंजनगाव बारी येथील आरोग्य सहाय्यिका ज्योती फुसे, आरोग्य सेविका सुजाता रोडगे व आरोग्य सेवक स्वप्निल राऊत यांनी मोहिमेच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले.

टीमटाला केंद्रात ३० ऑक्टोबरला मोफत तपासणी व उपचार शिबीर

अमरावती - डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या 'संवेदना आरोग्यसेवा प्रसार उपक्रमां'तर्गत टीमटाला केंद्रात मोफत दंतरोग तपासणी व उपचार सुविधांचा शुभारंभ गुरुवार, ३० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. ग्रामीण भागातील नागरिकांना दर्जेदार दंत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. डॉ. हेडगेवार हॉस्पिटलचा संवेदना आरोग्यसेवा प्रसार उपक्रम टीमटाला येथे गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने सुरू आहे.येत्या ५ नोव्हेंबरपासून प्रत्येक महिन्याच्या पहिल्या आणि तिसऱ्या गुरुवारी दुपारी २ ते सायंकाळी ५ या वेळेत ही ओपीडी सुरू राहणार आहे. या काळात डॉ. हेडगेवार हॉस्पिटलचे दंतरोग तज्ज्ञ रुग्णांची तपासणी करून आवश्यक उपचार उपलब्ध करून देतील.ग्रामीण भागातील नागरिकांना दातांच्या आजारांवर वेळेवर निदान व उपचार मिळावेत, तसेच त्यांचे दंत आरोग्य उत्तम राहावे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश आहे. नागरिकांनी या मोफत दंतरोग तपासणी व उपचार सुविधांचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. हेडगेवार हॉस्पिटलच्या संवेदना आरोग्यसेवा प्रसार उपक्रमाच्या वतीने करण्यात आले आहे.

राजकमल उड्डाणपुलाच्या कामाला गती

१२५ कोटींचा निधी मंजूर; तांत्रिक प्रक्रिया सुरु

अमरावती/का.प्र.

शहरातील राजकमल चौक ते रेल्वे स्थानकादरम्यानची वाहतूक सुरळीत करणाऱ्या उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणीच्या कामाला आता गती मिळण्याची चिन्हे दिसत आहेत. या कामासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्यानंतर जुन्या पुलाचा वरचा भाग पाडण्यात आला असून, आता नव्या पुलाच्या बांधकामापूर्वी जमिनीखालील मातीची तपासणी सुरू झाली आहे. नागपूरमधील बुटीबोरी येथील कंपनीचे कर्मचारी ही तपासणी करत आहेत. तपासणीचा अहवाल आल्यानंतर पुढील तांत्रिक प्रक्रिया पूर्ण केली जाणार असून, येत्या वर्षात प्रत्यक्ष बांधकाम सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राजकमल चौकातून रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या या उड्डाणपुलाची अवस्था खराब झाल्याने सुरक्षिततेच्या कारणास्तव २४ ऑगस्ट २०२५ रोजी तो वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. तेव्हापासून नागरिकांना पर्यायी मार्गांचा वापर करावा लागत आहे. त्यामुळे वाहनचालक, व्यापारी आणि प्रवाशांना अतिरिक्त वेळ द्यावा लागत असून, सणासुदीच्या काळात वाहतुकीचा ताण वाढतो. आ. सुलभा खोडके आणि संजय खोडके यांच्या प्रयत्नांनंतर या महत्त्वाच्या कामासाठी १२५ कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला. अमरावती मॉडेल रेल्वे स्थानक परिसरातील जुन्या पुलाचा वरचा भाग पाडण्याचे काम नागपूरमधील मत्ते असोसिएट्स कंपनीला देण्यात आले होते. हे काम पूर्ण झाल्यानंतर आता जमिनीची क्षमता तपासली जात आहे. या तपासणीत जमिनीतील मातीचे नमुने घेऊन त्यांची प्रयोगशाळेत चाचणी केली जाणार आहे. मातीची मजबुती, जमिनीखालील पाण्याची पातळी आणि वजन सहन करण्याची क्षमता यांचा अभ्यास करून नव्या पुलाच्या पायाचे स्वरूप ठरवले जाईल. तपासणीचा अहवाल आणि आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बांधकामाची पुढील दिशा स्पष्ट होईल. त्यामुळे नागरिकांचे लक्ष आता तपासणी अहवाल आणि प्रत्यक्ष काम सुरू होण्याच्या तारखेकडे लागले आहे.

साठ वर्षांपूर्वीची स्त्रियांची अवस्था

आजही माहेरच्या इस्टेटीत बहिणीने हिस्सा मागू नये म्हणून धडपड करणारे कित्येक भाऊ आहेतच. अनेक बहिणी देखील आपले माहेर तुटू नये म्हणून हक्क सोडण्याचे लेख लिहून देत असतात. बायकोच्या माहेरची इस्टेट तिला, म्हणजे आपल्या कुटुंबाला, मिळावी म्हणून धडपडणारे पुरुष स्वतःच्या बहिणींना मात्र वडिलांच्या मालमत्तेत हिस्सा मिळू नये यासाठी खटपटी करतात. आपल्या वागण्यात ही विसंगती आहे याचीही जाण त्यांना नसते.

१९५० ते १९७० पर्यंतच्या काळात मुलींच्या शिक्षणाला फारसं महत्व नव्हतं. साधारणतः १६ वर्षाची मुलगी झाली की आईबाप तिच्यासाठी स्थळ पाहणं सुरु करायचे. १८ वर्षाच्या आसपास मुलीचं लग्न झालं की तिचं माहेर आनंदी व्हायचं. परंतु २३-२४ वर्षांची मुलगी बिनलग्नाची राहिली तर आईबापांना घोर लागायचा. स्वयंपाक, भरतकाम, विणकाम, घराची स्वच्छता हेच तिचे मुख्य शिक्षण असायचे. लग्नासाठी आणखी एक वेगळे क्वालिफिकेशन म्हणून लग्न होईपर्यंत जेमतेम मॅट्रिक (म्हणजे आताची दहावी किंवा अकरावी) अथवा कॉलेजचे एखादे वर्ष ती शिकायची. तिच्या भरतकामाचे नमुने फ्रेम करून समोरच्या खोलीत टांगले जात. लग्नापर्यंत मुलींना माहेरी घरात मात्र लाडात वाढविल्या जायचे. पण घराबाहेरचे जग त्यांच्याकडे चांगल्या नजरेने पाहत नसे. छेडखानी, टोमणे यांचा सामना करावा लागायचा. सासरी खूप शिस्तीत राहावे लागेल, कष्ट करावे लागतील अशी शिकवणाही त्यांना बालपणापासूनच दिली जायची. नवरात्रीनंतर जी भुलाबाईची गाणी मोहोल्ल्यातल्या मुली एकत्र येऊन गात असायच्या, त्या गाण्यांमध्ये सासरी तिचा कसा छळ होऊ शकतो, याचेही वर्णन असायचे.

'असं माहेर सुरेख बाई,
खेळाया मिळतं
असं सासर द्वाड बाई,
कोंडुनी मारितं!'

लग्न झालेल्या मुलींना सुरुवातीची काही वर्षे माहेरची ओढ असायची. श्रावणात मंगळागौरीच्या निमित्ताने माहेरी आल्या की त्या लग्नापूर्वीच्या मैत्रिणी एकमेकींना भेटून खूप आनंदी व्हायच्या.

मुलीचे पहिले बाळंतपण माहेरीच असायचे. त्यानिमित्ताने तिला निदान ३-४ महिने माहेरी राहता यायचे. त्याकाळात पती-पत्नीमध्ये वयाचे अंतर असायचे. घरातसुद्धा चारचौघांमध्ये पती पत्नी एकमेकांशी फारसे बोलत नसत. सगळ्याच सासवा किंवा नणंदा खाष्ट नसायच्या. पण तशी त्यांची इमेज मनात घेऊन मुलगी सासरी जायची. घरातली झाडझूड, स्वयंपाक अथवा धुणी-भांडी ही पुरुषांची कामे नव्हेत अशी पक्की समजूत असल्यामुळे मुलगे या कामांकडे ढुंकूनही पाहत नसत. जवळच असलेल्या माठातलं पाणी दूर काम करत असलेल्या आईला, बहिणीला अथवा वहिनीला मागितलं जायचं आणि त्याही हातातलं काम सोडून पाणी आणून द्यायच्या. मुलगे घरात जास्त रमत नसत. ते शक्यतो घराबाहेरच्या मित्रांसोबत वेळ घालवायचे. मुलींना तशी मुभा नव्हती.

ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुलेंनी मुलींच्या शिक्षणाचे महत्व विषद केल्यानंतरही शे-सव्वाशे वर्षे महाराष्ट्रातल्या गावागावात मुलींची अवस्था अशी होती. परंतु पुढे जेव्हा औद्योगीकरणामुळे घरोघर चूल जाऊन गॅस आला, मातीच्या जमिनीवर फरश्या आणि टाइल्स आल्या, उखळ-मुसळ, पाटा-वरवंटा, खलबत्ता यांच्या जागी मिक्सर-ग्राइंडर आले, फ्रीज आले --- त्यानंतर मात्र घरकामातून स्त्रियांना काही प्रमाणात मोकळीक मिळू लागली. दुचाकी मोपेड बाजारात आल्यानंतर आत्मविश्वासाने मुली बाहेरची कामे देखील करू लागल्या. त्यांचे जग विस्तारले. उच्चशिक्षणामुळे त्यांना नोकऱ्यांची संधी मिळू लागली. घरात जास्तीचा पैसा येऊ लागला. त्यामुळे स्त्रियांच्या नोकरीला आधी घरातून होणारा विरोध आपोआप मावळू लागला. पण हे सगळे बदल सत्तरच्या दशकानंतर होत गेले. शहरीकरणामुळे आपोआप विभक्त कुटुंब वाढत गेले. साठ च्या दशकापर्यंत घरोघरी ५-७ भावंड असणे स्वाभाविक मानले जायचे. हळू हळू कुटुंब नियोजनाच्या मोहिमेमुळे दोन किंवा तीन अपत्य पुरेत, अशी भावना वाढत गेली.

१९५०-६० च्या दशकात अनेक पतीने टाकलेल्या परित्यक्ता किंवा विधवा स्त्रिया सासर सोडून माहेरी आश्रयासाठी कायमच्या राहायला आलेल्या आढळत असत. वास्तविक स्त्रियांना पैतृक संपत्तीत वारसा हक्क मिळावा या हेतूने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हिंदू कोड बिल त्वरित पास व्हावे यासाठी आग्रह धरला होता. १९५६ साली हिंदू वारसा कायदा लागू झाला. पित्याच्या संपत्तीत मुलीला मुलाइतकाच हिस्सा असणे आणि पतीची संपत्ती त्याच्या निधनानंतर पत्नी व मुलामुलींमध्ये समप्रमाणात विभागली जावी, या तरतुदी त्या कायद्याने करण्यात आल्या. त्यापूर्वी पतीच्या संपत्तीत पत्नीला फक्त तिच्या हयातीपर्यंत हक्क राहत असे. परंतु हिंदू जनमानस (पुरुषांचे) या सुधारणांसाठी अनुकूल नव्हते. अनेक परित्यक्ता किंवा विधवा स्त्रिया माहेरी आश्रितासारख्या काबाडकष्ट करून राहायच्या. त्यामुळे आपले कुंकू बळकट राहावे, पतीच्या जिवंतपणीच आपल्याला मृत्यू यावा, असे स्त्रियांचे मानस असल्यास नवल नव्हते. विधवा स्त्रीकडे कोणी आकर्षित होऊ नये म्हणून ब्राम्हण जातीमध्ये तिचे केशवपन करण्याची प्रथा होती. तसेच तिनेही कोणाकडे आकर्षित होऊ नये म्हणून तिने नेसावयाची वस्त्रे, तिचा आहार आणि दिनचर्या याबाबतही बरेच कडक नियम असायचे. तिला कोणताही अलंकार घालण्याची परवानगी नव्हती. आमच्या घरी माझी एक केशवपन केलेली विधवा आत्या माझ्या जन्मापूर्वीपासून राहत असे. तिचे सोवळे आम्हा मुलांना जाचक वाटायचे. तशी ती प्रेमळ होती पण रागीटही होती. एकूण व्यवस्थेवरचा आणि नशिबावरचा तिचा संताप अप्रत्यक्षपणे घरातील कोणत्याही व्यक्तीवर प्रगट होत असे. ती कर्तबगार आणि बुद्धिमान होती. पण तिच्या कर्तृत्वाला आणि बुद्धीला घराबाहेरच्या जगात वाव नव्हता. घरातील सगळे स्त्री-पुरुष तिचा मान राखायचे आणि तिला घाबरूनही असायचे. माझ्या जन्मानंतर मात्र असे केशवपन माझ्या पाहण्यात तरी कोणत्याही विधवा स्त्रीचे झाले नाही. परंतु सायंकाळी विरंगुळा म्हणून गावातल्या सगळ्या केशवपन केलेल्या या किमान ३०-४० स्त्रिया अंबापेठच्या गोपाळकृष्ण मंदीरात एकत्र येत असत. महात्मा फुले यांनी ब्राम्हण स्त्रियांच्या केशवपनाला विरोध म्हणून पुण्यात न्हाव्यांचा संप घडवून आणला होता. पण माझी ही आत्या जिवंत असेपर्यंत दरमहा एक न्हावी येऊन तिचे सर्व केस काढून टाकत असे. सुदैवाने ही दुष्ट प्रथा ब्राम्हण वगळता इतर जातींमध्ये नव्हती.

१९७० च्या दशकात माझ्या एका शेतकरी मित्राकडे त्याच्या गावी राहत असताना असे दिसले की त्याची आई वारली होती, वडिलांनी दुसरे लग्न केले होते पण माझा मित्र आणि त्याचे भावंड आपल्या आजोळी राहत होते. तिथे त्यांचा सांभाळ त्यांची एक विधवा मावशी आणि एक परित्यक्ता मावशी अशा दोघी मिळून करायच्या. आजी-आजोबा नव्हते. पण त्यांची शेतजमीन तीन चार ठिकाणी विखुरलेली होती. विधवा मावशी ला ते लहान आई आणि परित्यक्ता मावशीला मोठी आई म्हणायचे. लहान आई खूप बुद्धिमान आणि कर्तबगार होती. तिचे हे भाचे लहान असताना पासून तिने शेतीचे उत्तम व्यवस्थापन केले होते. तिला प्रत्येक शेताची अचूक माहिती होती. पेरणीचा हंगाम आला की ती शेतावरच्या माणसांना घरी बोलवून घ्यायची. आणि जपून ठेवलेल्या पुरचुंड्या उकलुन त्यातून बियाणे काढायची. कोणत्या शेतात कोणते बियाणे कशा पद्धतीने पेरायचे, याबाबत ती सर्वांना सुस्पष्ट सूचना द्यायची. शेतजमिनीचा पोत आणि चतुःसीमा तिला पाठ असत. घरातल्या कार्यांपासून बाहेरच्या आर्थिक व्यवहारांपर्यंत सर्व काही तिच्या सल्ल्याने होत असे. अशा कर्तबगार स्त्रिया समाजातल्या सर्व स्तरांत निश्चितच असणार. फक्त त्यांच्या कर्तृत्वाचे क्षेत्र घराच्या चार भिंतींपुरते आपल्या पितृसत्ताक समाज व्यवस्थेने सीमित करून ठेवले होते.

१९५६ च्या कायद्याचा प्रत्यक्ष अंमल समाजामध्ये हळू हळू होत गेला. पित्याकडे किवा पतीकडे जी संपत्ती वारसाहक्काने चालत आली असेल त्या पैतृक संपत्तीमध्ये मात्र मुलींना २००५ पर्यंत मुलांप्रमाणे समान हिस्सा कायदाही देत नव्हता. १९५६ सालीच हिंदू दत्तक विधान आणि पोटगीचा कायदा संसदेने पारित केला होता. त्यापूर्वी वारसा हक्क, दत्तकविधान, पोटगी, घटस्फोट यासाठी नेमके कायदे नव्हते. हिंदू धर्माचे शास्त्र, त्यावर विद्वानांनी केलेल्या मीमांसा, रूढी व परंपरा यांच्या आधारे वादांचे निकाल दिले जात. श्रीमंत घरातील असे वाद थेट लंडनच्या प्रीव्ही कौन्सिलपर्यंत लढले जायचे. ही प्रीव्ही कौन्सिल म्हणजे स्वातंत्र्यापूर्वीचे सर्वोच्च न्यायालय. त्यात सगळे इंग्रज उमराव असायचे. त्यांच्यापुढे भारतीय वकील हिंदू धर्मातील वेगवेगळ्या शास्त्रार्थांचा खल करायचे. प्रीव्ही कौन्सिलने दिलेला निकाल हा पुढल्या प्रकरणांमध्ये जणू कायदाच मानला जायचा. ही सर्व परिस्थिती १९५६ नंतर हळूहळू बदलू लागली. आपले न्यायालय वारसा हक्कांचे, पोटगीचे, घटस्फोटाचे, दत्तकाचे वाद आता कायद्यानुसार निकालात काढू लागले. त्यामुळे न्यायालयीन निकालांमध्ये एक प्रकारची सुसूत्रता येऊ लागली. अर्थात आजही माहेरच्या इस्टेटीत बहिणीने हिस्सा मागू नये म्हणून धडपड करणारे कित्येक भाऊ आहेतच. अनेक बहिणी देखील आपले माहेर तुटू नये म्हणून हक्क सोडण्याचे लेख लिहून देत असतात. बायकोच्या माहेरची इस्टेट तिला, म्हणजे आपल्या कुटुंबाला, मिळावी म्हणून धडपडणारे पुरुष स्वतःच्या बहिणींना मात्र वडिलांच्या मालमत्तेत हिस्सा मिळू नये यासाठी खटपटी करतात. आपल्या वागण्यात ही विसंगती आहे याचीही जाण त्यांना नसते.

पूर्वी हुंड्याची प्रथा राजरोस उघडपणे सर्वत्र आढळून यायची. हुंडा विरोधी कायदा आल्यानंतर अप्रत्यक्षपणे हुंडा मागणे सुरूच राहिले. माझ्या एका वकील सहकाऱ्याने त्याला मुलगी झाल्याबरोबर आपली फी वाढवून मुलीच्या लग्नासाठी पैसे जमा करणे सुरु केले. हुंडा देणे व घेणे हा अपराध आहे. तश्या केसेस देखील या वकील मित्राने न्यायालयात चालवल्या होत्याच. परंतु हुंड्यापासून सुटका नाही, हे दाहक सत्य विचारात घेऊनच त्याने मुलगी पाळण्यात असताना पासून तिच्या हुंड्याची बेगमी करून ठेवली.

किशोर देशपांडे

'अल निनो' अधिक बळकट होण्याचे संकेत

'अल निनो' हा स्पॅनिश शब्द असुन त्याचा अर्थ लहान मुलगा किंवा ख्रिस्त मुलगा असा होतो. वैज्ञानिक भाषेत सांगायचे झाल्यास, प्रशांत महासागराच्या मध्य आणि पुर्व भागातील समुद्रपृष्ठाचे तापमान सरासरीपेक्षा जास्त वाढते, तेव्हा एल निनो स्थिती निर्माण होते. पुढील काही महिण्यात हीच स्थिती अत्यंत तिव्र स्वरुप धारण करण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे जगभरातील पर्जन्यमान आणि तापमानाच्या पद्धतीवर मोठा परिणाम होऊ शकतो. त्याचबरोबर पूर, दुष्काळ आणि तीव्र उष्णतेचा धोका वाढण्याची शक्यता असल्याचे जागतिक हवामान संघटनेने (डब्ल्युएमओ) म्हटले आहे. जागतिक हवामान संस्थेच्या हवामान अंदाजानुसार, 'अल निनो' फेब्रुवारी २०२७ पर्यंत कायम राहण्याची शक्यता जवळपास १००% आहे. जगभरातील हवामान संस्थांनी या अंदाजाबाबत एकमत व्यक्त केले आहे. १९७२ पासुन आतापर्यंत ११ वेळा एल निनोचा प्रभाव दिसुन आलेला आहे, यामध्ये नऊ वेळा दुष्काळ पडलेला होता.

'अल निनो' च्या प्रभावामुळे यंदा कमी पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला असून यावर्षी गेल्या ११ वर्षातील सर्वात कमी पाऊस पडण्याची शक्यता आहे. देश आधीच इराण युध्दामुळे निर्माण झालेल्या महागाईशी झुंज देत असतांना, जगातील सहाव्या अर्थव्यवस्थेसाठी ही मोठ्या चिंतेची बाब आहे. कमी मान्सुनमुळे थेट परिणाम पिके, अन्न-धान्याच्या किंमती आणि देशाच्या आर्थिक विकासावर होऊ शकतो. फिलीप कॅपिटल इंडियाच्या कमोडीटी रिसर्च विभागाच्या उपाध्यक्षा आश्विनी बन्सोड म्हणतात की, कडधान्य, कापूस, खाद्य, तेलबिया आणि मका यासारख्या पिकांच्या लवकर पेरणीवर कमी पावसामुळे प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. संयुक्त राष्ट्राचे महासचिव अँटोनिओ गुटरेस म्हणाले की, एल निनो आपल्या डोळ्यासमोर अत्यंत मोठ्या स्वरुपात विकसित होत आहे. विज्ञानाच्या आधारावर याबाबत कोणतीही शंका नाही. पृथ्वी सध्या अशा परिस्थितीत प्रवेश करत आहे, जी यापूर्वी कधी पाहीली गेलेली नाही. समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान वाढत आहे आणि जग अत्यंत तीव्र हवामानाच्या धोक्याच्या क्षेत्रात पोहचले आहे.

प्रशांत महासागरात एल निनो सतत मजबूत होत आहे. तर 'स्कायमेट' ने यावर्षी देशात दुष्काळाची शक्यता ७०% पर्यंत वर्तविली आहे. एप्रिल महिन्यात स्कायमेट ने यावर्षी ९४% पावसाचा अंदाज वर्तवला होता. आता हा अंदाज घटवून ८५% करण्यात आला आहे. अमेरीकन हवामान एजन्सी 'एनओएए' च्या ताज्या अंदाजानुसार २०२६ च्या शरदऋतूमध्ये आणि हिवाळ्यात एल निनो अत्यंत मजबूत होण्याची शक्यता ९० टक्क्याहून अधिक आहे. मात्र सध्याच 'सुपर एल निनो' झाला आहे, असे म्हणणे योग्य ठरणार नाही, एल निनो मजबूत होत आहे आणि भारतात कमी पावसाचा धोका वाढला आहे हे नक्की.

सप्टेंबर ते नोव्हेंबर २०२६ या कालावधीत जगातील जवळपास सर्व भुभागावर सरासरीपेक्षा जास्त तापमान राहण्याची शक्यता बहु-मॉडेल अंदाजात व्यक्त करण्यात आली आहे. त्याचवेळी प्रशांत महासागरातील तीव्र एल निनोमुळे जगभरातील पावसाच्या पध्दतीमध्ये ठराविक बदल होण्याचे संकेत आहे. इडियन ओशन डायपोल (आयओडी) सकारात्मक होण्याची शक्यता आहे. विषववृत्तीय अटलांटिक महासागरातील परिस्थिती ही तुलनेने उष्ण राहण्याची तसेच उत्तर आणि दक्षिण उष्ण कटीबंधीय अटलांटिक मधील समुद्राच्या पृष्ठभागाने तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याचा अंदाज आहे.

रिझर्व बँकेने देखील कमजोर आणि अनियमित मान्सुनला शेती आणि ग्रामीण भागातील मागणीसाठी धोका मानले आहे. आता येणारे काही आठवडे अत्यंत महत्वाचे आहे. नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये पाऊस सामान्याच्या आसपास राहीला तर परिस्थिती बऱ्याचअंशी सावरु शकते. परंतु जर पाऊस कमजोर राहीला तर त्याचा परिणाम शेती, जलाशय, रब्बीची पेरणी आणि अन्नधान्याच्या महागाईपर्यंत पोहोचु शकतो.एल निनो हा नैसर्गिक हवामान घटक असला तरी त्याचा परिणाम किती गंभीर होईल हे मानवी नियोजनावर अवलंबून असते. योग्य माहिती, वेळेवर निर्णय, स्थानिक सहभाग आणि पारदर्शक मदतव्यवस्था यामुळे महाराष्ट्राची शेती या संकटात तग धरुन राहु शकते.

डॉ. विजय बाबर,वर्धा

वेळेवर उपचार हाच एकमेव बचाव!

जागतिक स्ट्रोक दिन

आधुनिक आणि धावपळीच्या जीवनशैलीत मानवाला अनेक आरोग्याच्या समस्यांचा सामना करावा लागत आहे, त्यापैकीच एक वैद्यकीय आणीबाणी, अत्यंत गंभीर आणि जीवघेणा आजार म्हणजे 'स्ट्रोक' (पक्षाघात), ज्याला सामान्य भाषेत पक्षाघात, लकवा किंवा 'ब्रेन अटॅक' असेही म्हटले जाते, मेंदूच्या एखाद्या भागाला होणारा रक्तपुरवठा अचानक खंडित झाल्यामुळे / मेंदूतील रक्तवाहिनी फुटल्यामुळे जेव्हा मेंदूच्या पेशींना ऑक्सिजन आणि पोषक घटक मिळणे बंद होते, तेव्हा ही स्थिती निर्माण होते. रक्त आणि ऑक्सिजन न मिळाल्यामुळे मेंदूच्या त्या भागातील पेशी काही मिनिटांतच नष्ट (मृत) होऊ लागतात आणि मेंदूचे कार्य विस्कळीत होते हा आजार कोणत्याही व्यक्तीला, कधीही होऊ शकतो. या गंभीर आजाराविषयी जागतिक स्तरावर जनजागृती करण्यासाठी दरवर्षी २९ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक स्ट्रोक (पक्षाघात) दिन' म्हणून साजरा केला जातो. यावर्षी

'प्रत्येक मिनिट मोलाचा आहे' या संकल्पनेखाली साजरा होत असून, हा संदेश रुग्णाचे प्राण वाचवण्यासाठी काळाची गरज बनला आहे.

सूत्र पक्षाघाताची लक्षणे ओळखण्याची गुरुकिल्ली.

-हसताना चेहरा एका बाजूला झुकतो किंवा बधिर होतो.

-दोन्ही हात वर करताना एक हात अशक्तपणामुळे खाली येतो किंवा वर उचलण्यास त्रास होतो.

- बोलताना शब्द स्पष्ट न येणे किंवा समोरच्याचे बोलणे न समजणे.

- वरीलपैकी कोणतीही लक्षणे दिसल्यास एकही मिनिट वाया न घालवता त्वरित आपत्कालीन रुग्णवाहिका किंवा डॉक्टरांशी संपर्क साधणे.

प्रतिबंध आणि काळजी

स्ट्रोकचा धोका टाळण्यासाठी उच्च रक्तदाब, मधुमेह आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवणे आवश्यक आहे. नियमित व्यायाम, संतुलित आहार, मानसिक ताणतणावाचे व्यवस्थापन आणि धूम्रपान किंवा मद्यपानापासून दूर राहून स्ट्रोकचा धोका ८० ते ९० टक्क्यांपर्यंत कमी करता येतो. स्ट्रोक आल्याचे संशय / लक्षणे दिसल्यास रुग्णवाहिका किंवा डॉक्टरांना त्वरित फोन करा: सर्वात आधी स्थानिक आपत्कालीन क्रमांक (उदा. १०८) किंवा सीटी स्कॅन आणि न्यूरोलॉजिस्ट उपलब्ध असलेल्या मोठ्या रुग्णालयाशी संपर्क साधा.

लक्षणे तपासा आणि नोंदवा: लक्षणे कधी सुरू झाली, ती ऊग्स (वेळ) अचूक नोंदवून ठेवा. डॉक्टरांना उपचारादरम्यान या वेळेचा मोठा फायदा होतो.

रुग्णाला सुरक्षित स्थितीत झोपवा: रुग्णाला एका कुशीवर (शक्यतो डाव्या किंवा उजव्या कुशीवर) झोपवा, ज्याला 'रिकव्हरी पोझिशन' म्हणतात. यामुळे जर रुग्णाला उलट्या आल्या, तर त्या श्वासनलिकेत न जाता बाहेर पडतील.

रुग्णाचे डोके थोडे वर ठेवा: रुग्णाचे डोके आणि खांदे थोडे उंच (उशीच्या साहाय्याने) ठेवा, ज्यामुळे मेंदूतील रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते.

कपडे सैल करा: रुग्णाच्या गळ्याभोवतीचे, छातीवरील किंवा कमरेचे कपडे सैल करा, जेणेकरून त्यांना श्वास घेण्यास त्रास होणार नाही.

रुग्णाला शांत ठेवा: स्वतः शांत राहा आणि रुग्णाला धीर द्या. त्यांना हालचाल न करू देण्याचा सल्ला द्या.

काय टाळावे?- खाण्या-पिण्यासाठी काहीही देऊ नका: रुग्णाला पाणी, चहा, औषध किंवा अन्न काहीही भरवू नका. स्ट्रोक रक्तवाहिनी फुटल्यामुळे आला आहे की गुठळीमुळे , हे सीटी स्कॅनशिवाय समजत नाही. अशा वेळी रक्त पातळ करण्याचे औषध दिल्यास मेंदूत अतिरक्तस्त्राव होऊन रुग्ण दगावू शकतो.

लक्षणे कमी होण्याची वाट पाहू नका: काहीवेळा लक्षणे थोड्या वेळाने कमी होतात (ज्याला मिनी-स्ट्रोक किंवा ऊर्ढे म्हणतात), तरीही निष्काळजीपणा न करता रुग्णाला त्वरित रुग्णालयात घेऊन जा.

निरोगी जीवनशैली, आणि कुटुंबाची प्रीती, स्ट्रोकवर मात करण्याची हीच खरी रिती!

डॉ विनोद पवार
मो.९४२३४ ३३४५३

'मी'च्या कैदेतून मुक्तीकडे...

जोपर्यंत आपण स्वतःमध्ये 'मी' ला धरून ठेवले आहे, तोपर्यंत खरी शांती मिळू शकत नाही. नम्रतेतून मनाला उभारी येते तेच मन व्यापक बनते तेव्हाच शांती मिळते.

आपण आपल्याभोवती वेगवेगळे शब्द आ जोडून, विचारांना, गृहीतकांना ओढून अहंकाराची एक भिंत बनवली आहे. त्यामध्ये आपण बंदीस्त झालो आहे. स्वतःलाच अहं च्या कैदेत ठेवले आहे. आपल्याला असे वाटते की, अहंकार इतरांच्याविषयी असतो परंतु सत्य हे आहे की, तो स्वतःच्या अस्तित्वाविरोधी काम करत असतो.

दूसरे कोणी चांगले म्हणले की आपण आनंदी होतो, दुसरे कोणी वाईट म्हटले की, आपण दुःखी होतो. आपले सुख दुःख दुसऱ्यावर अवलंबून आहे काय? हे कोण ठरवते आपल्या आत असणारा अहंकार, कधी आपण राग करतो, कधी प्रेम करतो, कधी घाबरतो या प्रत्येक गोष्टीत अहंकार स्वतःला मी म्हणून प्रस्तुत करतो. यातले काहीच स्थिर नसते, सतत बदलत असते.

मी चांगला आहे, मी हुशार आहे. मी यशस्वी आहे, मी डॉक्टर आहे, मी लेखक आहे, या सगळ्या माझ्या ओळखी मीच निर्माण केल्या आहेत, त्याच ओळखी जपण्यासाठी मी सतत प्रयत्न करीत आहे. स्वतःला कोणत्याही लेबलशिवाय पाहता येणं जमायला हवे. अहंकार नवनवीन लेबल घेऊन मनात तयार होतच राहतो.

साक्षीदार वृत्ती

अहंकार सोडण्याची कितीही भाषा केली तरीही तो सुटत नाही याच कारणामुळे, म्हणून तो पूर्ण सोडवण्याचा प्रयत्न केला तर कठीण आहे. म्हणून आपल्यात असणाऱ्या या अहंकाराला आधी तपासायला सुरुवात करूया. त्याचे लांबून निरीक्षण करुया. दिवसभरात किती वेळा 'मी'ची भाषा बोलली जाते, किती वेळा 'माझंच खरे' असे म्हटले जाते. किती वेळा 'मी'चा हट्ट पुरवला जातो. हे निरीक्षणाने पाहायला हवे आणि त्याची नोंद करायला हवी. दर दिवशी हे करता करता, दर क्षणी हे करायला जमवावं लागेल. म्हणजे प्रत्येक वेळी आपण वागताना, बोलताना सावधपणे त्याकडे पाहायचे, तिऱ्हाईत माणसासारखे बघायचे म्हणजे ते त्याची क्षणी थांबू शकते. म्हणजे अशा विचारांची, वागण्याची संख्या किंवा वारंवारता कमी व्हायला लागेल. जाणीवपूर्वक अशा थांबवण्यातून हा अहंकाराचा पगडा कमी कमी व्हायला मदत होईल. यालाच अध्यात्मात साक्षीभाव म्हणले आहे. स्वतःच साक्षी होऊन मनाकडे, त्याच्यातील अहंकाराकडे लक्ष ठेवायचे म्हणजे स्वतःला अलग करायचे.

साक्षीभाव म्हणजे जीवनापासून दूर जाणे नव्हे, तर जीवनाला अधिक सजगतेने सहभागी पाहणे. राग आला तर 'मला राग आला आहे', हे जाणणे आणि 'मीच राग आहे' असे न समजणे, यात मोठा फरक आहे. विचार येणे आपल्या हातात नेहमीच नसते; परंतु त्या विचाराला किती महत्त्व द्यायचे आणि त्यानुसार कसे वागायचे, याबाबत सजगता विकसित करता येते. साक्षीभाव आपल्याला भावनांपासून पळायला शिकवत नाही; तर भावनांच्या प्रभावाखाली वाहून न जाता योग्य कृती निवडायला मदत करतो.

आपल्याच अहंकाराकडे आपण पाहतो तेव्हा, तो आपल्यात आहे हे आधी स्वीकारायची हिम्मत दाखवली पाहिजे, हे सत्य समजून मान्य करायला पाहिजे. ते तसे कठीण, कारण अहंकार सत्य ऐकण्याची क्षमता संपवतो. कोणताच अहंकारी माणूस जगातील कितीही मोठे सत्य स्वीकारू शकत नसतो. कारण त्याचा अहं च त्याला सत्य वाटतो बाकी सर्व असत्य. त्यामुळे स्वतःमधील अहंकार शोधणे व ते सत्य मान्य करून त्याकडे पाहणं याची सुरुवात धाडसाने करावी लागेल. साक्षीभाव दिव्यासारखा असतो, तो जागृत केला की अहंकाराचा अंधकार दूर व्हायला सुरुवात होते.

सत्य ते आवडे। विकल्पाने भाव उडे। जे सत्यस्वरूप आहे तेच ईश्वरास आवडणारे असते, संशयाने भाव उडून जातो, संत तुकाराम महाराज म्हणतात. अहंकाराला दाबायला बघितले तर तो अधिक उसळतो, त्याच्यावर विजय मिळवणे म्हणजे अधिक अहंकारात डुबणे आहे. म्हणून त्याला केवळ पहा व स्वीकार करा. हळूहळू तो विरघळायला लागेल, शांत राहून आत अंतर्मनात पाहायला लागेल. कोणी कौतुक करेल तेव्हा स्वतःमध्ये पहा, कोणी निंदा करेल तेव्हा स्वतःमध्ये पहा, काय घडते. असे पाहणे अहंकाराला संपवायला सुरुवात आहे.

स्वामी विवेकानंद यांनी राजयोगावरील त्यांच्या शिकवणीत मनाला काही काळ मुक्तपणे चालू देऊन त्याच्या हालचालींचे निरीक्षण करण्यावर भर दिला आहे. मनातील विचार पाहणारा साक्षी होण्याचा हा सराव आहे. 'मनात काय चालले आहे, हे जाणून घेण्याची क्षमता विकसित झाली की मनाच्या प्रत्येक विचारानुसार वागण्याची सक्ती कमी होते.' या साक्षीभावातून मौन यायला लागते. त्यातून नम्रतेचा जन्म व्हायला लागतो. या मौनातून 'मी कोण आहे' याचा शोध सुरु होतो. विचारांच्या श्रृंखला, स्मृतींचा गोंधळ संपायला लागतात. मी ची खरी ओळख व्हायला लागते. तेव्हाच 'मी'कडून शून्याकडे प्रवास सुरू होतो.

डॉ. वर्षा खोत
९४२३५६५८८६

■ गुरुवार, २९ ऑक्टोबर २०२६
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

अकोला जिल्हा विशेष

पाणीटंचाईचे संकट ओळखून प्रशासन अलर्ट!

नादुरुस्त संतुलन टाक्यांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने द्या ; सीईओ अनय नावंदर यांचे निर्देश

६४ व ८४ खेडी पाणीपुरवठा योजनांची पाहणी ; पाणीपट्टी वसुलीला प्राधान्य देण्याच्या सूचना

■ प्रतिनिधी | अकोला ■

ग्रामीण भागात संभाव्य पाणीटंचाईचे संकट गडद होण्यापूर्वीच उपाययोजनांना गती देण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद प्रशासन सक्रिय झाले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी बुधवारी अकोला, अकोट व तेल्हारा तालुक्यांना पाणीपुरवठा करणाऱ्या ६४ व ८४ खेडी प्रादेशिक पाणीपुरवठा योजनांची पाहणी केली. या वेळी नादुरुस्त आढळलेल्या गट व मुख्य संतुलन टाक्यांच्या (झेडबीआर व एमबीआर) दुरुस्तीचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याचे निर्देश त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

पाणीपुरवठा योजनांमधील त्रुटी वेळीच दूर करून संभाव्य टंचाईच्या काळात नागरिकांना पाण्यासाठी वणवण करावी लागू नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यावर नावंदर यांनी भर दिला. तसेच नवीन शासन निर्णयानुसार पाणीपट्टीची देयके सुधारित करून वसुलीला प्राधान्य देण्याच्या सूचनाही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना केल्या. पाहणीदरम्यान अकोला तालुक्यातील घुसर येथील साठवण टाकीसह दहीहांडा व गोपाळखेड, तसेच अकोट तालुक्यातील चोहोट्टाबाजार, टाकळी खुर्द आणि कुटासा येथील पाणीपुरवठा व्यवस्थेची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधून पाणीपुरवठ्याच्या अडचणी जाणून घेतल्या. गावातील वितरण व्यवस्थेद्वारेच पाणीपुरवठा करावा, त्यासाठी योग्य नियोजन करावे आणि पाणीपुरवठ्याच्या वेळी ग्रामपंचायत अधिकारी व संबंधित कर्मचाऱ्यांनी गावात उपस्थित राहून व्यवस्थेवर लक्ष ठेवावे, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. पाण्याचा अपव्यय रोखण्यासह उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर होईल, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी बजावले. पाणीटंचाईचा संभाव्य धोका लक्षात घेता नादुरुस्त टाक्यांची दुरुस्ती, पाणी वितरणाचे नियोजन आणि पाणीपट्टी वसुली या तिन्ही बाबींवर प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. या पाहणीमुळे संबंधित यंत्रणांच्या कामकाजाला गती मिळणार का, तसेच नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुनिश्चित होणार का, याकडे आता लक्ष लागले आहे. या वेळी जिल्हा परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अतुल साळुंके, शाखा अभियंता नवलकार, विस्तार अधिकारी (आरोग्य) डाबेराव, ग्रामपंचायत अधिकारी व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

खडकीत चाकू घेऊन दहशत माजविणारा युवक जेरबंद!

■ प्रतिनिधी | अकोला ■

हातात धारदार चाकू घेऊन खडकी परिसरात फिरायचे आणि नागरिकांमध्ये दहशत निर्माण करायची, असा प्रकार समोर आल्यानंतर खदान पोलिसांनी 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत कारवाई केली. वृषभ अशोक काळे (वय २९, रा. न्यू खेतान नगर, कौलखेड, अकोला) याला ताब्यात घेत त्याच्याकडून धारदार लोखंडी चाकू जप्त करण्यात आला. त्याच्याविरुद्ध शस्त्र कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

२६ ऑक्टोबर रोजी खडकी-मलकापूर महामार्ग परिसरात पोलिसांचे पथक गस्तीवर असताना गोपनीय बातमीदाराकडून महत्त्वाची माहिती मिळाली. ओंकार अपार्टमेंटमधील एका फ्लॅटमध्ये वृषभ काळे राहत असून, तो धारदार चाकू घेऊन परिसरात फिरत असल्याचे पोलिसांना सांगण्यात आले. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने अपार्टमेंटमध्ये धाव घेतली.

पंचांसमक्ष घेतलेल्या

खदान पोलिसांची कारवाई

अंगझडतीत वृषभच्या पॅन्टच्या मागील बाजूस कमरेच्या पट्ट्यात लपविलेला चायनीज बनावटीचा धारदार व टोकदार लोखंडी चाकू आढळला. चाकू बाळगण्याबाबत विचारणा केली असता तो समाधानकारक उत्तर देऊ शकला नाही. पोलिसांनी चाकू जप्त करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध भारतीय शस्त्र कायद्याच्या कलम ४ व २५ अन्वये कारवाई करण्यात आली. वृषभ काळे याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. शहरात गुन्हेगारी प्रवृत्तींवर नियंत्रण मिळविण्यासाठी सुरू असलेल्या 'ऑपरेशन प्रहार'अंतर्गत ही कारवाई करण्यात आली.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. रेड्डी आणि शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली खदान पोलीस ठाण्याचे निरीक्षक भाऊराव घुगे, सहायक पोलीस निरीक्षक राहुल जंजाळ, पोलीस हेडकॉन्स्टेबल निलेश खंडारे, अभिमन्यू सदांशिव, पोलीस कॉन्स्टेबल मंगेश खेडकर, शिवम दुबे आणि वैभव कस्तुरे यांनी ही कारवाई केली.

तेल्हारा–पुणे थेट एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी

दिवाळीपूर्वी विशेष बसफेऱ्यांचे नियोजन करा; विशाल नांदोकार यांचे आगार व्यवस्थापकांना निवेदन

■ प्रतिनिधी | तेल्हारा ■

तेल्हारा ते पुणे थेट एसटी बससेवा नियमित सुरू करावी, तसेच दिवाळीच्या काळात प्रवाशांच्या गर्दीनुसार विशेष बसफेऱ्यांचे नियोजन करावे, अशी मागणी विशाल महादेव नांदोकार यांनी तेल्हारा आगार व्यवस्थापकांकडे निवेदनाद्वारे केली आहे. बस बदलण्याच्या त्रासामुळे विद्यार्थी, नोकरदार, व्यावसायिक, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत असून, त्यांचा वेळ आणि पैसा वाचविण्यासाठी थेट बससेवा सुरू करणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

पुण्याला जाणाऱ्या तसेच पुण्याहून तेल्हाऱ्यात परतणाऱ्या प्रवाशांची सणासुदीच्या काळात संख्या वाढते. त्यामुळे नियमित बससेवेसोबतच विशेष फेऱ्या सुरू कराव्यात, बसचे अधिकृत वेळापत्रक व तिकीटदर जाहीर करावेत आणि प्रवाशांची मागणी लक्षात घेऊन दीर्घकालीन सेवा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. या निवेदनावर गौरव धुळे, सचिन थाटे, विशाल जवंजाळ, प्रभाकर ठोंबरे, कृष्णा साटोटे, शुभम साटोटे आणि नंदकिशोर नासने यांच्यासह अनेक नागरिक व पालकांच्या सह्या आहेत. प्रवाशांची गैरसोय दूर करण्यासाठी एसटी प्रशासनाने मागणीची गांभीर्याने दखल घेऊन प्रत्यक्ष बससेवा सुरू करण्याबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा विशाल नांदोकार यांनी व्यक्त केली आहे.

राष्ट्रीय एकात्मतेसाठी अकोल्यात ३१ ऑक्टोबरला 'रन फॉर युनिटी'

पोलीस मुख्यालयातून सकाळी ६ वाजता एकता दौडीला प्रारंभ; पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांचे नागरिकांना आवाहन

■ प्रतिनिधी | अकोला ■

भारताचे लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त आणि राष्ट्रीय एकता दिनाचे औचित्य साधून अकोला जिल्हा पोलीस दलाच्या वतीने शनिवारी, ३१ ऑक्टोबर रोजी 'रन फॉर युनिटी' या एकता दौडीचे आयोजन करण्यात आले आहे. 'मिशन उडान' उपक्रमांतर्गत आयोजित ही दौड सकाळी ६ वाजता पोलीस मुख्यालयातून सुरू होणार आहे. या उपक्रमात जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले आहे.

सरदार वल्लभभाई पटेल यांनी स्वातंत्र्यानंतर देशातील विविध संस्थानांचे विलीनीकरण करून राष्ट्रीय एकात्मतेचा भक्कम पाया घातला. त्यांच्या कार्याची आठवण आणि राष्ट्रीय एकतेचा संदेश जनमानसात रुजविण्याच्या उद्देशाने या दौडीचे आयोजन करण्यात आले आहे. देशाची एकता, अखंडता, बंधुभाव आणि सामाजिक सलोखा जपण्यासोबतच नागरिकांमध्ये आरोग्य, शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करण्यावरही या उपक्रमातून भर दिला जाणार आहे.

पोलीस मुख्यालयातून दौडीला प्रारंभ

ही दौड पोलीस मुख्यालयातून सुरू होऊन सरकारी बगीचा, जिल्हाधिकारी कार्यालय, अशोक वाटिका, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि निमवाडी पोलीस वसाहत या मार्गाने पुन्हा पोलीस मुख्यालयात पोहोचणार आहे. येथे दौडीचा समारोप होईल. पोलीस दल आणि नागरिकांमधील समन्वय व विश्वास अधिक दृढ करण्याच्या दृष्टीनेही या उपक्रमाला महत्त्व आहे.

ऑनलाइन नोंदणीचे आवाहन

या एकता दौडमध्ये युवक-युवती, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, सामाजिक संस्था आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी केले आहे. सहभागी होण्यासाठी उपलब्ध करून दिलेला क्यूआर कोड स्कॅन करून नावनोंदणी करता येणार आहे. जात, धर्म, भाषा आणि प्रांत यांपलीकडे जाऊन 'आपण सर्व भारतीय आहोत' ही भावना अधिक दृढ करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी नागरिकांनी या दौडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा पोलीस दलाने केले आहे.

राष्ट्राच्या विकासात पंडित नेहरूंचे सर्वोच्च योगदान- सुरेश भटेवरा

अकोला : आज देश एक विचित्र संक्रमण अवस्थेतून जात आहे.एक राजकीय संकट देशात निर्माण झाले आहे. भारतीय लोकशाही ही आबाधित राहील काय याची चिंता आज भेडसावीत आहे. अशा संकटाच्या संदर्भात आपणास भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची आठवण येते. भारतीय इतिहास समजून घेताना पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवन कार्याचा उल्लेख प्रथम करावा लागेल. कारण भारताच्या स्वातंत्र्योत्तर राष्ट्रीय विकासात पंडित नेहरू यांचे योगदान हे सर्वोच्च असून ते कुणीही नाकारू शकत नसल्याचे प्रतिपादन जेंष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांनी केले.बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या नवरात्र व्याख्यानमालेत बुधवारी नासिक येथील जेष्ठ पत्रकार सुरेश भटेवरा यांनी 'आधुनिक भारताचे शिल्पकार, पंडित नेहरू'या विषयावर सातवे पुष्प गुंफले.

अ. भा. मारवाडी महिला मंडळाचा कोजागिरी उत्सव संपन्न

अकोला : सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात सेवारत महिलांसाठी अ. भा. मारवाडी महिला मंडळाच्या वतीने आणि संस्कार समितीच्या अंतर्गत मंडळाच्या अध्यक्ष संध्या अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच सचिव संगीता केला, कोषाध्यक्ष हेमा खटोड, प्रकल्प प्रमुख कीर्ती काबरा आणि रेखा अग्रवाल यांच्या उपस्थितीत कोजागिरी पौर्णिमा उत्सव संपन्न झाला.

गीता नगर येथील मंडळाच्या मंजू तुलशान यांच्या परिसरात हा उत्सव आयोजित करण्यात आला होता. या उत्सवात ७० महिलांनी सहभाग घेतला. हा उत्सव अतिशय धामधूम आणि हर्षोल्लासात संपन्न झाला.या प्रसंगी भुलाबाईची पारंपरिक गाणी गायली गेली, होळी खेळली गेली आणि हौजीच्या मजेदार खेळांसह सर्व सखींनी भरपूर मस्ती आणि आनंद लुटला. विनोद, गाणी-संगीत आणि परस्परांवरील प्रेमामुळे संपूर्ण वातावरण आनंदमय झाले.कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी स्वादिष्ट नाश्त्याचा आस्वाद घेतला.

जाहीर नोटीस

वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १६१२/२०२६ प्रोसेस नं.१२२४४/२०२६
चौ.ता. ०७/११/२०२६ दिनांक : १४/०९/२०२६

अर्जदार : १. रूतिक शंकर सुर्यवंशी २. गौरव शंकर सुर्यवंशी ३. दीक्षा शंकर सुर्यवंशी अर्जदार क. १ ते ३ रा. पंचशिल चौक, निळा झेंडा जवळ, इंदिरा नगर, अकोट फैल, शिवाजी पार्क, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. शंकर उर्फ गंगाराम राजाराम सुर्यवंशी २. उमिता शंकर सुर्यवंशी
पत्ता :- रा. अशोक नगर, इंदिरा नगर, अकोट फैल, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शंकर उर्फ गंगाराम राजाराम सुर्यवंशी यांचे दि. ०३/१०/२०१० रोजी राहत्या घरी अशोक नगर, इंदिरा नगर, अकोट फैल, अकोला, ता. जि. अकोला येथे व मयत निधन उमिता शंकर सुर्यवंशी यांचे दि. १३/०७/२०२६ रोजी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

Change In Name
I Have Changed My Name From
SHASHANK ANUP JETWANI -TO-
SHASHANK ANUPKUMAR JETWANI
My Residential Address in:- Near gayatri bhavan adarsh colony akola-444004

Change In Name
I Have Changed My Name From
GAZAL RATAN BHAMBHANI -TO-
REET SHASHANK JETWANI
My Residential Address in :- Near gayatri bhavan adarsh colony akola-444004

Change In Name
I Have Changed My Name From
DEEPAK PURUSHOTAMDAS JADHWANI -TO-
DEEPAK PURUSHOTTAMDAS JADHWANI
My Residential Address in:- Baba Haradasram gallit sindhi camp pakki kholi akola-444001

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३१५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोला यांचे कार्यालय, अकोला

क्र. प्रस्तु.-२/कावि/१९१८/२०२६ दिनांक १५.०९.२०२६

जाहीरनामा

याव्दारे सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय दिनांक १२ मार्च, २०२५ नुसार जन्म-मृत्यु नोंदणी करीता अर्जदार संतोष रामेश्वर सुलताने यांचे वडील नामे रामेश्वर यशवंत सुलताने यांचा मृत्यु निंभोरा येथे दिनांक २८.०६.२०२५ रोजी झाला असून यांच्या मृत्युची नोंद निबंधक ग्रामपंचायत निंभोरा, ता. जि. अकोला येथे नजर चुकीने करण्यात आली नाही. करिता अर्जदार यांनी मृत्युची नोंद घेण्याकरीता आदेश होणेबाबत निबंधक ग्रामपंचायत निंभोरा, ता.जि. अकोला येथे विनंती अर्ज सादर केला आहे.

त्यानुसार, संतोष रामेश्वर सुलताने यांचे वडील नामे रामेश्वर यशवंत सुलताने यांच्या मृत्युची नोंद घेण्याकरिता कोणाला काही आक्षेप / हितसंबंध असतील त्यांनी आपले आक्षेप हरकत अर्ज हया कार्यालयात जाहिरनामा प्रसिध्दी पासून सुट्टीचे दिवस वगळून पंधरा दिवसांचे आत कार्यालयीन वेळेत या कार्यालयात लेखी स्वरुपात दाखल करावे, विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आक्षेप हरकती विचारात घेतल्या जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

स्थळ :- अकोला
दिनांक :-

कुणाल झाल्टे
तहसिलदार अकोला

जाहीर नोटीस

वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७७८/२०२६ प्रोसेस नं.१३३२७/२०२६
चौ.ता. ३०/११/२०२६ दिनांक : १९/१०/२०२६

अर्जदार : १. अरूणा भाऊराव तायडे २. आशिष भाऊराव तायडे ३. शुभम भाऊराव तायडे सर्व रा. वाशिंबा, पो. डोंगरगाव, ता. जि. अकोला. ४. ज्योती गजानन भड रा. जामठी बु, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला. ५. अर्चना नितीन जवके रा. पोही लंगापूर, ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : भाऊराव काशीराम तायडे
पत्ता :- रा. वाशिंबा, ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत भाऊराव काशीराम तायडे यांचे दि. २३/०६/२०२६ रोजी वाशिंबा, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १७९९/२०२६ प्रोसेस नं.१३५२३/२०२६
चौ.ता. ३०/११/२०२६ दिनांक : २२/१०/२०२६

अर्जदार : दिपक श्रीराम चिंचोलकर रा. रामरक्षा, केडिया प्लॉट, फ्रेंड्स कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : प्रभा उर्फ प्रभावती श्रीराम चिंचोलकर
पत्ता :- रा. रामरक्षा, केडिया प्लॉट, फ्रेंड्स कॉलनी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत प्रभा उर्फ प्रभावती श्रीराम चिंचोलकर यांचे दि. २३/०५/२०२६ रोजी अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/११/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २२/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १८०८/२०२६ प्रोसेस नं.१३६२३/२०२६
चौ.ता. ०७/१२/२०२६ दिनांक : २३/१०/२०२६

अर्जदार : १. अशोक मधुकर तऱ्हाळकर रा. विठ्ठल नगर, नवनाथ मंदिर जवळ, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. शिवकन्या किशोर खराटे रा. दत्तनगर, बुलढाणा रोड, मलकापूर, जि. बुलढाणा. ३ शिवराज मधुकर तऱ्हाळकर रा. विठ्ठल, मोठी उमरी, गजानन महाराज मंदिर जवळ, अकोला. जि. अकोला. ४. दिनेश मधुकर तऱ्हाळकर रा. मते पाटील चाळ, विठ्ठल, मोठी उमरी, गजानन महाराज मंदिर जवळ, अकोला. जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. मधुकरराव नामदेवराव तऱ्हाळकर २. लिलाबाई मधुकर तऱ्हाळकर
पत्ता :- रा. विठ्ठल, मोठी उमरी, गजानन महाराज मंदिर जवळ, अकोला.ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मधुकरराव नामदेवराव तऱ्हाळकर यांचे दि. २४/०८/२००९ रोजी व मयत लिलाबाई मधुकर तन्हाळकर यांचे दि. ३०/०९/२०१९ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०७/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जाहीर नोटीस

याद्वारे सर्व संबंधित व्यक्ती, संस्था तसेच सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री. आशिष गजानन मालठाणे, वय ३५ वर्षे, रा. कानशिवनी, तालुका अकोला, जिल्हा अकोला यांनी त्यांचे वडील श्री. गजानन पुंजाजी मालठाणे यांच्या दिनांक २६/०८/२०२५ रोजी झालेल्या निधनाची नोंद करून, त्यांच्या वडिलांच्या नावावर असलेल्या तसेच त्यांच्या मालकीच्या व ताब्यातील मालमत्तेबाबत दिनांक २८/०८/२०२५ रोजी मृत्युपत्र (वसीयतपत्र) निष्पादित केले आहे. सदर मृत्युपत्राची नोंदणी अद्याप नोटरी द्वारे झालेली आहे.सदर मृत्युपत्राची रजिस्टर नोंदणी कायद्यांनुसार संबंधित उपनिबंधक कार्यालयात करण्यात येईल

सदर मृत्युपत्रास किंवा त्यामध्ये नमूद केलेल्या मालमत्तेसंदर्भात कोणत्याही व्यक्तीचा कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा, आक्षेप किंवा हरकत असल्यास, त्या व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ४ दिवसांच्या आत, आपल्या दाव्याच्या, आक्षेपाच्या किंवा हरकतीच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रांसह, खाली नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे.निर्धारित मुदतीत कोणताही दावा, आक्षेप किंवा हरकत प्राप्त न झाल्यास, संबंधित मालमत्तेबाबत कोणत्याही व्यक्तीस कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, दावा किंवा हरकत नाही, असे गृहीत धरले जाईल. त्यानंतर माझे अशील लागू कायद्यानुसार पुढील आवश्यक कायदेशीर कार्यवाही करतील. निर्धारित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्याचा, आक्षेपाचा किंवा हरकतीचा विचार करणे माझ्या अशीलांवर बंधनकारक राहणार नाही; तथापि, अशा दाव्यांबाबत किंवा हरकतींबाबतचा अंतिम निर्णय लागू कायद्यांनुसार घेतला जाईल.

अकोला
दिनांक : २६/१०/२०१६.
पक्षकाराची सही
पक्षकाराचे नाव - आशिष गजानन मालठाणे

नोटीस देणारे वकील :
ॲड. ओम गजानन मते
न्यू खेतान नगर कौलखेड, अकोला
मो. ७४९९५५०६१९

तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांचे कार्यालय, पातूर ता. पातूर जि. अकोला

ईमेल:- tah.patur@rediffmail.com < दुरध्वनी क्र.: ०७२५४ २९९४९९
क्र./अ.का/प्रस्तु-३/कावि-१४४८/२०२६ दिनांक १९/१०/२०२६

जाहीर प्रसिध्दी

ज्याअर्थी, अर्जदार रामकृष्ण संपत खंडारे, रा.शिर्ला ता. पातुर जि. अकोला यांनी या कार्यालयास सादर केलेल्या अर्जानुसार त्यांचे मौजे जिरायत पातुर भाग ३ येथे सनं १०५/१अ क्षे.१.२४ हे. आर. शेतजमीन असून सदर ७/१२ च्या इतर अधिकारामध्ये चिंतु रतीराम असे कुळ नमुद आहे. करीता ७/१२ वर इतर अधिकारामध्ये असलेला कुळाचा बोजा कमी करुन मिळणेबाबत अर्जामध्ये नमुद केले आहे.

त्याअर्थी, सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, या कार्यालयात आपण स्वतः किवा विधी व्यवसायी मार्फत किंवा मान्यता प्राप्त अभिकर्ता मार्फत हजर राहुन मुळ कागदपत्रासह जबाब आक्षेप पुढील १५ दिवसात लेखी स्वरुपात दाखल करावे. अन्यथा आपण हजर न राहिल्यास कुणाची काहीही कोणतीही हरकत नाही, असे गृहीत धरून प्रकरणात मुंबई कुळ वहिवाट शेतजमिन (विदर्भविभाग) अधिनियम १९५८ अन्वये पुढील कार्यवाही करण्यात येईल.आज दि.१९/१०/२०२६ रोजी माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक-१९/१०/२०२६

शिक्का

तहसिलदार तथा
शेतजमीन न्यायाधिकरण, पातुर

जाहीर नोटीस

वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), पातुर यांचे न्यायालयात

एम. जे. सी. नं. १४७/२०२६ प्रोसेस नं.१३६७/२०२६
चौ.ता. ०४/१२/२०२६ दिनांक : १९/१०/२०२६

अर्जदार : मोतीराम तुकाराम गहिले, वय ९० वर्ष, धंदा- काही नाही रा. सिदाजी वेटाळ, पातुर, ता. पातुर जि. अकोला

विरुध्द

गैरअर्जदार : निल.
मयताचा पत्ता :- मयत : १. तुकाराम हरि गहिले २. जनाबाई तुकाराम गहिले
पत्ता :- रा. सिदाजी वेटाळ, पातुर, ता. पातुर, जि. अकोला

या अर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत तुकाराम हरि गहिले यांचे दि.१७/१२/१९९६ रोजी मौजे पातुर, ता. पातुर, जि. अकोला येथे व मयत जनाबाई तुकाराम गहिले यांचे दि.०८/०७/१९९२ रोजी मौजे पातुर, ता. पातुर, जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/१२/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दिष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १९/१०/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

दिनांक :- १९/१०/२०२६
पातुर

शिक्का

आदेशानुसार
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (क.स्तर), पातुर

जाहीर सुचना

सर्व जनतेस व वित्तीय संस्थेस ह्या जाहीर सुचनेद्वारे कळविण्यात येते की, सुनील सुभाष वानखडे रा. नांदुरा बु. ता. नांदुरा जि. बुलढाणा यांनी खालील वर्णनाची मालमत्ता आय.सि.आय.सि.आय. होम फायनान्स कंपनी लि. येथे गहाण ठेवुन कर्ज मिळण्याकरिता अर्ज केला आहे.

मालमत्तेचे वर्णन : मौजे नांदुरा बु. न. प. ता. नांदुरा जि. बुलढाणा च्या हद्दीतील शेत सर्व्हे क्र. ९/१ चा वि. उप-विभागीय अधिकारी, मलकापूर यांच्या फाईल वरील मह. प्र. क्र. एन. ए.पी.-३४/ नांदुरा बु./२/२००३-०४ आदेश दि. १९/०८/२००३ नुसार पारित ले-आउट नकाशातील प्लॉट क्र. ७-अ ज्याचे क्षेत्रफळ १४० चौ. मी. असून, ज्यास चतुर्सिमा : पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : शे. स. क्र. ११२/२ चे लेआउट, ऊत्तरेस : प्लॉट क्र. ६-ब व दक्षिणेस : प्लॉट क्र. ७ - ब

येणे प्रमाणे वरील मालमत्तेचे नोंदणीकृत करारनामा दस्त क्र. १६६४ दि. २४/०७/२०११४ रोजीचे मुळ दस्त जे मालमत्तेचे साखळी दस्त आहे ते हरविले / गहाळ झाले आहे. त्याकरीता पोलीस स्टेशन नांदुरा ता. नांदुरा जि. बुलढाणा येथे दि. ११/१२/२०२३ रोजी तक्रार दाखल केली आहे.

त्याअर्थी जर वरील मालमत्तेवर कोणाचे काही कर्ज, गहाण, बोजा, हक्क, अधिकार अथवा ताबा असल्यास त्यांनी सदर सुचना प्रकाशीत झाल्या पासुन ७ (सात) दिवसात खालील नमुद पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानीशी आक्षेप नोंदवावा. अन्यथा कोणाचाही कसल्याही स्वरुपाचा आक्षेप नाही असे समजुन आय. सि. आय. सि. आय. होम फायनान्स कंपनी लि. हे वरील मालमत्ता गहाण ठेवुन कर्जाची रक्कम वितरीत करतील. त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत वा ऊजर चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि. २८/१०/२०२६

अधिवक्ता : संजीव रा. बोचरे,
संतोष नगर, आगाशे गुरुकुल,
मलकापुर रोड, अकोला - ४४४००४
मोबा. ९८९०४४४८२४

दहा वर्षांचा संघर्ष फळाला, वर्धा येथील ३१३ एनएचएम कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा

दिवाळीच्या तोंडावर शासनाचा निर्णय; राज्यातील १४ हजार ७८७ कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर नियुक्ती

वर्धा/जनमाध्यम

वर्षानुवर्षे कंत्राटी नोकरी, कायम होण्याची प्रतीक्षा आणि भविष्याची अनिश्चितता... या सगळ्यांशी झुंज देणाऱ्या राष्ट्रीय आरोग्य अभियानातील (एनएचएम) कर्मचाऱ्यांसाठी अखेर दिलासादायक बातमी आली आहे. दहा वर्षांहून अधिक काळ सेवा देणाऱ्या पात्र कंत्राटी कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदांवर नियुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. २७ ऑक्टोबर रोजी निर्गमित झालेल्या शासन आदेशानुसार राज्यातील १४ हजार ७८७ कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळणार असून, वर्धा जिल्ह्यातील सुमारे ३१३ कर्मचाऱ्यांचा त्यात समावेश आहे. दिवाळीच्या उंबरठ्यावर मिळालेल्या या निर्णयामुळे दीर्घकाळापासून प्रतीक्षेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला आहे.

आंदोलन, निवेदने अन् प्रतीक्षा; अखेर निर्णय

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत राज्याच्या आरोग्य यंत्रणेत हजारो कंत्राटी कर्मचारी विविध जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. दहा वर्षांपेक्षा अधिक काळ सेवा देऊनही नोकरीच्या स्थैर्याचा प्रश्न कायम असल्याने कर्मचाऱ्यांकडून त्यांना कायम करण्याची मागणी सातत्याने केली जात होती. यासाठी वेळोवेळी आंदोलने करण्यात आली.

कर्मचाऱ्यांच्या या मागणीची दखल घेत शासन स्तरावरून राज्यातील विविध जिल्ह्यांकडून दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा पूर्ण केलेल्या पात्र कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली होती. वर्धा जिल्ह्यातील आरोग्य विभागाने सुमारे ३१३ कर्मचाऱ्यांची यादी शासनाकडे सादर केली होती. त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाने पात्र कर्मचाऱ्यांसाठी अधिसंख्य पदे निर्माण करून आवश्यक खर्चास मान्यता देण्याचा निर्णय घेतला.२७ ऑक्टोबर रोजी सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव ई. रवींद्रन यांच्या स्वाक्षरीने शासन आदेश निर्गमित करण्यात आला.कंत्राटी नोकरीत काम करताना सेवासातत्य, भविष्याची सुरक्षितता आणि नोकरीतील स्थैर्य याबाबत कर्मचाऱ्यांना अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागते. आरोग्य यंत्रणेतील जबाबदाऱ्या पार पाडत असतानाच कायम नियुक्तीच्या निर्णयाकडे त्यांचे लक्ष लागले होते. आता शासनाच्या निर्णयामुळे पात्र कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे.

वर्धा जिल्ह्यातील सुमारे ३१३ कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याने स्थानिक आरोग्य यंत्रणेतही या निर्णयाची चर्चा आहे. मात्र, अधिसंख्य पदांवरील नियुक्तीचा लाभ शासन आदेशातील पात्रता आणि संबंधित अटींनुसार मिळणार आहे.

'दहा वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक सेवा दिलेल्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी वेळोवेळी आंदोलने केली. संबंधितांना निवेदने देऊन मागणी मांडली. अखेर कर्मचाऱ्यांच्या लढ्याला यश मिळाले असून, शासनाचा हा निर्णय स्वागतार्ह आहे.'

अन्नपूर्णा ढोबळे,
एनएचएम कर्मचारी, वर्धा

'जिल्ह्याच्या आरोग्य यंत्रणेत कंत्राटी कर्मचारी म्हणून सेवा देताना कायम नियुक्तीची अपेक्षा होती. शासनाने कर्मचाऱ्यांच्या मागणीचा सहानुभूतीपूर्वक विचार करून ठोस निर्णय घेतल्याने आनंद झाला आहे.'

शमा खान,
एनएचएम कर्मचारी, वर्धा

'दिवाळीच्या तोंडावर आलेला हा निर्णय कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. अधिसंख्य पदे निर्माण करून पात्र कर्मचाऱ्यांना नियुक्ती देण्याच्या निर्णयामुळे आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.'

विलास तिजारे,
एनएचएम कर्मचारी, वर्धा

'एनएचएम कर्मचाऱ्यांच्या एकजुटीच्या लढ्याला आज यश मिळाल्याची भावना आहे. शासनाने मागणीचा सकारात्मक विचार केल्याने कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.'

स्मिता वासनिक,
एनएचएम कर्मचारी, वर्धा

पारंपरिक माती कलेला मिळणार नवी उभारी

कुंभार समाजासाठी लवकरच माती कला बोर्डाची स्थापना होणार-संजय गाते

वर्धा/जनमाध्यम

पारंपरिक माती कलेचे जतन व्हावे, कुंभार समाजाच्या व्यवसायाला आर्थिक बळ मिळावे आणि समाजाच्या प्रलंबित प्रश्नांना न्याय मिळावा, यासाठी राज्य सरकार लवकरच श्रीसंत शिरोमणी गोरोबा काका माती कला बोर्ड कार्यान्वित करेल, असा विश्वास सकल कुंभार समाज विकास परिषदेचे प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांनी व्यक्त केला.

वर्ध्यात मंगळवारी (२७ ऑक्टोबर) सकल कुंभार समाज विकास परिषदेच्या प्रदेश कार्यकारिणीची बैठक झाली. या बैठकीत ते बोलत होते. राज्य सरकारने कुंभार समाजासाठी ७०० ब्रास रॉयल्टी माफीचे परिपत्रक जारी केल्याने पारंपरिक व्यवसायाला दिलासा मिळेल, असे सांगत गाते यांनी शासनाचे आभार मानले.

माती कला बोर्डाच्या स्थापनेसह ग्रामीण भागातील कुंभार व्यावसायिकांना माफक दरात इंधन उपलब्ध करून देणे, पारंपरिक व्यवसायासाठी जागा मिळवून देणे आणि तेर तीर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करणे, या प्रश्नांकडेही त्यांनी लक्ष वेधले. हरिराम टॉवर, मुरारका लॉन्स येथे झालेल्या या बैठकीत संघटनात्मक बांधणी, आगामी कार्यक्रम आणि समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा झाली. येत्या १५ नोव्हेंबर २०२६ रोजी पुण्यातील आळा फाटा येथे राज्यस्तरीय पदाधिकारी व कार्यकर्त्यांची विस्तृत बैठक आयोजित करण्यात आली आहे.बैठकीच्या प्रारंभी गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. प्रमुख सरचिटणीस सुभाष तेटवार यांनी प्रास्ताविक केले. उत्तमराव मांजरमकर यांनी सूत्रसंचालन, तर वर्धा जिल्हाध्यक्ष वसंतराव जवळेकर यांनी आभार मानले. राज्यातील विविध जिल्ह्यांचे पदाधिकारी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

राघव निवर्ती महाराष्ट्राचा राज्यविजेता

बॅडमिंटनच्या कोर्टवर सुवर्ण भरारी; एकेरीत सोनेरी यश, दुहेरीत रौप्यपदकाची कमाई

वर्धा/जनमाध्यम

बॅडमिंटनच्या कोर्टवर दमदार खेळ, अचूक फटके आणि जिंकण्याची जिद्द यांच्या जोरावर वर्ध्याच्या राघव निवर्ती याने राज्यस्तरावर आपला ठसा उमटवला आहे. नागपूर येथे झालेल्या महाराष्ट्र सब-ज्युनियर राज्य बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेत अकरा वर्षांखालील मुलांच्या एकेरी गटात सुवर्णपदकाची कमाई करत राघवने महाराष्ट्राचा राज्यविजेता होण्याचा मान पटकावला. एवढ्यावरच न थांबता दुहेरी गटातही रौप्यपदक जिंकत त्याने आपल्या यशात आणखी एक मानाचा तुरा खोवला.

योनेक्स-सनराईज जी. एच. रायसोनी मेमोरियल महाराष्ट्र सब-ज्युनियर राज्य बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धा २१ ते २६ ऑक्टोबरदरम्यान नागपूर येथे पार पडली. राज्यभरातील खेळाडूंच्या सहभागाने रंगलेल्या या स्पर्धेत राघवने आपल्या खेळातील कौशल्य आणि सातत्याच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांवर मात केली. अकरा वर्षांखालील एकेरी गटातील सुवर्णपदकाने त्याच्या गुणवत्तेची मोहोर उमटवली, तर दुहेरीतील रौप्यपदकाने त्याच्या कामगिरीला आणखी झळाळी दिली. राघवच्या या यशामागे अल्फा ड्रीम बॅडमिंटन अकादमीतील प्रशिक्षक लेइहोंग एच. के. आणि शेमॉन एच. के. यांचे मोलाचे मार्गदर्शन आहे. तांत्रिक कौशल्य, नियमित सराव, शिस्त आणि मेहनतीच्या बळावर राघवने आपल्या खेळात प्रगती साधली. प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाला राघवच्या जिद्दीची जोड मिळाल्याने त्याला राज्यस्तरावर दुहेरी पदकांची कमाई करता आली.ॲली स्पोर्ट्स मॅनेजमेंट अँड डेव्हलपमेंट कंपनीच्या व्यवस्थापनाखाली अल्फा ड्रीम बॅडमिंटन अकादमीचे संचालन केले जाते. राघवच्या या यशाचे अकादमीचे संचालक दिनेश चन्नावार, आशिष झोडे आणि रजनीश जैन यांनी कौतुक केले. त्यांनी राघव आणि त्याच्या पालकांचे अभिनंदन करत पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

स्वच्छ गाव, सुंदर शाळा ; निरोगी जीवनासाठी विद्यार्थ्यांचा पुढाकार

नारायणपुरात स्वच्छता रॅलीतून ग्रामस्थांमध्ये जनजागृती

समुद्रपूर/जनमाध्यम

स्वच्छ गाव, सुंदर गाव, सुंदर गावात स्वच्छ शाळा आणि निरोगी जीवनाचा संकल्प प्रत्यक्षात उतरविण्यासाठी नारायणपुरातील विद्यार्थ्यांनी स्वच्छता रॅलीच्या माध्यमातून ग्रामस्थांमध्ये जनजागृती केली. स्वच्छतेचे महत्त्व पटवून देतानाच श्रमदान, पाणी बचत आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी दिला.

या रॅलीत विद्यार्थ्यांनी जंतनाशक गोळ्यांचे सेवन, वैयक्तिक स्वच्छता, पाण्याचा काटकसरीने वापर आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता

राखण्याबाबत ग्रामस्थांना आवाहन केले. स्वच्छतेची सुरुवात स्वतःपासून आणि आपल्या घरापासून झाली, तर संपूर्ण गावाचे आरोग्य सुधारू शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा आशाताई शेंडे, उपाध्यक्ष संजय फरकाडे व समिती सदस्य, कृष्णराव झोटिंग माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य मेश्राम सर, येडे सर, अंगणवाडी शिक्षिका नंदा अंजनकर, मदतनीस संगीता भुमरे, आरोग्य सेविका, आशा वर्कर सुनीता डंबारे, प्रेमिला बुरांडे, पत्रकार बंडूजी बन आणि माजी सरपंच चित्रा पुसदेकर उपस्थित होते.मुख्याध्यापक धनपाल राऊत यांनी 'चला शाळेत जाऊया' या उपक्रमासह जंतनाशक गोळ्यांचे सेवन का व कसे करावे, याबाबत मार्गदर्शन केले. संचालन कपिल खेकारे यांनी केले, तर शिक्षणसेवक हनुमंत मुळे यांनी आभार मानले. केंद्रप्रमुख रमेश भिलकर यांच्यासह विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांनी या उपक्रमात सहभाग घेतला.

नदीपात्रातील प्रदूषण रोखण्यासाठी इंद्रप्रस्थ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे श्रमदान

लोकशिक्षणातूनच पर्यावरण संवर्धनाला मिळेल बळ

वर्धा/जनमाध्यम

धार्मिक श्रद्धेतून पूजाविधीनंतर अर्पण केले जाणारे निर्माल्य अनेकदा नदीपात्रात आणि सार्वजनिक ठिकाणी टाकले जाते. मात्र, याच निर्माल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या निर्माण होत असल्याने पर्यावरणाच्या रक्षणासाठी सामाजिक जाणीव आणि सामूहिक पुढाकाराची गरज आहे.हीच जाणीव कृतीतून रुजविण्याचा प्रयत्न वर्ध्यातील इंद्रप्रस्थ न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या समाजकार्य विभागातील विद्यार्थ्यांनी केला. पवनार येथे निर्माल्य संकलन मोहीम राबवून विद्यार्थ्यांनी स्वच्छतेसोबतच पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला.

महाविद्यालयाच्या समाजकार्य विभागाच्या क्षेत्रकार्यांतर्गत आयोजित या उपक्रमात विद्यार्थ्यांनी पवनार परिसरातून निर्माल्य संकलित केले. धार्मिक विधींनंतर जमा होणाऱ्या निर्माल्याची योग्य विल्हेवाट लावणे, नदीपात्र आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता राखणे तसेच पर्यावरणाविषयी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करणे, हा मोहिमेचा मुख्य उद्देश होता.

नदीपात्रात आणि उघड्यावर टाकल्या जाणाऱ्या निर्माल्यामुळे जलप्रदूषणाची समस्या गंभीर होत आहे. निसर्गाचा ऱ्हास रोखण्यासाठी व्यापक स्तरावर लोकशिक्षण करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन प्रा.संदीप गिरडे यांनी केले.विद्यार्थ्यांनी स्थानिक नागरिक, भाविक आणि व्यापाऱ्यांशी संवाद साधून निर्माल्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्याचे महत्त्व पटवून दिले. धार्मिक श्रद्धा जपत पर्यावरणाची हानी टाळता येऊ शकते, याबाबतही जनजागृती करण्यात आली. प्रा.संदीप गिरडे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या मोहिमेत दामिनी वानखेडे,प्रतीक नगराळे,संकेत पोहणे, रागिणी ठाकरे, निशा खोपाळ आणि सोनाली डायरे या विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेत श्रमदान केले.

वर्गातील शिक्षणाला प्रत्यक्ष सामाजिक कार्याची जोड मिळाल्यास विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक उत्तरदायित्वाची भावना अधिक दृढ होते. क्षेत्रकार्याच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना समाजातील समस्या समजून घेण्याची आणि त्यावर कृतीशील योगदान देण्याची संधी मिळते, असे मत प्राचार्य डॉ. आशिष ससनकर यांनी व्यक्त केले.पर्यावरण रक्षणाची सुरुवात स्वतःपासून करून समाजालाही त्यात सहभागी करून घेता येते, हा संदेश विद्यार्थ्यांनी आपल्या कृतीतून दिला. त्यांच्या या उपक्रमाचे पवनार परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे.

जमीन मिळाली; शेती कसणार कशी

भूमिहीन लाभार्थी अडचणीत; जमीन वाटप प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह

आष्टी (शहीद)/जनमाध्यम

भूमिहीन शेतमजुरांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण व स्वाभिमान योजनेतील अडचणी समोर येत आहेत. लाभार्थ्यांना जमीन मिळत असली, तरी ती गावापासून दूर, डोंगरमाथ्यावर किंवा जंगलालगत असल्याने प्रत्यक्ष शेती करणे कठीण ठरत आहे. लहान आर्वी येथील एका लाभार्थ्याला वडाळा गावातील भडकुंभ शिवारात जमीन देण्यात आली आहे. त्यामुळे शेतीच्या कामांसाठी नियमित ये-जा करताना अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. दुसरीकडे, तारासावंगा येथील गोरले नामक लाभार्थ्याची जमीन जंगलालगत असून, ती लागवडीयोग्य करण्यासाठी अंदाजे दोन लाख रुपये खर्च येण्याची शक्यता आहे. आर्थिक परिस्थिती कमकुवत असलेल्या लाभार्थ्यांनी हा खर्च उभा करायचा कसा, असा प्रश्न उपस्थित होत आहे. वन्यप्राण्यांमुळे पिकांचे नुकसान होण्याची भीतीही आहे. जमीन वाटप करताना जमिनीची सुपीकता, पाण्याची उपलब्धता, रस्ते आणि भौगोलिक परिस्थितीचा विचार केला जातो का, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

गावातच जमीन मिळावी : गाडगे

समाजकल्याण विभागाची योजना चांगली असली, तरी अंमलबजावणीतील उणिवा दूर करणे आवश्यक आहे. दुसऱ्या गावात शेती करणे खर्चिक असून, वन्यप्राण्यांचाही त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे लाभार्थ्यांना गावाच्या शिवारातच जमीन मिळावी, अशी मागणी धाडीचे माजी उपसरपंच ईश्वर गाडगे यांनी केली.लाभार्थ्यांना लकी ड्रॉ पद्धतीने जमीन वाटप केले जाते. त्यामुळे दुजाभाव होत नाही. तक्रारी आल्यास त्यांचे निराकरण केले जाते, अशी माहिती समाजकल्याण अधिकारी, वर्धा यांनी दिली.

तरुणाच्या कपाळावर तलवारीसदृश वस्तूने वार

पुलगाव/जनमाध्यम

जुन्या वादातून एका २४ वर्षीय तरुणाला तलवारीसदृश वस्तूने मारहाण करून गंभीर जखमी केल्याची घटना पुलगाव शहरातील सुभाषनगर परिसरात घडली. या हल्ल्यात तरुणाच्या डाव्या डोळ्याच्या वर कपाळाला गंभीर दुखापत झाली असून त्याला आठ टाके पडले आहेत. प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी सावंगी (मेघे) येथे हलविण्यात आले.

फरदीन खान ऊर्फ रोज इरफान खान (२४, रा. हिंगणघाट फैल, वॉर्ड क्रमांक ६, पुलगाव) असे जखमी तरुणाचे नाव आहे. त्याची आई परवीन खान इरफान खान (५०) यांनी पुलगाव पोलिसांत तक्रार दिली. तक्रारीनुसार, २५ ऑक्टोबर रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास रेहान शेख आणि अनिकेत काळबांडे हे दोघे फरदीनच्या घरी आले. त्याला कोणीतरी बोलावत असल्याचे सांगून ते सुभाषनगर येथील पाण्याच्या टाकीजवळील झोपडपट्टी परिसरात घेऊन गेले.

तेथे फरदीन आणि आरोपींमध्ये वाद सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्याची आई घटनास्थळी पोहोचली. यावेळी रेहान शेख याने फरदीनला त्याच्या वडिलांना शिवीगाळ केल्याच्या कारणावरून हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.अनिकेत काळबांडे याने फरदीनला पकडून ठेवले असता, रेहानने तलवारीसदृश वस्तूने त्याच्या डाव्या डोळ्याच्या वर कपाळावर वार केला.जखमी फरदीनला एका तरुणाने मोटारसायकलवरून ग्रामीण रुग्णालयात दाखल केले.

तेथे उपचार केल्यानंतर त्याला पुढील उपचारासाठी सावंगी (मेघे) येथे पाठविण्यात आले.या प्रकरणी पुलगाव पोलिसांनी रेहान शेख आणि अनिकेत काळबांडे यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ११८(२), ३(५) आणि ३५२ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. दोन्ही आरोपी फरार असून पुढील तपास सुरू आहे.

संघर्षातून घडली यशाची वाट; सात महिलांनी जागवली स्त्रीशक्ती

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा 'जागर स्त्रीशक्तीचा' उपक्रम

वर्धा/जनमाध्यम

कौटुंबिक बंधने, सामाजिक विरोध, आर्थिक अडचणी आणि संघर्षाचे अनेक टप्पे पार करत स्वतःची वाट निर्माण करणाऱ्या सात महिलांच्या अनुभवांतून स्त्रीशक्तीचा जागर घडला. संकटांना घाबरून थांबण्यापेक्षा त्यांच्याशी दोन हात करून ध्येय गाठावे, असा संदेश या महिलांनी दिला.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त राज्यभर 'जागर स्त्रीशक्तीचा' हे अभियान राबविण्यात आले. 'फुलेच्या विचारांची ज्योत, स्त्रीमुक्तीची वाट' ही या अभियानाची संकल्पना होती. याच उपक्रमांतर्गत समितीच्या वर्धा जिल्हा व शाखेच्या वतीने 'भय घरातले संपत नाही, लढा आपलाच' या विषयावर सात दिवस सात महिलांच्या ऑनलाइन मुलाखती घेण्यात आल्या.

रेश्मा रघाटाटे (गांडोळे), सुकन्या वाळके, प्रतीक्षा दापुरकर, पोलिस उपनिरीक्षक वर्षा वंजारी, लता गजभिये, देवांगना वाघमारे आणि प्रतिभा ठाकूर यांच्या संघर्षमय प्रवासातून महिलांना नवी प्रेरणा मिळाली. शिक्षणासाठीचा संघर्ष, आर्थिक अडचणी, कुटुंबातील विरोध आणि सामाजिक बंधने यांवर मात करत या महिलांनी आपापल्या क्षेत्रांत वेगळी ओळख निर्माण केली.

कुणी विद्यार्थ्यांचे डबे बनवून आर्थिक जबाबदारी सांभाळत उच्च शिक्षणाचे स्वप्न पूर्ण केले, तर कुणी आर्थिक मदतीअभावी मैत्रिणीच्या वडिलांकडून पैसे घेऊन पुण्यात पत्रकारितेचे शिक्षण घेतले. योगाभ्यास करताना कपड्यांवरून होणारा विरोध असो किंवा शिक्षणासाठीचा संघर्ष, प्रत्येक महिलेने जिद्दीने मार्ग काढला.घर, कुटुंब, मुले आणि सामाजिक जबाबदाऱ्या सांभाळताना स्वतःचे ध्येय साध्य करण्यासाठी सातत्य, आत्मविश्वास आणि कामाप्रती प्रामाणिकपणा आवश्यक असल्याचे या महिलांनी सांगितले.या उपक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. माधुरी झाडे, डॉ. मंजुषा देशमुख, अदिती धोपटे, कविता राठोड, कविता लोहट, सारिका देहंकर, सीमा भोयर, कल्पना सातव, द्वारका इमडवार यांच्यासह अनेकांनी सहकार्य केले.

हिंगणघाट- घराशेजारी लाकडे ठेवण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून दोघांनी दाम्पत्याला शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना हिंगणघाट येथील संत चोखोबा वॉर्डात घडली. पत्नीला मारहाण होत असताना मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या पतीलाही दुखापत झाली. याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक ३३१
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

किरण सरनाईकांच्या विजयाचे 'किंगमेकर' बच्चू कडू!

शिवसेना आणि प्रहारची पडद्यामागून संघटनात्मक ताकद

पाच जिल्ह्यांतील नियोजनाची शिक्षक मतदासंघाच्या विजयात महत्त्वाची भूमिका

अमरावती/ प्रतिनिधीः- शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीत किरण सरनाईक यांच्या विजयामागे आमदार बच्चू कडू यांचे नियोजन, राजकीय समन्वय आणि संघटनात्मक ताकद महत्त्वाची ठरल्याची चर्चा आहे. आंदोलनात आक्रमक, तर निवडणुकीत शांत आणि संयमी रणनीतीने काम करणाऱ्या बच्चू कडू यांनी या निवडणुकीत 'किंगमेकर'ची भूमिका बजावल्याचे चित्र आहे.

बच्चू कडू यांनी आ.संजय खोडके, सुलभा खोडके, आ.राजेश वानखडे, आ. प्रवीण पोटे यांच्यासह पाचही जिल्ह्यांतील प्रमुख शिक्षण संस्था चालकांशी प्रत्यक्ष भेटी घेऊन संवाद साधला. मताधिक्य वाढवणे, विविध गटांमध्ये समन्वय साधणे आणि किरण सरनाईक यांना पाठिंबा मिळवून देण्यासाठी त्यांनी नियोजन केले. मुस्लिम शाळाचालक आणि शिक्षकांशीही त्यांनी थेट संवाद साधत त्यांना या प्रक्रियेशी जोडण्याचा प्रयत्न केला.

या निवडणुकीत शिवसेनेचे पदाधिकारी, नेतेमंडळी आणि शिवसैनिक यांची मोट बांधण्याबरोबरच बच्चू कडू यांनी प्रहार संघटनेची ताकदही मैदानात उतरवली. प्रहार संघटनेने संपूर्ण निवडणुकीच्या नियोजनात सक्रिय सहभाग घेतला. कोणताही गाजावाजा न करता कार्यकर्त्यांना योग्य ठिकाणी सक्रिय करून संघटनात्मक पद्धतीने काम करण्यात आले.



शिवसेनेचे पदाधिकारी आणि प्रहारचे कार्यकर्ते यांनी परस्पर समन्वय राखत मतदारांपर्यंत पोहोचणे, संपर्क वाढवणे आणि निवडणुकीच्या नियोजनाची अंमलबजावणी करणे यावर भर दिला. प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कामाला प्राधान्य देत केलेल्या या प्रयत्नांचा किरण सरनाईक यांच्या विजयासाठी उपयोग झाल्याचे मानले जात आहे.

दुसऱ्या पसंतीच्या मतांचेही नियोजन

पहिल्या फेरीत विजयाचे चित्र स्पष्ट न झाल्यास दुसऱ्या पसंतीच्या मतांचे महत्त्व वाढू शकते, याचा विचार करून बच्चू कडू यांनी विविध उमेदवारांशी समन्वय साधण्यावर भर दिला. उमेदवारांमधील संबंध, मतांचे संभाव्य गणित आणि पुढील फेऱ्यांतील शक्यता लक्षात घेऊन त्यांनी रणनीती आखल्याचे सांगितले जाते. बच्चू कडू यांनी यापूर्वी शिक्षक मतदारसंघाची निवडणूक लढवण्याची घोषणा केली होती. त्यानुसार पाच जिल्ह्यांत शिक्षकांशी संपर्क, मतदार नोंदणी आणि 'प्रहार शिक्षक आघाडी'ची बांधणी करण्यात आली होती. मात्र, या संघटनात्मक ताकदीचा उपयोग त्यांनी किरण सरनाईक यांच्या विजयासाठी केला. शिवसेनेची संघटनात्मक ताकद, प्रहारचे नियोजन आणि बच्चू कडू यांचे राजकीय आकलन या सर्व घटकांचा समन्वय या निवडणुकीत चर्चेचा विषय ठरला आहे. किरण सरनाईक यांच्या विजयासोबतच पडद्यामागून संघटनांची मोट बांधणाऱ्या बच्चू कडू यांच्या भूमिकेकडेही राजकीय वर्तुळाचे लक्ष वेधले गेले आहे.

शिव संभाजी प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा १० नोव्हेंबरला

अमरावती/प्रतिनिधीः- शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठान तर्फे येत्या १० नोव्हेंबर रोजी अभियंता भवन, शेगांव नाका रोड येथे राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती आज बुधवार २८ ऑक्टोबर रोजी पत्रकार परिषदेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष नीलेश उभाड यांनी दिली.

पत्रकार परिषदेला राहुल तायडे ,समीर जवंजाळ, प्रा दिलीप काळे, प्रकाश साबळे, सुरेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते.

त्यांनी सांगितले की, या संमेलनात 'सोयरीक' पुस्तकाचे प्रकाशनही करण्यात येणार आहे. हे पुस्तक सर्वांसाठी अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचा दावा त्यांनी केला. विदर्भातील कुणबी, मराठा, पाटील समाजातील विवाह इच्छुक युवक- युवतींसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने हे संमेलन आयोजित केले जात आहे. समारोहात अवश्य सहभागी व्हावे.आजच्या धावपळीच्या काळात युवक युवतींच्या पालकांसमोर विवाह संबंध जुळवणे हे मोठे आव्हान बनले आहे. अशा परिस्थितीत अशा संमेलनाचे आयोजन आवश्यक झाले आहे. हीच गरज लक्षात घेऊन शिव संभाजी स्वराज्य प्रतिष्ठानने दिवाळी सणानंतर लगेचच या मेळाव्याचे आयोजन केले आहे. प्रतिष्ठानने २०२० पासून हे आयोजन अविरत सुरू ठेवले आहे.समाजातील युवकांना एकत्र आणणे, परिचयातून संबंध वाढविणे, पारंपरिक रितीरिवाजांची कल्पना देऊन जीवन रक्षण आणि समाजात आपलेपणाची भावना रुजवणे हा या प्रतिष्ठानचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. नीलेश उभाड म्हणाले, 'समाज जोडूया, नाती जपूया, नव्या पिढीचे भविष्य घडवूया.. या उद्देशाने हा मेळावा घेण्यात येत आहे. यामध्ये सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५३२/२०२६ ने.ता.०३.१२.२०२६

अर्जदार :
१. रेखा गंगाधरराव ढोबळे, वय ६० वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. रंजीत गंगाधरराव ढोबळे, वय ४१ वर्षे, व्यवसाय - शेती
३. स्वाती निलेश उमक, वय ३९ वर्षे, व्यवसाय - घरकाम
४. शितल विशाल ठाकरे, वय ३७ वर्षे, व्यवसाय - घरकाम
अर्जदार नं१ व २ रा.विवेकानंद कॉलनी, विदर्भ मिल्स कॉलनी, अचलपूर, ता.अचलपूर,जि.अमरावती, अर्जदार नं.३ रा.गुजरी बाजार चौक, गांधी चौक, मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती, अर्जदार नं.४ रा.मनिबाई गुजराती शाळेमागे अंबापेठ अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत गंगाधर चंपतराव ढोबळे** यांचा मृत्यू दिनांक **०७.१२.२०२०** रोजी रतनपूर, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५३२/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**२६.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१०५/२०२६
अभिजीत अधिक एक -वि- निरंक
पुढील ता.३१.१०.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Abhijeet Satyakumar Gehi, Aged 32 Yrs. Occu.: Business
2. Ankita Satyakumar Gehi, Aged 36 Yrs. Occu.: Business
Both R/o Basant Vihar, Gidwani Road, Near Basant Cinema Chembur Mumbai

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Smt.Meena Satyakumar Gehi हे दिनांक 12.09.2024 रोजी **चेंबूर मुंबई** येथे मयत झाले. व Satyakumar Natharam Gehi हे दिनांक १२.०३.२०११ रोजी चेंबूर मुंबई येथे मयत झाले. अर्जदार Abhijeet Satyakumar Gehi + 1 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Abhijeet Satyakumar Gehi + 1 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जाहीर सुचना

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे नांव **श्री.तुषार दिलीपराव माहोरे**, रा.वडगांव मोहोरे, ता.जि.अमरावती मी मौजे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.३१७/१ क्षेत्र ०.२७ हे.आर, भो.वर्ग-१ मोजणी नकाशा मो.र.क.२५२ तातडी, बिनशेती २०२३ महानगरपालिका अमरावती व तहसीलदार अमरावती यांनी मंजूर केलेल्या मालू लेआऊट, साईनगर, गुरुछाया कॉलनी, या नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागेवर प्लॉट नं.१३ (तेरा) याचे एकुण क्षेत्रफळ ०.२७ आर. सर्वे नं.३१७/१, ९९.०० चौ.मी. १०६५.६३ चौ.फुट असून पश्चिम मुखी प्लॉट आहे.

पुर्वेस - प्लॉट नं.१२
पश्चिमेस - लेआऊटमधील ९ मी.रोड
उत्तरेस - सर्व्हे नं.३१७ चा भाग
दक्षिणेस - प्लॉट नं.१४

वरील वर्णनाची मालमत्ता जर कोणाचा आक्षेप न आलस ह सर्व प्रकारच्या बोजामधून मुक्त आणि निर्वेध आहे असे समजून आमचे खरेदीचे पुढचे व्यवहार पूर्ण करतील. खरेदीनंतर आलेल्या आक्षेपांची दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २७.०१.२०२५

(तुषार दि.माहोरे)
मो.८८०६२९२४६४

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे

संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ५४
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जाहीर नोटीस

विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती यांचे न्यायालयात

आर.एम.जे.सी.क्र.५०४/२०२६ ने.ता.२७.११.२०२६

अर्जदार :
१. फगन बाबुलाल भलावी, वय ६५ वर्षे, व्यवसाय - सेवानिवृत्त
२. नंदू बाबुलाल भलावी, वय ५८ वर्षे, व्यवसाय - मजुरी
३. संजय बाबुलाल भलावी, वय ५५ वर्षे, व्यवसाय - शिक्षक
४. जगन बाबुलाल भलावी, वय ५२ वर्षे, व्यवसाय - मजुरी
सर्व रा.देऊरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : निरंक

बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मयत बाबुलाल मंगल भलावी** यांचा मृत्यू दिनांक **२८.०४.२०२४** रोजी तसेच **मृतक कमल बाबुलाल भलावी हिचा** मृत्यू दि.१०.०६.२०२५ रोजी देऊरवाडा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.५०४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.**१९.१०.२०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

चौकशीची जाहीर नोटीस

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 170/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक: धीरज वासेकर व सिकची जनकल्याण प्रतिष्ठान रा.लढ्ढा प्लॉट, बियाणी चौक अमरावती
बाबत अर्जदार - **श्रीमती पूजा धीरज वासेकर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
(अ) जंगम मिळकत (वर्णन) - निरंक
(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२३.१०.२०२६** रोजी दिली.

शिक्का

अधीक्षक,(न्याय शाखा)
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१९३/२०२६
किरण अधिक दोन -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Kiran Prabhudatta Vyas, Aged 60 Yrs. Occu.: Housewife
2. Punit Prabhudatta Vyas, Aged 39 Yrs. Occu.: Labour
Both R/o Near Kalimata Temple, Sabnis Plot Rukhmuni Nagar, Amravati
3. Megha Pankaj Upadhye, Aged 41 Yrs. Occu.: Housewife
R/o Flat No804, Lane No.6, Rituprana Residence, Katraj, Pune City Katraj, Dist.Pune-411046

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Prabhudatta Muraridatta Vyas हे दिनांक 07.09.2024 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Kiran Prabhudatta Vyas + 2 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Kiran Prabhudatta Vyas + 2 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२४.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

नगर परिषद कार्यालय, अचलपूर

जाहीरनामा

या जाहीरनाम्याद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नांव **श्री.अजिंक्य दिगंबर बोरकर**, पत्ता जीवनपुरा, अचलपूर जि.अमरावती यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.२० संगणक मालमत्ता क्र.ACHA000/32497 जुना मालमत्ता क्र. .... नझुल शिट क्र.७/१२ प्लॉट नं.६९/१फ/५३/बी ही कर आकारणी नोंदवहीनुसार **सुमित नंदकिशोर अग्रवाल/सुरभी पवन अग्रवाल** या नावाने असून वरील अर्जदार यांनी या **श्री.अजिंक्य दिगंबर बोरकर** नावाने फेरफार घेण्याकरीता/नाव बदलण्यास/नाव लावण्यास/नावामध्ये-क्षेत्रामध्ये दुरुस्ती करण्याकरीता (खरेदी, मृत्यूपत्र, बक्षीसपत्र, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यायालयाद्वारे) या कार्यालयामध्ये दिनांक **२७.१०.२०२६** रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत लेखी स्वरुपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करुन हजर रहावे. मुदतीनंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त मालमत्तेची चतुःसिमा -
पुर्वेस - लेआऊट अंतर्गत रोड
पश्चिमेस - लेआऊटमधील प्लॉट नं.५३/अे
दक्षिणेस - लेआऊटमधील अंतर्गत रोड
उत्तरेस - लेआऊटमधील प्लॉट नं.५४

शिक्का

मुख्याधिकारी,
नगर परिषद, अचलपूर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.एस.एस.भिंगारदेव, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२१३०/२०२६
योगेश साहेबराव मडघे व ईतर -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
१. योगेश साहेबराव मडघे, वय ३८ वर्षे, व्यवसाय - शेती
रा.चांदुरी कवठा बहाळे, जि.अमरावती
२. सौ.रुपाली विष्णुपंत मौढे, वय ४० वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.खडकपुरा. चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. सौ.स्वाती योगेशराव बेलसरे, वय ३६ वर्षे, व्यवसाय - घरकाम
रा.वार्ड नं.१९, वरुड, जि.अमरावती
४. श्री.साहेबराव नामदेवराव मडघे, वय ७० वर्षे, व्यवसाय - शेती
रा.चांदूरी कवठा बहाळे, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुनिता साहेबराव मडघे** हे दिनांक 30.07.2026 रोजी **अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **योगेश साहेबराव मडघे व ईतर वि.निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **योगेश साहेबराव मडघे व ईतर वि.निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२०३/२०२६
राधा अधिक पाच -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Radha Laxmanrao Tidake, Aged 80 Yrs. Occu.: Home Maker
2. Vasant Laxmanrao Tidake, Aged 63 Yrs. Occu.: Labourer
3. Vinod Laxmanrao Tidake, Aged 61 Yrs. Occu.: Retired
4. Dilip Laxmanrao Tidake, Aged 58 Yrs. Occu.: Service
No.1 to 4 R/o Jyoti Colony, Sai Nagar, Amravati.
5. Padma Santosh Pingle, Aged 52 Yrs. Occu.: Home Maker
R/o Runa Adgaon Naka, 2 Shri Kala Krushna Krushan Nagar, Panchavati Nashik, Dist. Nashik
6. Ashaben Laxmanbhai Mugal,
R/o 39, Rupal Society, Marathi School, Vedroad Surat City Dist.Surat

-- विरुध्द --

गैरअर्जदार : Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Laxman babuji Tidake हे दिनांक 05.12.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार Radha Laxmanrao Tidake + 5 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Radha Laxmanrao Tidake + 5 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नामे असलम अहेमद खान मुकद्दर खान,** रा.कॅपिटल हार्डवेअर, वलगांव रोड, जमिल कॉलनी, असोरिया पेट्रोल पंपाजवळ, बेस्ट हॉस्पीटल समोर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी दिलेल्या माहिती व पुरविलेल्या दस्तऐवज व अधिकारावरुन सुचित करतो की, माझे पक्षकार यांचे वडीलांचे खालील वर्णनाची स्थावर मिळकत असून त्या स्थावर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे--

मालमत्तेचे वर्णन - नोंदणी पोट तुकडी अमरावती शहर कचेरीचे कक्षेतील व अमरावती मनपाच्या हद्दीतील मौजे तारखेडा, प्रगणे बडनेरा, ता.जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१५/१, जमीन कॉलनी, परतवाडा-वलगांव रोड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मोहल्ल्यातील जमिनीतील ज्याचा रा.मा.क. एन.ए.पी.३४/तारखेडा/१६/२/१९६७-१९६८, दि.१८.०२.१९७२ रोजी नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील मंजूर नकाशाप्रमाणे प्लॉट नं.१४८-अ (प्लॉट नं.एकशे अठ्ठेचाळीस-अ) ज्याची साईज ४० X १२० फुट असून ज्याचे एकुण क्षेत्रफळ ४४६.०९ चौ.मी. (४८०० चौ.फुट) यापैकी मा.तहसीलदार साहेब, अमरावती भूखंड विभाजन आदेशानुसार ज्याचा रा.मा.क. एन.ए.पी.३४/तारखेडा-१८४/२/२२-२०२३, दि.२२.११.२०२२ रोजी नुसार लेआऊट कन्व्हर्शन मंजूर झालेल्या जागेतील मंजूर नकाशाप्रमाणे प्लॉट नं.१४८-अ/२ ज्याची साईज २ X १२० फुट ज्याचे एकुण क्षेत्रफळ ३१२० चौ.फुट ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - वलगांव रोड
पश्चिमेस - सर्व्हीस गल्ली
उत्तरेस - प्लॉट नं.१४८/१ (१५६.१३ चौ.मी.)
दक्षिणेस - प्लॉट नं.१४८/२ (माझे पक्षकाराची जागा)

येणे प्रमाणे वरील प्लॉट नं.१४८-अ एकुण क्षेत्र ४४६.०९ चौ.मी. होता. परंतु सलीम खान मुकद्दर खान यांनी सदर प्लॉटचे विभागणीकरीता मा.तहसीलदार, अमरावती यांचे न्यायालयामध्ये अर्ज करुन तहसीलदार यांचे आदेशानुसार सदरहू प्लॉटचा प्लॉट नं.१४८/ए/१ व प्लॉट नं.१४८/ए/२ असे विभाजन केलेले होत व माझे पक्षकारास या प्लॉटमधील जागेमधून प्लॉट नं.१४८/ए/१ क्षेत्रफळ १३ X १२० = १५६० चौ.फुट (१५६.१३ चौ.मी.) जागा देण्यात आली व सदरहू दोन्ही सब डिव्हीजन झालेल्या प्लॉटवर तीन मजली बिल्डीग बांधकाम केलेली आहे. परंतु सदर विभाजनाच्या करीता केलेल्या अर्जाबद्दल माझ्या पक्षकाराला कोणतीही सूचना माझ्या पक्षकाराच्या भावाने दिलेली नव्हती व सदर अर्जावर माझ्या पक्षकाराने कधीही सही केलेली नाही व त्याला ते सबडिव्हीजन मंजूर नसल्यामुळे माझे पक्षकार यांनी मा.तहसीलदार यांचे आदेशाविरुध्द उपविभागीय अधिकारी यांचेकडे अपिल दाखल केले होते. सदरच्याअपिलामध्ये दिनांक २१.०५.२०२६ रोजी आदेश पारित होऊन मा.तहसीलदार साहेब यांचा दिनांक २२.११.२०२२ रोजीचाआदेश रद्द केलेला आहे व मा.उपविभागीय अधिकारी यांनी असेही आदेशित केले की, **अपिलार्थी उत्तरार्थी यांना निर्देशित करण्यात येते की, मौजे तारखेडा येथील सर्व्हे नं.१५/१ मधील प्लॉट .१४८/अ एकुण क्षेत्र ४४६.०९ चौ.मी. मधील आपआपला मालकी हक्क सक्षम न्यायालयातून कायम करुन घ्यावा**.असे आदेशीत केलेले आहे. त्यामुळे माझे पक्षकार हे लवकरच सलीम खान मुकद्दर खान यांनी माझे वडीलांची फसवणूक करुन खोटे तयार करुन घेतलेले दि.१६.०९.२०१९ रोजीचे रजिस्टर्ड दस्त क.३०३९/२०१९ व त्याचे अधिकारावरुन दिनांक ०५.१२.२०२२ रोजी रजिस्टर्ड खरेदीखत दस्त क.अरण-२/५३६८/२०२२ दि.०५.१२.२०२२ नुसार विकी केलेले खरेदीखत रद्द करण्याकरीता विद्यमान सक्षम न्यायालयात दाद मागणार आहेत. त्यामुळे सदरच्यावर नमुद मिळकतीबाबत यापुढे कोणीही कुठलाही व्यवहार, सौदा, खरेदीखत, गहाणख्त, कर्ज, बोजा, कूळ इत्यादी वगैरे करु नये असे काही केल्यास माझ्या पक्षकारास लागू व बंधनकारक राहणार नाही. काही आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासह कळवावे. त्यानंतर कोणाचेही उजर चालणार नाही. कळावे,

दिनांक २८.१०.२०२६
अमरावती

ॲड.एम.बी.राठी
कार्या.१०३, दयासागर अपार्टमेंट
जयराम नगर, अमरावती

पक्षकाराची सही,

जाहीर नोटीस

सर्व लोकांना सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार **नामे धिरज सुभाषराव पालीवाल,** रा.न्यू विजय नगर, स्वागतम कॉलनी, गोपाल नगर, साई नगर, अमरावती, ता.जि.अमरावती यांनी **मुश्ताक अहेमद शेख अब्दुल्ला,** रा.डांगरीपुरा चांदूर रेल्वे, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती यांचेशी खालील मालमत्तेबाबत स्थावर मालाची ईसारचिठ्ठी केली आहे. त्या मालमत्तेचे वर्णन खालीलप्रमाणे-

मालमत्तेचे वर्णन - मौजे धानोरा म्हाली, प्रगणे- मांजरखेड, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथील भूमापन क. व उपविभाग ४५, खाते नं.१६८३ एकुण क्षेत्रफळ १ हे.०० आर, आकार रु.२.३० पैसे भोगवटदार वर्ग-१, ज्याची चतुःसिमा खालीलप्रमाणे-

पुर्वेस - श्री.वासुदेव अंबादास ढोबळे यांचे मालकीची याच गटातील ० हे.८१ आर शेतजमीन
पश्चिमेस - श्री.भगवान बारकाजी नागोसे यांचे मालकीची याच गटातील १ हे.५७ आर शेतजमीन
उत्तरेस - काशिनाथ सवाई यांचे शेत
दक्षिणेस - मंगला नन्नोरे यांचे शेत

तरी या जाहीर सुचनेद्वारे सर्व आम जनतेस कळविण्यात येते की, वर वर्णन केलेली मिळकत **मुश्ताक अहेमद शेख अब्दुल्ला** हे माझे पक्षकाराला विकी करण्यास इच्छुक व तयार आहेत. त्यानुसार माझे पक्षकार दिनांक २०.०६.२०२६ रोजी केलेल्या ईसारचिठ्ठीनुसार खरेदीखत नोंदविण्याच्या ठरलेल्या दिवशी म्हणजेच ०६.११.२०२६ रोजी किंवा त्यापुर्वी खरेदीखत नोंदवून देण्यास व माझे पक्षकार खरेदीखत नोंदवून घेणस दुय्यम निबंधक कार्यालय, चांदूर रेल्वे येथे नोंदवून घेण्यास तयार आहे. तरी या जाहीरनाम्याद्वारे सर्व आम जनतेस सुचित करण्यात येते की, सदर वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही हितसंबंध, हक्क, अधिकार, गहाण, बोजा इत्याी काही असल्यास माझे पक्षकाराला किंवा त्यांचे अधिवक्ता यांना सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ दिवसांचे आत लेखी स्वरुपात कळवावे तसेच आपल्या हरकतीबाबत आवश्यक ते कागदपत्रासह माझे पक्षकाराला किंवा त्यांचे अधिवक्ता यांना व्यक्तिशः अथवा आपल्या अधिवक्ता मार्फत भेटून आपली हरकत नोंदवावी. सदर मुदतीत कुणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास माझे पक्षकार सदर वर वर्णन केलेली मिळकत रजिस्टर खरेदी खताद्वारे विकत घेण्यास मोकळे राहतील व अशा परिस्थितीत मुदतीनंतर आलेल्या हरकतीचा कोणताही उजर राहणार नाही. अशा परिस्थितीत होणाऱ्या त्रयस्थ व्यक्तिच्या कोणत्याही खर्चास व परिणामास किंवा नुकसानीस माझे पक्षकार जबाबदार राहणार नाही.

दिनांक २८.१०.२०२६

स्वा/-
ॲड.लोमेश पी.खोपे,
मो.नं.९९६०११७१६१
द्वारा वैभव कॉलनी, गोंडबाबा मंदिरासमोर,
समआयडीसी रोड, अमरावती

दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
जन्म-मृत्यू नोंदीचा आदेश होण्याकरीता दाखल केलेल्या प्रकरणाचा जाहीरनामा

कि.फौ.अर्ज क्र.६५/२०२६ ने.ता.०१.१२.२०२६

अर्जदार : अफजल खान आबिद खान
वय ३५ वर्षे, व्यवसाय - खाजगी वाहन चालक
रा.अलहिलाल कॉलनी, अमरावती, ता.जि.अमरावती

---- विरुध्द ---

गैरअर्जदार ग्रामपंचायत नांदसावंगी मार्फत
सचिव (ग्रामसेवक) ग्रामपंचायत कार्यालय नांदसावंगी
ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती

ज्याअर्थी अर्जदार यांचा जन्म १७.०७.१९९१ रोजी नांदसावंगी ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे झाला. त्यांचे जन्म नोंद ही अनावधानाने नोंदणी करण्याचे राहीली आहे. अर्जदार यांचे जन्म नोंद जन्म मृत्यू निबंधक, ग्रामपंचायत नांदसावंगी,ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे केली नसल्यामुळे त्यांनी जन्म मृत्यू अधिनियम १९६९ चे कलम १३(३) अन्वये त्यांच्या जन्माच्या नोंदीचा आदेश नगरपंचायत कार्यालय नांदगाव खंडेश्वर, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती येथे होण्याकरीता वि.न्यायालयात दिनांक ०५.१०.२०२६ रोजी अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी दिनांक २७.०३.२०२० रोजी सकाळी १०.३० वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **/१०/२०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,
वि.श्री.आर.आर.खामतकर, ३रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२२०७/२०२६
संदीप अधिक तीन -वि- निरंक
पुढील ता.२४.११.२०२६

जाहीरनामा/सायटेशन

अर्जदार :
1. Sandeep Ram Meghe, Aged 68 Yrs. Occu.: Agriculturist
R/o S/o Ram Meghe Infront of Vidhya Bharti College Gulmohar Colony Camp Amravait.
2. Bharti Shirishrao Gode, Aged 70 Yrs. Occu.: Household
R/o Arvi Road, Kelkarwadi, Wardha, Tq. Dist. Wardha
3. Tilotama Jagadish Pasale, Aged 66 Yrs. Occu.: Household
R/o W/o Pasale Jagdish, 22, Parijatak Vatika Society-1, B/h Aryakanya Vidhyalay Karelibaug, Vadodara, Tq.Dist.Vadodara
4. Aruna Subhash Deshmukh, Aged 77 Yrs. Occu.: Household
R/o W/o Subhash Deshmukh, Belora, Tq Chandur Bazar, Dist.Amravati.

-- विरुध्द --

गैरअर्जदार : 1. Rajashree Rajdeep Meghe, Age 65 Yrs. Occu.: Household
R/o W/o Rajdip Ram Meghe, Opp.of Hislop College, Civil Line Nagpur

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Ram Krishnarao Meghe हे दिनांक 29.01.2001 रोजी **नागपूर** येथे मयत झाले. तसेच Anusaya Ram Meghe या दि.२४.१२.२०११ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार Sandeep Ram Meghe + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sandeep Ram Meghe + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२३.१०.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
सहायक अधीक्षक
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर,अमरावती

‘निर्णायक आंदोलना’च्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षणमंत्र्यांसोबत शैक्षिक महासंघाची बैठक

प्राध्यापकांच्या प्राध्यान्यक्रमाच्या १० प्रमुख मागण्यांवर सकारात्मक चर्चा व निर्णय प्रक्रिया सुरु

मुंबई-अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ, महाराष्ट्र प्रदेशच्या ‘निर्णायक आंदोलना’च्या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली २७ ऑक्टोबर रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत प्राध्यापकांच्या १० प्रमुख मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. सुमारे अडीच तास चाललेल्या या बैठकीत मागण्यांच्या कायदेशीर व प्रशासकीय बाजू तपासून सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मंत्रिमहोदयांनी दिले. उर्वरित मागण्यांवर चर्चा करण्यासाठी २ नोव्हेंबर २०२६ रोजी पुन्हा बैठक घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले. लवकरच वित्त विभागाकडे प्रलंबित मागण्यांसाठी मा. मुख्यमंत्री महोदायांसोबत विशेष बैठक आयोजित करण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

महासंघाच्या प्रदेश कार्यकारिणीने १९ ऑक्टोबर रोजी नियोजित ‘निर्णायक आंदोलना’चा दुसरा टप्पा मंत्रिमहोदयांच्या पुढाकारानंतर तूर्तास स्थगित केला होता. या पार्श्वभूमीवर आयोजित बैठकीला उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्नांच्या निराकरणाच्या दृष्टीने विशेष महत्त्व प्राप्त झाले होते.

बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव बी. वेणुगोपाल रेड्डी, उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे संचालक तथा तंत्रशिक्षण संचालक डॉ. प्रमोद नाईक, उच्च शिक्षण विभागाचे उपसचिव अशोक मांडे, अमोल मुत्याल आणि प्रताप लुबाळ यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महासंघाच्या वतीने उच्च शिक्षण राष्ट्रीय सचिव तथा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील संलग्न विभागीय संघटनांचे पदाधिकारी सहभागी झाले.महासंघाने प्राधान्याने निवडलेल्या पहिल्या १० मागण्यांवर संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी स्वतंत्र टिपणे तयार केली होती. त्याआधारे प्रत्येक विषयावर चर्चा करून मंत्रिमहोदयांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक निर्देश दिले.

सहयोगी प्राध्यापक पदोन्नती : आठ दिवसांत निर्णयाचा प्रयत्न

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ६ जून २०२४ रोजीच्या चौथ्या सुधारणा अधिसूचनेची (Fourth Amendment Notification) महाराष्ट्रात तातडीने अंमलबजावणी करून पात्र प्राध्यापकांच्या करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) अंतर्गत सहयोगी प्राध्यापक पदावरील स्थाननिश्चितीची प्रकरणे विशेष मोहिमेद्वारे निकाली काढण्याची मागणी करण्यात आली. या मागणीसंदर्भातील सकारात्मक शिफारशींचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असल्याचे मंत्रिमहोदयांनी सांगितले. महासंघाच्या पदाधिकाऱ्यांची अर्थमंत्र्यांसोबत चर्चा घडवून आणून आठ दिवसांत निर्णय घेण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

७८ महाविद्यालयांचा प्रश्न : मागणी तत्त्वतः मान्य

२४ नोव्हेंबर २००१ पूर्वी अस्तित्वात असलेल्या ७८ महाविद्यालयांच्या मान्यतेचा प्रश्न निकाली काढून ‘कायम विनाअनुदानित’ हे शीर्षक हटवून अनुदान देण्यासाठी आवश्यक शासन निर्णय घेण्याची मागणी महासंघाने केली.ही मागणी तत्त्वतः मान्य असल्याचे सांगून सकारात्मक शिफारशींसह प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असल्याची माहिती देण्यात आली. अर्थमंत्र्यांसोबत चर्चा घडवून या विषयावर तातडीने निर्णय घेण्यात येईल, असे मंत्री महोदयांनी सांगितले.

जुनी पेन्शन योजना : प्रस्ताव वित्त विभागाकडे

१ नोव्हेंबर २००५ पूर्वी जाहिरात झालेल्या पदांवर नियुक्त अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, तसेच त्यानंतर नियुक्त प्राध्यापकांच्या प्रश्नावरही सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी महासंघाने केली.या मागणीसंदर्भातील सकारात्मक शिफारशींचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्यात आला असल्याचे सांगण्यात आले. अर्थमंत्र्यांसोबत चर्चा करून या विषयावर तातडीने निर्णय घेण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्रिमहोदयांनी स्पष्ट केले.

पीएच.डी.धारक प्राध्यापकांची प्रोत्साहनपर वेतनवाढ

१ जानेवारी २०१६ ते ७ मार्च २०१९ या कालावधीत पीएच.डी. पात्रता प्राप्त केलेल्या प्राध्यापकांना प्रोत्साहनपर वेतनवाढ देणे आणि २०१६ पासून बंद करण्यात आलेली ही सुविधा पुन्हा लागू करण्याची मागणी करण्यात आली.या विषयावर विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त मार्गदर्शनाच्या अर्थाबाबत विभागात संभ्रम असल्याचे सांगण्यात आले. यावर मंत्रिमहोदयांनी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडून स्पष्टता मिळविण्याची तयारी दर्शविली. प्रा. प्रदीप खेडकर यांनी प्रोत्साहनपर वेतनवाढीच्या ‘Terms and Reference’ बाबत भूमिका मांडून न्यायालयीन निर्णयाचा संदर्भ दिला. त्यानंतर या निकालाचा अभ्यास करून निर्णय घेण्याच्या सूचना उच्च शिक्षण संचालकांना देण्यात आल्या.

शिक्षक पदांचे संरक्षण आणि ५०१२ पदांची भरती

२०१७ मधील विद्यार्थीसंख्येच्या आधारे निश्चित झालेल्या शिक्षक पदांना संरक्षण देऊन ५०१२ पदांसह मंजूर पदांची तातडीने भरती करावी, अशी महासंघाची प्रमुख मागणी होती. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार निर्माण झालेले विविध शैक्षणिक घटक, व्हर्टिकल्स आणि १३२ अध्यापन क्रेडिट्स यांमुळे महाविद्यालयांतील कार्यभाराचा विचार करून पदभरती करावी, अशी भूमिका मांडण्यात आली.या विषयावर विभागाने २०१७ मध्ये मान्य असलेल्या पदसंख्येत घट झालेली नसल्याचे सांगितले. संबंधित संस्थांची माहिती पुढील बैठकीत सादर करण्याची सूचना मंत्रिमहोदयांनी महासंघाला केली. पदभरती करण्यासाठी शासन कटिबद्ध असून संबंधित पदांना संरक्षण दिलेले आहे. प्रत्यक्षात पदसंख्येबाबत तफावत आढळल्यास माहितीच्या आधारे आवश्यक दुरुस्ती करण्यात येईल,अशी ग्वाही त्यांनी दिली.

शिष्यवृत्ती आणि वेतन निधीचे संरक्षण

पारंपरिक तसेच अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र आणि शिक्षणशास्त्र यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वेळेत वितरित कराव्यात आणि प्राध्यापकांच्या वेतनासाठी उपलब्ध निधी अन्यत्र वळविला जाणार नाही, यासाठी प्रभावी नियंत्रण व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली.

या मागणीबाबत सकारात्मक भूमिका घेत मंत्रिमहोदयांनी शिष्यवृत्ती वेळेत वितरित करण्याचे आणि प्राध्यापकांच्या वेतनासंदर्भातील परिस्थितीचा विभागाकडून सातत्याने आढावा घेण्याचे आश्वासन दिले. पोर्टल अद्ययावत करण्याची प्रक्रिया सुरू असल्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी आता दूर होतील, अशी माहिती तंत्रशिक्षण संचालकांनी दिली. प्राध्यापकांच्या वेतनासाठी विशेष योजना कार्यान्वित करण्याचा मानसही बैठकीत व्यक्त करण्यात आला.

समाजकार्य महाविद्यालयांतील सेवाविषयक प्रश्न

समाजकार्य महाविद्यालये उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित झाल्यानंतर निर्माण झालेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक समस्या सोडविणे, प्रलंबित पदोन्नती, वेतन आणि पदभरती प्रक्रिया पूर्ण करण्याची मागणी करण्यात आली.या प्रश्नावर सकारात्मक भूमिका घेत कर्मचाऱ्यांचा सेवार्थ प्रणालीत समावेश करण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे सांगण्यात आले. प्रलंबित प्रकरणांची तातडीने दखल घेण्यात येईल आणि हस्तांतरणानंतर निर्माण झालेल्या सेवाविषयक समस्यांच्या निराकरणासाठी धोरणात्मक निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले. पदोन्नतीची प्रक्रिया सुरू असल्याची माहितीही देण्यात आली.

NET/SET पात्रताधारकांचे CAS लाभ

२७ जून २०१३ च्या शासन निर्णयानुसार पात्र NET/SET धारक प्राध्यापकांना करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (CAS) अंतर्गत पदोन्नती व सर्व अनुषंगिक लाभ देण्याची मागणी करण्यात आली.सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या खटल्याशी संबंधित नसलेल्या प्रकरणांमध्ये पात्र प्राध्यापकांना लाभ देण्यात येतील, असे मंत्रिमहोदयांनी स्पष्ट केले.

ग्रंथपाल व शारीरिक शिक्षण संचालक पदभरती

महाविद्यालयांतील ग्रंथपाल आणि संचालक, शारीरिक शिक्षण या एकाकी पदांसंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या ६ एप्रिल २०२६ च्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करून प्रलंबित पदभरती तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली.या मागणीला मान्यता देत पदभरतीची कार्यवाही तातडीने सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले.

प्राचार्यांच्या नियुक्ती, वेतन आणि सेवा प्रश्नांवर चर्चा

प्राचार्यांच्या नियुक्ती मान्यता व वेतनप्रक्रियेतील विलंब दूर करणे, अशासकीय अनुदानित व विद्यापीठ संचालित महाविद्यालयांतील नियुक्त्यांना सेवा प्रवेश नियम, २०१२ लागू होण्याबाबत स्पष्टता देणे, शिक्षक व प्राचार्यांचे सेवानिवृत्तीचे वय ६५ वर्षे करणे आणि पात्र प्राचार्यांना प्राध्यापक पदाच्या अकॅडमिक लेव्हल १४ चे वेतन संरक्षण व समकक्ष लाभ देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.या विषयावर न्यायालयीन प्रकरणांच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात येईल, असे मंत्रिमहोदयांनी स्पष्ट केले.

दर आठवड्याला आढावा बैठक - बैठकीच्या शेवटी महासंघाने मांडलेल्या सर्व न्याय्य मागण्यांची कायदेशीर व प्रशासकीय बाजू तपासून सकारात्मक निर्णय घेण्यात येतील, असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिले. प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी दर आठवड्याला आढावा बैठक घेण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.

महासंघाच्या ‘निर्णायक आंदोलना’मुळे उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रलंबित प्रश्न शासनस्तरावर सविस्तर चर्चेसाठी आले असून, आता या चर्चेचे रूपांतर ठोस निर्णय आणि कालबद्ध अंमलबजावणीत व्हावे, ही महासंघाची अपेक्षा आहे.

या सभेचे अधिकृत इतिवृत्त प्राप्त झाल्यानंतर महासंघ अधिक विस्तृत बाबी सादर करेल आणि उर्वरित मागण्यांवर २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या बैठकीत चर्चा होणार असून, त्यानंतरच्या निर्णयांच्या आधारे महासंघ पुढील दिशा निश्चित करणार आहे असे प्रा. प्रदीप खेडकर यांनी कळविले आहे.

संक्षिप्त

जिल्हा परिषद शाळात राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेबाबत जनजागृती

भातकुली-जिल्हा परिषद शाळा उत्तमसरा,पंचायत समिती भातकुली येथे राष्ट्रीय जंतनाशक मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांना जंतांच्या प्रादुर्भावामुळे होणारे दुष्परिणाम आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.मुलांच्या शरीरात जंतांचा प्रादुर्भाव झाल्यामुळे कुपोषण, रक्तक्षय आणि सतत थकवा जाणवणे अशा समस्या निर्माण होऊ शकतात.त्यामुळे जंतांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी योग्य वेळी जंतनाशक औषध घेणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. यासाठी अल्बेंडाझोल ही जंतनाशक गोळी वर्षातून दोन वेळा घेण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. गोळी कशा प्रकारे घ्यावी, याबाबतही सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.शिक्षकांनी विद्यार्थांना जेवणा नंतर गोळ्यांचे वाटप केले.या कार्यक्रमाला समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सोनाली देशमुख, आरोग्य सेविका शारदा बारड,मंगला वानखेडे, आशा सेविका संगीता निंभोरकर, सुरेखा सवई आणि पीटीए सदस्या सविता शिंदे उपस्थित होत्या.शाळेच्या मुख्याध्यापिका मीनाक्षी इंगळे, शिक्षक राजेश सावरकर,प्रमोद कांबळे,गजानन येलोणे,अंगणवाडी सेविका जयश्री पेढेकर,वर्षा मानकर,अनुराधा भिंगारे,रुपाली बेलसरे तसेच विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. राष्ट्रीय जंतनाशक मोहीम यशस्वी करण्यासाठी आरोग्य विभागातील कर्मचारी, शिक्षकवृंद, अंगणवाडी कर्मचारी आणि संबंधित सर्वांनी परिश्रम घेतले.

दादासाहेब गवई यांच्या जीवनकार्याला विद्यार्थ्यांची शब्दवंदना

अमरावती- स्मृतीशेष दादासाहेब गवई जयंती सप्ताह’ उत्साहात साजरा केला जात आहे. या सप्ताहाच्या अंतर्गत स्थानिक महाविद्यालयात विद्यार्थी आणि प्राध्यापकांच्या संयुक्त पुढाकाराने साकारण्यात आलेल्या ‘कर्तव्याचा महामेरू: श्री दादासाहेब गवई’ या विशेष भित्तीपत्रकाचे अनावरण श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्टच्या अध्यक्षा कीर्ती गवई (अर्जुन) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक म्हणून संस्थेचे सचिव डॉ. कमलाकर पायस उपस्थित होते. याप्रसंगी उपस्थितांना डॉ. कमलाकर पायस यांनी मार्गदर्शन केले. हर्षल यावले, अविनाश गोंडाणे, सागर तायडे, गौरव तायडे, अनुराग खडसे, अभिजित कोथळकर, चंचल गणवीर, सानिया भिडेकर, नियती बुध, निखिल गुरदे, कुलदीप भोयर आणि भूमिका मालेवार या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.या प्रसंगी प्रा.पी.आर.एस.राव, डॉ.श्याम तंत्रपाळे, डॉ. सुनील कुमार,डॉ.शुद्धोधन कांबळे, डॉ. प्रकाश म्हस्के, प्रा. डॉ.राजेश देशमुख, प्रा.जी.एच.पांडे, डॉ.एस.बी.सांगोले,डॉ.दीपाली पडोळे, प्रा.प्रकाश बोरकर, सुशांत युनाते, सुभाष घुरडे व समस्त विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राष्ट्रीय चर्मकार महासंघाची शाखा कार्यकारणी गठित

धामणगाव रेल्वे-राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या संघटनात्मक विस्ताराला बळ देण्यासाठी धामणगाव रेल्वे तालुक्यातील बोरगाव निस्ताने येथे शाखा कार्यकारणी गठित करण्यात आली.यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनरावजी (नाना) घोलप, राष्ट्रीय अध्यक्ष भानुदासजी विसावे आणि प्रदेशाध्यक्ष माधवराव गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली संघटनेचे कार्य समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने विविध ठिकाणी शाखा गठित करण्यावर भर दिला जात आहे.याच अनुषंगाने बोरगाव निस्ताने येथे नवीन कार्यकारणी गठित करण्यात आली. या नवनियुक्त कार्यकारणीत अध्यक्षपदी शंकरराव चोखट, उपाध्यक्षपदी लीला चोखट,रमेश चोखट व नरेश सोर,सचिवपदी रामभाऊ चोखट,सहसचिवपदी रामेश्वर चोखट, कार्याध्यक्षपदी आकाश चोखट, कोषाध्यक्षपदी अक्षय चोखट, तर सहकोषाध्यक्षपदी राजेंद्र चोखट यांची निवड करण्यात आली. तसेच मार्गदर्शक म्हणून शिवदास सोर,सल्लागार म्हणून हरिदास सोर यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली. सदस्य म्हणून रक्षक सोर, कवडुजी चरडे, दिपेश चोखट, नयन चोखट, सौरभ चोखट, कुणाल चोखट व प्रतीक सोर यांचा कार्यकारणीत समावेश करण्यात आला.या कार्यक्रमाला राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष निलेश जामठे,धामणगाव नगरपरिषदेचे नगरसेवक मुरलीधर पतके, सामाजिक कार्यकर्ते देवरावजी भटकर, जिल्हा संपर्कप्रमुख पुरुषोत्तम वनस्कर, ज्येष्ठ मार्गदर्शक, कवी व साहित्यिक भास्करराव भटकर तसेच ह.भ.प.पवार महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.

पोटे पाटील महाविद्यालयाच्या तीन विद्यार्थ्यांची ‘ईपॅम सिस्टम्स’मध्ये निवड

अमरावती/का.प्र.

पी. आर. पोटे पाटील अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग व आयटी सेवा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी ‘ईपॅम सिस्टम्स’ (EPAM Systems) च्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग विभागातील आयुष कारले, दीप यादव आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील हर्ष तनपुरे यांची प्रत्येकी ९ लाख रुपये वार्षिक पॅकेजवर निवड झाली आहे.

महाविद्यालयातील कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग (CSE) आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स (AIDS) विभागातील या विद्यार्थ्यांनी तांत्रिक प्रशिक्षण, ॲप्टिट्यूड प्रॅक्टिस, सातत्यपूर्ण मेहनत आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर हे यश मिळविले. विविध प्रकल्पांमधील सहभाग, अद्ययावत तांत्रिक कौशल्ये, समस्या सोडविण्याची क्षमता आणि प्रभावी संवादशैली यांमुळे त्यांनी प्लेसमेंट प्रक्रियेत आपली गुणवत्ता सिद्ध केली.‘ईपॅम सिस्टम्स’ ही १९९३ मध्ये स्थापन झालेली जागतिक सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग व आयटी सेवा कंपनी असून, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), क्लाउड कम्प्युटिंग आणि डिजिटल तंत्रज्ञान क्षेत्रात सेवा पुरवते. कंपनी विविध जागतिक उद्योगांना तंत्रज्ञानविषयक सेवा प्रदान करते.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संचालक डॉ. पी. एम. खोडके, प्राचार्य डॉ पी. एम. जावंधिया, उपप्राचार्य डॉ मो. झुहेर, कॉर्पोरेट रिलेशन्स डीन डॉ. मोनिका जैन, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर प्रा. प्रतीक भट्टड, सीएसई विभागप्रमुख डॉ. विजय गडीचा, एआयडीएस विभागप्रमुख डॉ. अजय गडीचा, सीएसई विभागाचे प्लेसमेंट समन्वयक प्रा. मंगेश निचत, प्रा.उमेश आरके, प्रा.एस.ए.खान तसेच एआयडीएस विभागाचे प्लेसमेंट समन्वयक डॉ. रोशन भुरे यांनी व सर्व प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

लॉन टेनिस (पुरूष) स्पर्धेकरिता विद्यापीठाचा संघ घोषित

अमरावती - पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यापीठव्दारा आयोजित सोलापूर येथे १५ ते १८ नोव्हेंबर,दरम्यान होणा-या पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ लॉन टेनिस (पुरूष) स्पर्धेकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा संघ घोषित करण्यात आला आहे. चमूमध्ये डिग्री कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशन, अमरावतीचा प्रोमित बोरडोलोई व बिश्वज्योती बर्मन, माऊली ग्रुप ऑफ इन्स्टिटुट कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, शेगांवचा शिवम तायडे, जी.एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांवचा मंथन जैन, सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी, अमरावतीचा अमेय पोटे, पी.आर. पोटे (पाटील) कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अॅन्ड मॅनेजमेंट, अमरावतीचा अपूर्व डहाके, डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावतीचा यश अलोणे आणि भारतीय महाविद्यालय, अमरावतीचा सोमेश विटाळकर याचा समावेश आहे.

निवड झालेल्या चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी अभिनंदन केले आहे. चमूंचा प्रशिक्षण वर्ग ॲडव्हान्स टेनिस ॲकेडमी, बापू कॉलनी, दीपनगर अमरावती येथे ३ ते १२ नोव्हेंबर, दरम्यान होणार असून प्रशिक्षण वर्गाला सर्व खेळाडूंनी उपस्थित रहावे, डॉ. तनुजा राऊत यांनी केले आहे.

आंतर महाविद्यालयीन कबड्डी सामान्यांत श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विजय

अमरावती/का.प्र.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा २४ ऑक्टोबर पासून सुरू झाल्या त्यानुसार सदर आंतरमहाविद्यालयीन कबड्डी स्पर्धा ए झोन शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती, बी झोन लेट दुर्गा बंनमेरू महाविद्यालय लोणार, सी झोन रामराव झनक महाविद्यालय मालेगाव., डी झोन भाऊसाहेब ढोरे महाविद्यालय बाबुळगाव, येथे आयोजित करण्यात आले होते.

या चारही झोनमध्ये विद्यापीठातील बुलढाणा अमरावती वाशिम यवतमाळ अकोला या सर्व जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयीन संघांनी सहभाग नोंदविला त्यानुसार या स्पर्धेत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करीत चारही झोन मधून विजयी संघाची अंतिम स्पर्धा झोन ए शारीरिक शिक्षण महाविद्यालय अमरावती येथे २७ ऑक्टोबर झाली. या चुरशीच्या विजय टीम श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती मधील आदित्य वानखडे साहिल भगत,अभी पवार, निखिल डेहनकर, ओम भाकरे विद्यार्थ्यांनी तसेच उपविजेयी बाबासाहेब धाबेकर महाविद्यालय खडकी मधील सुरज पवार, सौरभ मरस्कोल्हे, साहिल मदनकार, प्रणव खामकर विद्यार्थ्यांनी आपल्या खेळाचे अतिशय उत्कृष्ट प्रदर्शन दाखवले. याप्रसंगी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. भैय्यासाहेब मेटकर व नवनियुक्त अधिसभा सदस्य डॉ.विलास ठाकरे महाविद्यालयाच्या वरिष्ठ प्राध्यापिका आयक्यूएसी समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख यांच्या हस्ते विजयी व उपविजयी टीमला ट्रॉफी देण्यात आली.याप्रसंगी कबड्डी निवड समिती डॉ. आकाश मोरे, सदस्य डॉ. श्रीकांत माहुरकर, डॉ. योगेश भोसले, डॉ. दळवी, डॉ.विक्रम वानखडे डॉ.कविता वाटाणे डॉ. संगीता लोहोकरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

तसेच उपस्थित मान्यवरांनी विजयी संघाचे मनःपूर्वक अभिनंदन केले आणि पुढील क्रीडा वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धा यशस्वी करण्याकरिता श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे संयोजक प्रा. जितेंद्र राऊत, डॉ.अमोल दातार, प्रा.अक्षय अळसपुरे प्रा. प्रिया किनाके यांनी अथक परिश्रम घेऊन स्पर्धा संपन्न झाल्या.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून शिवसेनेचे किरण सरनाईक विजयी

अमरावती/प्रतिनिधीः- महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणूकीत अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून शिवसेना पक्षाचे उमेदवार किरण रामराव सरनाईक १६ हजार ६६३ मते मिळवून विजयी झाले. त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या अदिती ऋषिकेश पोहरे यांना ८ हजार ६३६ मते मिळाली.

या निवडणुकीसाठी शुक्रवार २३ ऑक्टोबर रोजी विभागातील ५ जिल्ह्यातील ८१ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया पार पडली होती. ३५ हजार ८१० मतदारांपैकी ९२.२५ टक्के म्हणजे ३३ हजार ३४ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला.

अमरावती येथील 'लोकशाही भवन' या इमारतीत मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी

सकाळी ८ वाजता मतमोजणी प्रक्रीयेस प्रारंभ झाला. निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त नयना गुंडे , निवडणूक निरीक्षक अभय महाजन, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आशिष येरेकर (अमरावती), वर्षा मीना (अकोला), योगेश कुंभेजकर (वाशिम), विकास मीना (यवतमाळ), प्रविणकुमार देवरे (बुलढाणा) तसेच इतर नियुक्त अधिकारी व कर्मचारी तसेच उमेदवारांचे मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी केंद्रात उपस्थित होते.

प्रारंभी उमेदवारांना मिळालेल्या पहिल्या पसंतीच्या मतांची मोजणी एकुण तीन फेऱ्यात करण्यात आली. १४-१४ हजार आणि शेवटी ५ हजार ३४ याप्रमाणे मतपत्रिकांची तीन फेऱ्यांमध्ये यावेळी मतमोजणी करण्यात आली. या मतमोजणीत तिन्ही फेरीमध्ये शिवसेनेचे उमेदवार किरण सरनाईक हे कायम आघाडीवर होते. त्यांना पहिल्या पसंतीची एकुण ८ हजार १६२ मते प्राप्त झाली. त्यांच्या निकटच्या प्रतिस्पर्धी काँग्रेसच्या उमेदवार अदिती पोहरे यांना ४ हजार ६८८ मते मिळाली. दोन फेरीत दुसऱ्या क्रमांकावर असलेले अपक्ष श्रीकांत देशपांडे यांची तिसऱ्या फेरीअखेर तिसऱ्या स्थानी घसरण झाली व त्यांना ४ हजार ६६८ मते मिळाली.

पहिल्या पसंतीच्या मतमोजणीच्या तिसऱ्या फेरीअखेर एकूण ३३ हजार ३४ मतांची मोजणी करण्यात आली. एकूण ३२ हजार २६६ मते वैध तर ७६८ मते अवैध ठरली. विजयासाठी आवश्यक मतांचा कोटा हा १६ हजार १३४ मते इतका ठरला. विजयासाठी आवश्यक मते (कोटा) पहिल्या पसंतीच्या मतमोजणीनंतर एकही उमेदवार पूर्ण करू शकला नसल्याने दुसऱ्या पसंतीक्रमाच्या मतमोजणीला सुरुवात करण्यात आली.

विद्यापीठ मार्गावरील लोकशाही भवनात मंगळवारी सकाळी ८ वाजता मतमोजणीची प्रक्रिया सुरू झाली. मतपत्रिकांचे २५-२५ च्या गठ्ठयांमध्ये वर्गीकरण केल्यानंतर दुपारी १२ च्या सुमारास २४ टेबलवर प्रत्यक्ष मतमोजणीला सुरुवात झाली. पहिल्या पसंतीक्रमाच्या तीन फेरीतील ३३ हजार ३४ मतपत्रिकांची मोजणी पूर्ण होण्यासाठी सुमारे साडेदहा तासांचा अवधी लागला. पहिल्या पसंतीक्रमाच्या मतांनंतर विजयासाठी आवश्यक असलेला निश्चित कोटा पूर्ण न झाल्याने दुसऱ्या पसंतीच्या मतांची मोजणी सुरू करावी ☞(पान २ वर)

■ तिसऱ्या आणि अंतिम फेरीअखेर पहिल्या पसंतीची प्रमुख दहा उमेदवारांना मिळालेली मते खालील प्रमाणे आहेत. शिवसेनेचे किरण सरनाईक यांना ८१६२, काँग्रेसच्या अदिती पोहरे यांना ४६८८, अपक्ष डॉ. श्रीकांत देशपांडे यांना ४६६८, अपक्ष सुरेश देवकर यांना ३२३६, अपक्ष दिलीप कडू यांना २६७४, शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे दत्तात्रय लहाने यांना २१५५, अपक्ष डॉ. संगीता शिंदे यांना १९६४, अपक्ष चंद्रशेखर भोयर यांना १३७५, अपक्ष डॉ. प्रशांत विघे यांना १२६७ तर अपक्ष डॉ.अविनाश बोर्डे यांना १०२६ मते प्राप्त झाली.

अ‍ॅड.मनीषा बडगे यांच्या अवयवदानामुळे ५ जणांना नवजीवन

रिम्स रुग्णालयातून नागपूर आणि सावंगी मेघेसाठी ग्रीन कॉरिडॉर

- सिटी बसच्या धडकेत मनीषा बडगे झाल्या होत्या गंभीर जखमी

- यकृत, दोन्ही मूत्रपिंड आणि नेत्रदान करण्यात आले

- अमरावतीतील खोब्रागडे यांची कन्या, तर जळगावची सून होत्या मनीषा बडगे

अमरावती/प्रतिनिधीः- अंबानगरीतील कन्या मनीषा सागर बडगे यांनी आपल्या अवयवदानातून समाजासमोर माणुसकीचा आणि उदारतेचा आदर्श निर्माण केला आहे. मंगळवारी सायंकाळी ५ वाजून ४१ मिनिटांनी त्यांना मेंदूमृत (ब्रेनडेड) घोषित करण्यात आल्यानंतर बुधवारी दुपारी बडनेरा रोडवरील रिम्स रुग्णालयात त्यांचे अवयवदान करण्यात आले. त्यांचे पती प्रा.

सागर बडगे यांनी अवयवदानासाठी संमती दिली. शहरातील जीवनज्योत आणि हरिना फाउंडेशन यांच्या पुढाकाराने व सहकार्याने ही अवयवदान

प्रक्रिया पार पडली.

मनीषा सागर बडगे यांचे यकृत आणि एक मूत्रपिंड अनुक्रमे नागपूर व सावंगी मेघे येथे पाठविण्यात आले. यासाठी ग्रीन कॉरिडॉर तयार करण्यात आला. या प्रक्रियेत अमरावती शहर वाहतूक पोलिसांनी तत्परतेने सहकार्य केले, अशी माहिती रिम्स रुग्णालयाचे संचालक आणि प्रसिद्ध अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. श्याम राठी यांनी दिली.

मनीषा बडगे (वय ४१) यांचा विवाह जळगाव येथील प्रा. सागर बडगे यांच्याशी झाला होता. या दाम्पत्याला अरहद (वय १२ वर्षे) हा मुलगा आणि अधीरा (वय ८ वर्षे) ☞(पान २ वर)

ऑटो पलटल्याने वृद्ध महिलेचा मृत्यू

चांगापूर चौकातील घटना

अमरावती/प्रतिनिधीः- गाडगे नगर पोलीस स्टेशन हद्दीतील चांगापूर चौकात मंगळवारी रात्री १०.३० वाजताच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ते अपघातात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. मृत महिलेची ओळख शोभा प्रमोद खंगाले (वय ५६, रा. चांगापूर) अशी झाली आहे. माहिती नुसार, शोभा खंगाले या ऑटोने प्रवास करत होत्या. चांगापूर चौकात ऑटो आला असताना अचानक रस्त्यावर रोही जंगली प्राणी समोर आला. रोहीला वाचविण्याच्या प्रयत्नात चालकाचे ऑटोवरील नियंत्रण सुटले आणि ऑटो भरधाव वेगात पलटला. या अपघातात शोभा खंगाले यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच गाडगे नगर पोलिसांचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. ☞(पान २ वर)

अंजनगाव सुर्जी नप कंत्राटी सफाई कामगारांचे वेतन थकित

३ नोव्हेंबरपासून आमरण उपोषणाचा इशारा

अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः- अंजनगाव सुर्जी नगर परिषद अंतर्गत निमगाव ग्राम विकास बहुउद्देशीय संस्थेमार्फत कार्यरत असलेल्या कंत्राटी सफाई कामगारांचे वेतन गेल्या अनेक महिन्यांपासून थकित असल्याने कामगारांच्या आर्थिक कोंडीत वाढ झाली आहे. घंटागाडी चालक, ड्रेनेज सफाई, पाणी पुरवठा आणि टाकी सफाईच्या कामात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेले हे कर्मचारी शहराच्या

स्वच्छतेत महत्त्वाचे योगदान देत असताना देखील त्यांना वेळेवर वेतन मिळत नसल्याची तक्रार आहे.या संदर्भात अखिल भारतीय प्रचार निर्मूलन संघर्ष समितीचे अध्यक्ष सचिन मु. गावंडे आणि उपाध्यक्ष सुंदरलाल प्रेमलाल तांबे यांच्यासह सर्व कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांच्या वतीने मुख्याधिकारी, ☞(पान २ वर)

दुचाकी चोरटा ताब्यात

-फ्रेजरपुरा पोलिसांची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- शहरात वाहन चोरीच्या घटनांवर आळा घालत फ्रेजरपुरा पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. ८ दिवसांपूर्वी चोरीस गेलेल्या दुचाकीच्या प्रकरणात आरोपी रोहन दीपक इंगळे (वय २३, रा. जावरा फतेपूर) याला अटक करून त्याच्या कडून स्प्लेंडर बाईक आणि ॲक्टिवा मोपेड जप्त करण्यात आली आहे. दोन्ही गाड्यांची एकूण किंमत ७९ हजार ☞(पान २ वर)

कालव्यात शेतकरी गेला वाहून

तिवसा येथील घटना,शोध मोहीम सुरु

तिवसा/प्रतिनिधीः- कालव्याच्या पाण्यात पाय धुण्यासाठी गेलेला ५३ वर्षीय शेतकरी पाण्याच्या प्रवाहात वाहून गेल्याची घटना आज बुधवार दिनांक २८ ऑक्टोबर रोजी सकाळी ७:३०वाजता दरम्यान घडली. पिंटू ऊर्फ दिवाकर सुखदेव माहोरे (रा. तिवसा) असे वाहून गेलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

दिवाकर माहोरे हे रात्रीपासून शेतात ओलीत करण्यासाठी गेले होते.सकाळी शेतातील मजुराला सातरगाव येथे सोडून परत येत

असताना ते हातपाय धुण्यासाठी कालव्याच्या कडेला गेले. इतक्यात पाय धूत असतानाच अचानक दोन्ही पाय घसरून ते पाण्याच्या प्रवाहात आले व खोल पाण्यात वाहून गेले.

ही घटना शाळेत जाणाऱ्या मुलांनी पहिल्याने उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच महसूल विभागाने अमरावतीच्या बचाव व शोध पथकाला पाचारण केले. ☞(पान २ वर)

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रक्रिया टळली

राज्य सरकारचा निर्णय, सहकार क्षेत्रात खळबळ

अमरावती/प्रतिनिधीः- राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने दुष्काळग्रस्त घोषित जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या निवडणुका पुढील आदेशापर्यंत स्थगित केल्या आहेत. या निर्णयाचा फटका अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीलाही बसला आहे.जिल्हा बँकेत सध्या निवडणुकीबाबत केवळ मतदार यादी तयार करण्याच्या स्तरापर्यंतच प्रक्रिया पोहोचली होती. नामांकन प्रक्रिया अद्याप सुरू झालेली नाहती. शासनाच्या नव्या आदेशानुसार ज्या संस्थांमध्ये

नामांकन प्रक्रिया सुरू झाली आहे, अशा संस्थांच्या निवडणुका या स्थगिती आदेशातून वगळण्यात आल्या आहेत, त्या मुक्त ठेवण्यात आल्या आहेत. मात्र बँकेची प्रक्रिया सुरुवातीच्या टप्प्यातच असल्याने ती स्थगितीच्या कक्षेत आली आहे.

शासनाच्या आदेशानुसार गृहनिर्माण सहकारी संस्था, उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशान्वये निवडणूक होणाऱ्या संस्था, ज्या संस्थांमध्ये नामांकन प्रक्रिया सुरू झाली आहे अशा संस्था या तीन प्रकारच्या संस्था या स्थगिती आदेशाच्या बाहेर ठेवण्यात आल्या आहेत. खरीप २०२६ दरम्यान दुष्काळी परिस्थितीचे आकलन केल्यानंतर महाराष्ट्र सरकारने २०२५ च्या २७ ऑक्टोबरच्या शासन निर्णयान्वये ३०४ तहसील मध्ये दुष्काळग्रस्त घोषित केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० च्या ☞(पान २ वर)

९ किलो गांजासह दोघे जेरबंद

-गुन्हे शाखेची कारवाई

अमरावती/प्रतिनिधीः- गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने एकाच दिवशी दोन वेगवेगळ्या ठिकाणी कारवाई करत ९.८२५ किलो गांजा आणि अन्य मुद्देमाल असा एकूण ४ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. ही धडक कारवाई मंगळवार २७ ऑक्टोबर रोजी गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील पंचवटी चौक व फ्रेजरपुरा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील ऑक्सिजन पार्क परिसरात करण्यात आली.

गांजाची तस्करी करणाऱ्या दोन जणांना बेड्या ठोकण्यात आल्या. यात ओडिसाहून रेल्वेने नागपूर व तेथून ट्रॅव्हल्सने अमरावती शहरातील पंचवटी चौकात उतरलेल्या तस्कराचाही समावेश आहे. दोन्ही कारवाई प्रकरणी बुधवारी सकाळी दोन स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले. नागपूरहून गांजा घेऊन आरोपी अमरावतीत येत असल्याची माहिती गुन्हे शाखा प्रमुख दिनेश दहातोंडे यांना मिळाली. मंगळवारी रात्रीच्या सुमारास संशयित पंचवटी चौकात सॅक घेऊन उतरताच त्याला ताब्यात घेण्यात आले. नियाज खान नवाब खान (वय २३, रा. ताज नगर-१, अमरावती) अशी त्याची ओळख पटविण्यात आली. त्याच्याकडून ४.८२० किलो गांजा व बॅग असा एकूण २ लाख ४१ ☞(पान २ वर)

किर्तनकार समाजाचा पट बदलवू शकतो- डॉ. प्रशांत ठाकरे

-राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ५८ वा पुण्यतिथी महोत्सव

गुरुकुंज मोझरी/प्रतिनिधीः- वेदाचा विचार, उपनिषदाचा विचार, वेदांतांचा विचार माणसाच्या जीवनाला मिळावा आणि त्यातून माणूस घडावा हा जो महाराजांचा विचार होता तो विचार पुढे नेण्याची दृष्टी म्हणजे कीर्तन आहे. समाजाचा पट किवा चित्र बदलविण्याचे ताकद एका माणसात असते त्याचं नाव कीर्तनकार आहे असे प्रतिपादन डॉ. प्रशांत ठाकरे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५८ व्या पुण्यतिथी महोत्सवात वारकरी कीर्तन संमेलनाच्या उद्घाटनीय भाषणात केले.

या संमेलनाचे अध्यक्ष लक्ष्मणदास काळे होते तर उद्घाटन म्हणून गुरुवर्य चदेले नाना (सचिव जोग वारकरी शिक्षण संस्था आळंदी देवाची) तर प्रमुख अतिथी म्हणून संदीप महाराज गिहे, श्याम नारायण चौबे, शालीग्राम खेडकर तसेच संचालक मंडळाच्या अध्यक्षा पुष्पा बोंडे, उपसर्वाधिकारी बाबाराव पाटील, सरचिटणीस जनार्दन बोथे, प्रचार प्रमुख गोपाल कडू, कार्यकारिणी सदस्या पौर्णिमा सवाई, डॉ.सूर्यप्रकाश जयस्वाल, इंजि.रमेश ढवळे, काठोळे गुरुजी, निस्ताने आदि मान्यवर उपस्थित होते.

डॉ.ठाकरे पुढे म्हणाले कीर्तनकार समाजाला स्वच्छ करणारा माणूस आहे. त्याने कीर्तनकार कसा उभा राहिला पाहिजे, त्याने कसे बोलावे ते सुद्धा राष्ट्रसंतांनी लहर की बरखा मध्ये सांगितलं आहे. ग्रामगीता हा जर ☞(पान २ वर)